सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | गुरुवार, २३ एप्रिल २०२६ | वर्ष ४ थे अंक ४६ | पाने १२ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


**आजचा सामना**
TATA IPL
मुंबई वि. चेन्नई
वेळ : सायं.७.३० वाजता
ठिकाण : मुंबई

# अमेरिकेचे एक पाऊल मागे

## अनिश्चित काळासाठी संघर्षविरामाची घोषणा | धमक्या देणाऱ्या ट्रम्प यांच्यावर नामुष्की | चर्चेचा प्रस्ताव इराणने फेटाळला



◆ **वॉशिंग्टन, २२ एप्रिल**

पाकिस्तानच्या मध्यस्थीने होणाऱ्या शांतता चर्चेच्या दुसऱ्या फेरीत सहभागी होण्यास इराणने नकार दिल्यानंतर उद्ध्वस्त करण्याची धमकी देणारे आणि 'सुपरपॉवर'ची शेखी मिरविणारे डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर अनिश्चित काळासाठी संघर्षविरामाची घोषणा करण्याची वेळ आली आहे. चर्चेच्या वाटाघाटी अंतिम होईपर्यंत संघर्षविराम राहणार असल्याचे ट्रम्प यांनी बुधवारी जाहीर केले. दुसरीकडे इराणने ट्रम्प यांची खिल्ली उडवत स्वतःच्या अटींवर चर्चा आणि करार करण्याचा इशारा दिल्याने अमेरिकेची चांगलीच नाचक्की झाली आहे.

इराणसोबतचा तणाव निवळण्याची चिन्हे नसतानाच, ट्रम्प यांनी बुधवारी संघर्षविराम वाढविण्याची घोषणा केली. संघर्षविरामाची मुदत संपण्यास काही तास शिल्लक असताना आणि इराणने शांतता चर्चेत सहभागी होण्यास नकार दिल्यानंतर त्यांनी हा निर्णय घेतला. इराणच्या नेतृत्वामध्ये मतभेद असून, जोपर्यंत ते ठोस प्रस्ताव घेऊन येत नाहीत, तोपर्यंत ही मुदतवाढ लागू राहील, अशी पोस्ट त्यांनी समाज माध्यमावर केली. अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे.डी. व्हान्स शांतता चर्चेच्या दुसऱ्या फेरीसाठी मंगळवारी पाकिस्तानला जाणार होते, मात्र इराणच्या शिष्टमंडळाने चर्चेचा प्रस्ताव फेटाळल्याने व्हान्स यांचा दौरा रद्द झाला. इराणने अमेरिकेच्या प्रस्तावांना प्रतिसाद न दिल्याने ही चर्चा थांबल्याचे ट्रम्प यांनी सांगितले. पाकिस्तानने केलेल्या विनंतीवरूनच संघर्षविरामाला मुदतवाढ दिल्याचे कारण त्यांनी पोस्टद्वारे नमूद केले.

◀(वृत्तसंस्था)

### वेळकाढूपणा सुरू : मोहम्मद गालीबाफ

ट्रम्प यांच्या घोषणेची खिल्ली उडवत इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाखेर गालीबाफ म्हणाले, युद्धविराम वाढवण्याला काहीही अर्थ नाही. अमेरिका आमच्या दबावामुळे नरमला आहे. ट्रम्प यांनी वाढवलेला युद्धविराम निरर्थक आणि वेळकाढूपणाचा आहे. हरणाऱ्यांनी अटी ठरवू नयेत. होर्मुझमधील नाकाबंदी उठवेपर्यंत त्यांच्यासोबत कोणतीही चर्चा होणार नाही. ■

### चर्चेची दुसरी फेरी उद्या : ट्रम्प

इराणसोबत शुक्रवारी शांतता चर्चेची दुसरी फेरी होणार आहे. मध्यस्थी देशाकडून त्यांच्यासोबत वाटाघाटी सुरू असून, त्यांनी अमेरिकेचा नवा प्रस्ताव इराणच्या राष्ट्राध्यक्षांकडे सादर केला. त्यांनी चर्चेसाठी तयारी दर्शवली आहे. इराणच्या बंदरांकडे जाणाऱ्या जहाजांची नाकाबंदी यापुढेही सुरूच राहील. त्यांना आमच्या अटी मान्य कराव्याच लागेल. नाकाबंदीमुळे इराणला दररोज ५०० मिलियन डॉलर्सचे नुकसान होत आहे. ■

## निवडणूक आयोगाची खडगेंना नोटीस

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात अपशब्द काढणारे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांना निवडणूक आयोगाने बुधवारी कारणे दाखवा नोटीस जारी केली. यापूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी त्यांच्यावर सडकून टीका केली होती. खडगे यांच्याविरुद्ध आयोगाने कठोर भूमिका घेतली असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले.

मल्लिकार्जुन खडगेंवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी भाजपाने मंगळवारी आयोगाकडे केली होती. खडगे यांचे वक्तव्य अतिशय गंभीर आणि अपमानजनक असून, ते आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करणारे असल्याचे भाजपाने आयोगाला दिलेल्या निवेदनात म्हटले होते. खडगे यांच्याकडून सार्वजनिक माफी मागून घ्यावी आणि त्यांच्यावर योग्य ती दंडात्मक आणि नियामक कारवाई सुरू करावी, अशी मागणी पक्षाने केली होती. केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन्, किरेन रिजिजू आणि अर्जुन राम मेघवाल यांच्या समावेश असलेले एक शिष्टमंडळ, हा मुद्दा उपस्थित करण्यासाठी बुधवारी निवडणूक आयोगाची भेट घेईल, असे पक्षाने म्हटले होते. ■

# विदर्भाच्या विकासाला 'वेग'

## तीन द्रुतगती महामार्गांसाठी हुडकोकडून कर्ज

◆ **मुंबई, २२ एप्रिल**

विदर्भातील दळणवळण व्यवस्था आणि औद्योगिक प्रगतीला मोठी चालना देणारा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली आणि नागपूर-चंद्रपूर या तीन महत्त्वाकांक्षी द्रुतगती महामार्गांच्या भूसंपादनासाठी लागणारी निधी उभारणी हुडकोच्या माध्यमातून करण्याच्या प्रस्तावास मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा विकास समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. येत्या सहा वर्षांत हे प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत विदर्भातील दळणवळण जाळ्याला बळकटी देण्यावर भर देण्यात आला. या महामार्गांमुळे विदर्भातील जिल्ह्यांचा एकमेकांशी असलेला संपर्क अधिक वेगवान होणार असून, व्यापाराला नवी दिशा मिळणार आहे.

### तीन महामार्गांचा नियोजित आराखडा

- नागपूर-गोंदिया: १६२.५७ कि.मी. लांबीच्या या प्रकल्पासाठी ३,१६२.१८ कोटी
- भंडारा-गडचिरोली: ९४.२४ कि.मी. लांबीच्या या मार्गासाठी ९३१.१५ कोटी
- नागपूर-चंद्रपूर: २०४.७९ कि.मी. लांबीच्या या प्रकल्पासाठी २,३५३.९४ कोटी

### प्रकल्पांवर गुंतवणुकीचा वर्षाव


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राज्याला औद्योगिक महासत्ता बनवण्याच्या दिशेने घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयात विदर्भाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत २ लाख ५६ हजार १३७ कोटी रुपयांच्या १८ विशाल प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. या महाप्रकल्पांपैकी एक मोठा वाटा विदर्भाच्या वाट्याला आला आहे.

नागपूर आणि विदर्भाच्या दृष्टीने ही गुंतवणूक अतिशय महत्त्वाची आहे. नागपूरच्या बुटीबोरी येथे ॲक्मे क्लीनटेक सोल्युशन प्रा. लि. ११,४०० कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक करत असून, यातून ७,००० जणांना थेट रोजगार मिळणार आहे. याशिवाय, नागपूरमध्येच सोलार डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेडने १२,७८० कोटींची गुंतवणूक करण्याची तयारी दर्शवली आहे. या प्रकल्पामुळे ६,८२५ तरुणांना कामाच्या संधी उपलब्ध होतील. गडचिरोलीत हरिओम पाईप इंडस्ट्रीज लि. ३,१३५ कोटींची गुंतवणूक करून ८,००० जणांना रोजगार देणार आहे, तर रश्मी मेटलर्जिकल इंडस्ट्रीज प्रा. लि. तब्बल ४०,००० कोटी रुपयांची भव्य गुंतवणूक करणार आहे. या एकाच प्रकल्पामुळे २०,००० तरुणांच्या हाताला काम मिळणार आहे. भंडारा जिल्ह्यातही अशोक लेलँड १०,००० कोटींची गुंतवणूक करणार आहे.

◀(तभा वृत्तसेवा)



**विचारपुष्प**



हिंदू समाज जगभर पसरलेला आहे. त्यामुळे हिंदुत्व जर परिपुष्ट झाले तरच या संपूर्ण हिंदू समाजाचा आपोआपच फायदा होईल. ज्याच्या फांद्या दूरवर पसरल्या आहेत त्या वृक्षाच्या सर्व अंगांचे पोषण व्हावे म्हणून त्याच्या फक्त मुळाला पाणी देण्याचीच आवश्यकता आहे.

**- शंकरराव तत्त्ववादी**
रा. स्व. संघाचे भूतपूर्व विश्व विभाग प्रमुख

## महत्त्वाचे

### सरकारी कर्मचाऱ्यांचा संप कायम; चर्चा निष्फळ

**मुंबई :** राज्य सरकारी कर्मचारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी पुकारलेला बेमुदत संप आजही सुरूच राहिला. आपल्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी समन्वय समितीने २१ एप्रिलपासून आंदोलनाचे हत्यार उपसले असून, आज मंत्रालयात मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासोबत झालेली चर्चा कोणताही ठोस निर्णय न निघाल्यामुळे निष्फळ ठरली आहे. गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या १८ मागण्यांसाठी कर्मचारी आक्रमक झाले आहेत. यामध्ये सुधारित निवृत्ती वेतन योजना लागू करणे आणि रिक्त पदांची तातडीने भरती करणे या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे. या संपामुळे राज्यभरातील शासकीय कार्यालयांचे कामकाज विस्कळीत झाले असून, सामान्य नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. आजच्या बैठकीत चर्चेदरम्यान सकारात्मक वातावरण असल्याचे दिसून आले असले, तरी मागण्यांबाबत कोणताही अंतिम निर्णय अद्याप जाहीर झालेला नाही. प्रशासनाच्या वतीने या चर्चेचे अधिकृत इतिवृत्त गुरुवारी संघटनांना उपलब्ध करून दिले जाणार आहे. ■

### राहुल गांधींविरोधातील मानहानी प्रकरणाचा निकाल राखून

**सुल्तानपूर :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याशी संबंधित एका मानहानीच्या खटल्यात बुधवारी युक्तिवाद झाला असून, स्थानिक आमदार-खासदार न्यायालयाने आपला आदेश २ मे रोजीपर्यंत राखून ठेवला आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.विशेष न्यायालयासमोर झालेल्या सुनावणीचे मुख्य लक्ष सीआरपीसीच्या कलम ३११ अन्वये दाखल करण्यात आलेल्या अर्जावर केंद्रित होते. या कलमानुसार खटल्याच्या कोणत्याही टप्प्यावर जर न्यायालयाला एखाद्या साक्षीदाराची साक्ष निष्पक्ष निर्णयासाठी आवश्यक वाटते, तर त्या साक्षीदाराला बोलावण्याचा किंवा पुन्हा बोलावण्याचा अधिकार न्यायालयाला प्राप्त होतो.

### गुंतवणूकदारांना आयटीचा दणका; सलग तीन दिवसांच्या तेजीला ब्रेक

**मुंबई :** रितेश-जेनेलिया करणार एसटी आणि रस्ता सुरक्षेचा प्रवास भारतीय शेअर बाजारात गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या तेजीला बुधवारी ब्रेक लागला. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपन्यांच्या समभागांमध्ये झालेली मोठी विक्री आणि जागतिक भूराजकीय तणावामुळे निर्माण झालेली अनिश्चितता याचा फटका बाजाराला बसला. यामुळे दोन्ही प्रमुख निर्देशांक सुमारे १ टक्क्याने घसरले. जागतिक बाजारातील कमकुवत संकेतांमुळे बाजाराची सुरुवातच मोठ्या घसरणीसह झाली. सत्राच्या सुरुवातीला सेन्सेक्स २५0 अंकांहून अधिक घसरला, तर निफ्टीने २४,५00 चा स्तर ओलांडून खाली झेप घेतली. व्यवहारादरम्यान विक्रीचा दबाव अधिक वाढल्याने निफ्टी २४,३५२.९0 च्या नीचांकी स्तरावर पोहोचला. तथापि, सत्राच्या उत्तरार्धात एफएमसीजी, रिअल्टी आणि मेटल क्षेत्रातील निवडक शेअर्समध्ये खरेदीचा ओढा दिसून आला. दिवसभराचा व्यवहार संपला तेव्हा सेन्सेक्स ७५६.८४ अंकांच्या 0.९५ टक्क्यांच्या घसरणीसह ७८,५१६.४९ वर बंद झाला. दुसरीकडे, निफ्टी १९८.५ अंकांनी 0.८१ टक्क्यांनी घसरून २४,३७८.१0 वर स्थिरावला.?

# इराणने जप्त केले भारतात येणारे मालवाहू जहाज

### एकूण तीन जहाजांवर गोळीबार व कारवाई

◆ **तेहरान, २२ एप्रिल**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शस्त्रसंधीचा काळ दोन आठवड्यांनी वाढवल्यानंतर काही तासांतच बुधवारी इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड्सने हल्ला करून दोन जहाजे ताब्यात घेतली. यात गुजरातला जाणाऱ्या मालवाहू जहाजाचा समावेश आहे.

ऊर्जेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मार्ग असलेल्या होर्मुझमधील जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या भारताचा ध्वज लावलेल्या दोन जहाजांवर हल्ला झाल्यामुळे इराण आणि भारतातील तणाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पनामाचा ध्वज असलेले एमएससी फ्रान्सेका आणि लायबेरियाचा ध्वज असलेले ईपामिनोंडास ही दोन जहाजे आता आयआरजीसीच्या ताब्यात असून, त्यांना इराणमध्ये नेण्यात आल्याचे वृत्त इराणमधील सरकारी



दूरचित्रवाणीने दिले आहे. ग्रीकच्या मालकीची युफोरिया या तिसऱ्या नौकेलाही लक्ष्य करण्यात आले. ही नौका सध्या इराणच्या किनाऱ्यालगत अडकून पडली आहे.

### इराणच्या ३४ जहाजांनी फोडला अमेरिकेचा वेढा

होर्मुझ सामुद्रधुनीवर अमेरिकेचे पूर्ण नियंत्रण आहे. नाकेबंदीची रणनीती प्रचंड यशस्वी ठरली आणि इराणसोबत एखादा अंतिम करार होईपर्यंत ही निर्बंधबंदी उठवली जाणार नाही, असा दावा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. मात्र, इराणशी संबंध असलेल्या किमान ३४ जहाजांनी अमेरिकीचा वेढा फोडला, अशी माहिती समोर आली. ■

सागरी वाहतुकीच्या माहितीनुसार, ईपामिनोंडास गुजरातच्या मुंद्रा बंदराच्या दिशेने जात होते. हे जहाज दुबई येथून येत होते. या जहाजांकडे आवश्यक परवानगी नव्हती आणि त्यांनी नेव्हिगेशन प्रणालीत फेरफार करून सागरी सुरक्षेला धोका निर्माण केला, असा दावा इराणी नौदलाने केला.

◀(वृत्तसंस्था)

# बारामतीत आज मतदान



### ४७८ मतदान केंद्र सज्ज

◆ **बारामती, २२ एप्रिल**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता मतदानास सुरुवात होणार आहे. यासाठी एकूण ४७८ मतदान केंद्रे आहेत, यापैकी मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या उद्देशाने विविध संकल्पनांवर आधारित पाच विशेष मतदान केंद्रे उभारण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी उत्तम दिघे यांनी दिली.

यामध्ये केंद्र क्रमांक १२१, मुलींचे शासकीय वसतिगृह, एमआयडीसी येथे 'पिंक मतदान केंद्र' तयार करण्यात आले आहे. तसेच केंद्र क्रमांक २६१, राधेश्याम अग्रवाल ज्युनिअर कॉलेज, बारामती येथे 'आदर्श मतदान केंद्र', केंद्र क्रमांक २२५, जिल्हा परिषद शाळा, पिंपरी येथे 'युवा मतदान केंद्र', केंद्र क्रमांक २५८, जिल्हा परिषद शाळा, माळेगाव येथे 'दिव्यांग मतदान केंद्र' आणि केंद्र क्रमांक ४७, जिल्हा परिषद शाळा, डोर्लेवाडी येथे 'युनिक मतदान केंद्र' उभारण्यात आले आहे. सर्व मतदान केंद्रांवर मतदारांसाठी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे व सावलीची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय ज्येष्ठ नागरिकांसाठी विश्रांतीची सोय, महिलांसाठी पाळणाघर तसेच दिव्यांगांसाठी व्हीलचेअर व रॅम्पची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पात्र मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करून लोकशाहीतील आपले कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन श्री. दिघे यांनी केले आहे.

◀(तभा वृत्तसेवा)

### पश्चिम बंगालमध्ये आज पहिला टप्पा

◆ **कोलकाता, २२ एप्रिल**

पश्चिम बंगालमध्ये गुरुवारी १५२ जागांवर मतदान होणार आहे. आयोगाने शांततापूर्ण मतदानासाठी सर्व तयारी पूर्ण केली आहे. केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाची एकूण २,४०७ पथके तैनात करण्यात आली आहेत. सर्व मतदान केंद्रांवर वेबकास्टिंगची व्यवस्था करण्यात आली आहे. आयोगाने स्पष्ट केले की, मतदारांना मतदान केंद्रांपर्यंत पोहोचण्यापासून रोखण्याचे प्रयत्न खपवून घेतले जाणार नाहीत. सर्व



समाजकंटकांवर कठोर कारवाई केली जाईल. खबरदारीचा उपाय म्हणून, संशयित व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले आहे. सीमावर्ती भागांमध्ये पाळत वाढवण्यात आली आहे. जलद प्रतिसाद पथकेही तैनात करण्यात आली आहेत. सर्व मतदान केंद्रांवर मूलभूत सुविधा पुरवण्यात आली आहे. मतदारांसाठी मतदान केंद्राच्या प्रवेशद्वाराबाहेर मोबाईल जमा करण्याची सुविधाही उपलब्ध करून दिली आहे. तसेच मतदारांना मतदार यादीतील त्यांचा बूथ क्रमांक आणि अनुक्रमांक शोधण्यात मदत करण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रावर मतदार सहाय्यता बूथ उभारण्यात आले आहेत.

◀(वृत्तसंस्था)




वर्षभरापूर्वी काश्मीर खोऱ्यातील बैसरण खोऱ्यात पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांचा क्रूर चेहरा जगासमोर आला. पर्यटनासाठी गेलेल्या नागरिकांपैकी केवळ हिंदूंनाच वेगळे करून दहशतवाद्यांनी अगदी जवळून गोळ्या झाडल्या. यामध्ये २६ नागरिकांचे प्राण गेले. या घटनेचा निषेध करण्यासाठी बुधवारी अनंतनाग येथे भाजपा नेते सोफी युसूफ, लतीफ अहमद खान यांच्यासह कार्यकर्त्यांनी मोर्चा काढत काळा दिवस पाळला

# होर्मुझमधील तणावाचा भारतीय सुरक्षेवर परिणाम

### संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांचे प्रतिपादन

### जर्मन संसदेच्या स्थायी समितीला केले संबोधित

◆ **नवी दिल्ली, २२ एप्रिल**

होर्मुझ सामुद्रधुनीतील अडथळे ही बाब दूरची नाही. ते एक कठोर वास्तव आहे. याचे भारताच्या सुरक्षा आणि आर्थिक स्थैर्यावर थेट परिणाम होत आहेत, असे प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी पश्चिम आशियात सध्या सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर केले.

### मध्यस्थीचे दिले संकेत



भारताने यापूर्वीही शांततेसाठी प्रयत्न केले आहेत. प्रत्येक गोष्टीची एक योग्य वेळ असते. भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते की, भारत या संघर्षात मध्यस्थीची भूमिका बजावेल आणि त्यात यशही मिळवू शकेल, असे इराण-अमेरिकी युद्धात भारत मध्यस्थीची भूमिका पार पाडू शकत असल्याचे संकेत राजनाथसिंह यांनी दिले. ■

आज जगासमोर सुरक्षेचे नवीन धोके उभे ठाकले आहेत आणि तांत्रिक परिवर्तनामुळे ही परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची व परस्परांशी सखोलपणे जोडलेली बनली आहे, असे त्यांनी संरक्षण आणि सुरक्षेशी संबंधि जर्मन संसदेच्या स्थायी समितीला संबोधित करताना सांगितले. ते तीन दिवसांच्या जर्मन दौऱ्यावर आहेत.

बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची तयारी असलेला एक नवीन दृष्टिकोन ही काळाची गरज आहे, असे राजनाथसिंह यांनी सांगितले. भारत आणि जर्मनी यांच्या औद्योगिक परिसंस्थांमधील सहकार्य आणखी वाढावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. पश्चिम आशियातील संघर्ष जवळपास ५० पेक्षा जास्त दिवसांपासून सुरू असून, त्याचे जागतिक पडसाद उमटत असताना राजनाथसिंह जर्मन दौऱ्यावर आहेत.

◀(वृत्तसंस्था)

# लालपरीला आता ग्लॅमरचा तडका!

## रितेश-जेनेलिया करणार एसटी आणि रस्ता सुरक्षेचा प्रवास

◆ **मुंबई, २२ एप्रिल**

महाराष्ट्र राज्याची जीवनवाहिनी असलेल्या एसटी महामंडळाच्या जनजागृती मोहिमेला आता अभिनयाची आणि लोकप्रियतेची नवी जोड मिळणार आहे. एसटीच्या बदलत्या स्वरूपाची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि रस्ता सुरक्षा अभियानाला गती देण्यासाठी लोकप्रिय अभिनेते रितेश देशमुख आणि अभिनेत्री जेनेलिया देशमुख यांची पुढील पाच वर्षांसाठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मंत्रालयात पार पडलेल्या एका विशेष सोहळ्यात या निर्णयावर अधिकृत शिक्कामोर्तब करण्यात आले असून, या निमित्ताने लालपरीच्या प्रवासाला आता ग्लॅमरचा तडका मिळाला आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर आयोजित करण्यात आलेल्या या दिमाखदार सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत या कराराचे हस्तांतरण करण्यात आले. यावेळी परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.







रितेश आणि जेनेलिया ही जोडी केवळ एसटीच्या योजनांची माहिती देणार नाही, तर परिवहन विभागाच्या रस्ता सुरक्षा अभियानाचा चेहरा म्हणूनही काम पाहणार आहे.

रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करणे आणि सुरक्षित प्रवासाचा संदेश घराघरात पोहोचवणे ही या नियुक्तीमागची मुख्य भूमिका आहे.

रितेश आणि जेनेलिया यांची जनसामान्यांमधील लोकप्रियता, त्यांची स्वच्छ प्रतिमा आणि मराठी मातीशी असलेले त्यांचे नाते लक्षात घेऊन राज्य सरकारने ही निवड केली आहे. पुढील पाच वर्षांच्या कालावधीत ही जोडी विविध जाहिराती, सामाजिक संदेश आणि जनजागृती मोहिमांच्या माध्यमातून एसटी प्रवाशांशी संवाद साधताना दिसणार आहेत. ◀(तभा वृत्तसेवा)




CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### गेले लोणावळ्याला; निघाला खंडाळा!

**पुणे** : डोंगराळ प्रदेशातील हिरव्या झाडांच्या गर्द सावलीत, खळखळ वाहणारे झरे पाहून पर्यटक निसर्ग सौंदर्य अनुभवायला लोणावळा सहलीचे नियोजन करतात. महाराष्ट्रासह देशभरातून लोणावळ्यात पर्यटक आनंद घेण्यासाठी येतात. मात्र, गत काही दिवसांत लोणावळ्याच्या नावाने पर्यटकांची ऑनलाईन फसवणूक होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मुंबईतील एका पर्यटकाने ऑनलाईन व्हिला बुकींग गेला, मात्र त्या जागेवर कुठलाही बंगला नसल्याचे प्रत्यक्ष तिथे पोहोचवल्यावर उघडकीस आल्याने आपली फसवणूक झाल्याचे पर्यटकाच्या लक्षात आले. पर्यटकांना लोणावळ्याचे सौंदर्य नव्हे तर खंडाळ्याचे उघडेबोडखे पर्वत दिसून आले. देशभरात पर्यटन नगरी म्हणून असलेल्या लोणावळ्यात पर्यटकांची फसवणूक करणारा ऑनलाईन व्हिला बुकिंग स्कॅम उघडकीस आल्यामुळे खळबळ उडाली आहे. थंड हवेच्या ठिकाणाचा आनंद घेण्यासाठी दरवर्षी हजारो पर्यटक लोणावळ्यात दाखल होतात. मात्र, आता याच पर्यटकांना लक्ष्य करत सोशल मीडियावर आकर्षक व्हिला आणि बंगल्यांचे फोटो टाकून ऑनलाइन भामटे सक्रिय झाले आहेत. बुकिंगच्या नावाखाली २० ते २५ हजार रुपयांपर्यंत आगाऊ रक्कम घेतली जाते. ■

### लुफ्थांसाच्या वीस हजार विमान फेऱ्या रद्द

**नवी दिल्ली** : हवाई इंधनाच्या वाढत्या किंमती आणि हॉर्मुझ नाकेबंदीमुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. या पार्श्वभूमीवर जर्मनीची प्रमुख एअरलाईन लुफ्थांसाने इंधनाचा खर्च नियंत्रित करण्यासाठी तब्बल २० हजार विमान फेऱ्या रद्द केल्या आहेत. याबाबत एअरलाईनने अधिकृत घोषणा केली आहे. मध्य पूर्वेतील युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किंमतीत सुरू असलेल्या चढ उतरामुळे जागतिक विमान वाहतूक क्षेत्रासमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. वाढत्या तणावामुळे हवाई इंधनाचे दर विक्रमी पातळीवर पोहोचले आहे. त्यामुळे महागड्या दरात उड्डाणे चालवणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याचे लुफ्थासाने स्पष्ट केले आहे. एअरलाईनने आपली आर्थिक स्थिती संतुलित करण्यासाठी ही रणनीती अवलंबली आहे. या निर्णयाचा परिणाम केवळ युरोपवरच होणार नाही तर तो भारत, आशिया आणि अमेरिकेला जाणाऱ्या प्रवाशांवरही होणार आहे.

### विदर्भात चार दिवस अवकाळीचा धडाका

**पुणे** : राज्यात कडाक्याच्या उन्हाचा चटका जाणवत असतानाच आता निसर्गाने आपले रूप बदलले असून, पुढील चार दिवस विदर्भातील विविध भागांत वादळी वाऱ्यासह गारपिटीची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. पुणे हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एस. डी. सानप यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारपासून चार दिवस दक्षिण मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. या काळात केवळ पाऊसच नव्हे, तर सोसाट्याचा वारा आणि काही ठिकाणी गारपीट पडण्याचा अंदाज आहे. मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, परभणी, बीड आणि विदर्भातील चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर अधिक राहण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, विदर्भात एकीकडे तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्या पुढेच असून, पावसाच्या शक्यतेने विदर्भवासीयांना एकाच वेळी उष्णतेची लाट आणि वादळी पाऊस अशा दुहेरी हवामानाचा सामना करावा लागणार आहे. शेतकऱ्यांसाठी हा पाऊस चिंतेचा विषय ठरू शकतो, कारण गारपिटीमुळे पिकांचे नुकसान होण्याची भीती आहे.

### आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री एन.भास्कर राव यांचे निधन

**हैदराबाद** : अविभाजित आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री एन.भास्कर राव यांचे बुधवारी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. आंध्रमधील विद्यमान मंत्री आणि जनसेना पक्षाचे नेते नादेंदा मनोहर यांचे ते वडील होत. वृद्धापकाळामुळे विविध व्याधींनी ग्रस्त राव यांना हैदराबादमधील रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिथेच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. दिग्गज नेते दिवंगत एन.टी.रामा राव (एनटीआर) यांनी स्थापन केलेल्या तेलगू देसम पक्षाचे (टीडीपी) भास्कर राव सहसंस्थापक मानले जातात. एनटीआर यांच्या नेतृत्वाखालील आंध्र सरकारमध्ये भास्कर राव मंत्री होते. त्यांनी नंतर वर्ष १९८४ मध्ये एनटीआर यांच्या विरोधातील राजकीय बंडाचे नेतृत्व केले. सत्तापालटानंतर स्वत: भास्कर राव मुख्यमंत्री बनले. मात्र, त्यांचे मुख्यमंत्रिपद केवळ महिनाभरच टिकले. २०१९ मध्ये त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश केला. भास्कर राव यांच्या निधनाबद्दल सर्वपक्षीयांनी दु:ख व्यक्त केले. त्यांच्या पार्थिवावर हैदराबादमध्ये २४ एप्रिलला अंत्यसंस्कार केले जातील. ■

# ममतांच्या कृतीमुळे लोकशाही धोक्यात

## आयपॅक प्रकरणाच्या सुनावणीत सुप्रीम कोर्टाचा संताप

◆ **नवी दिल्ली, २२ एप्रिल**

केंद्रीय तपास यंत्रणेच्या चौकशीत थेट हस्तक्षेप करून पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी लोकशाहीलाच धोक्यात टाकले. हे योग्य नाही, असा संताप सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी आयपॅक प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान व्यक्त केला. राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानाच्या एक दिवस आधी न्यायालयाची संतप्त टिप्पणी समोर आली आहे.

तृणमूल काँग्रेससोबत काम करणाऱ्या 'इंडियन पॉलिटिकल ॲक्शन कमिटी' (आयपॅक) या राजकीय सल्लागार संस्थेच्या कार्यालयांमध्ये सुरू असलेल्या



तपास आणि झडती मोहिमांमद्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि राज्यातील अधिकारी हस्तक्षेप करीत असल्याचा आरोप अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने केला आहे. मनी लॉण्ड्रिंगमधील तपासाचा एक भाग म्हणून ईडीने जानेवारीत छापेमारी केली होती.

हा राज्य आणि केंद्रातील वाद नाही. कोणत्याही राज्याच्या मुख्यमंत्र्यांना एखाद्या चौकशीच्या प्रक्रियेत थेट हस्तक्षेप करून लोकशाहीला संकटात टाकता येत नाही आणि त्यानंतर याचे रूपांतर राज्य व केंद्र यांच्यातील वादात करू नका, असे म्हणता येत नसल्याचे न्यायालयाने म्हटले. ईडीची छापेमारी सुरू असताना ममता बॅनर्जी राज्यातील अधिकाऱ्यांना सोबत घेऊन आल्या आणि आयपॅकचे कार्यालय तसेच त्याचे संस्थापक प्रतीक जैन यांच्या निवासस्थानी प्रवेश केला आणि तिथून लॅपटॉप, फोन व अनेक दस्तावेज सोबत घेऊन बाहेर पडल्या, अशी माहिती तपास यंत्रणेने दिली. हे स्वतःच असे एक कृत्य आहे, योगायोगाने मुख्यमंत्री असलेल्या व्यक्तीने केले. यामुळे संपूर्ण लोकशाहीच धोक्यात आली आहे, असे न्यायालयाने अधोरेखित केले. हे छापे राजकीय हेतूने प्रेरित असून, निवडणुकांपूर्वी तृणमूल काँग्रेसला कमकुवत करण्याच्या उद्देशाने टाकण्यात आले होते, असा दावा राज्याने केला होता.

◀(वृत्तसंस्था)

### संविधानाच्या निर्मात्यांनी दर्शवली असती नापसंती

संविधानाच्या निर्मात्यांनी या कृतीवर निश्चितच नापसंती दर्शवली असती. तुम्ही आम्हाला पी. एच. सीरवाई आणि डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या लेखनाचा संदर्भ दिला. परंतु, या देशात अशी परिस्थिती कधी उद्भवेल की ज्यामध्ये सुरू असलेल्या चौकशीदरम्यान पदावर असलेला मुख्यमंत्री थेट कार्यालयात चालत जाईल, याची कल्पनाही त्यापैकी कुणी केली नसेल, असे न्यायालयाने नमूद केले. ■

# बंगालमध्ये भाजपाचा भगवा फडकणार?




**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, २२ एप्रिल**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील पहिल्या टप्प्याचे मतदान गुरुवार २३ एप्रिलला होत आहे. २९४ पैकी १५२ विधानसभा मतदारसंघात गुरुवारी मताधिकार बजावला जाणार आहे.

राज्यात यावेळी भाजपा, काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि डावे पक्ष रिंगणात असले तरी खरी आणि चुरशीची लढत भाजप आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात आहे. तृणमूल काँग्रेस चौथ्यांदा निवडणूक जिंकणार की भाजप राज्यात पहिल्यांदा भगवा फडकवणार, याबाबत उत्सुकता वाढली आहे.

१९८० मध्ये भाजपाची स्थापना झाल्यावर १९८२ मध्ये पश्चिम बंगालमधील पहिली विधानसभा निवडणूक भाजपाने लढवली, यावेळी ५२ जागा भाजपाने लढवल्या, पण त्याला एकही जागा जिंकता आली नाही. ०.५८ टक्के मते यावेळी भाजपाला मिळाली.

१९८७ च्या दुसऱ्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने आपले ५७ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवले, यावेळीही भाजपाला आपले खाते उघडता आले नाही. भाजपाची मतांची टक्केवारी ०.५१ टक्के होती.

राम जन्मभूमी आंदोलनाच्या लाटेत १९९१ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने प्रथमच राज्यातील सर्व म्हणजे २९१ मतदारसंघात उमेदवार उतरवले. यावेळीही भाजपाला आपले खाते उघडता आले नसले तरी राज्यातील भाजपाच्या मतांत लक्षणीय वाढ झाली. भाजपाला ११.३४ टक्के मते मिळाली.

१९९६ च्या विधानसभा निवडणुकीतही भाजपाने राज्यातील २९२ विधानसभा मतादरसंघात उमेदवार उभे केले, यावेळीही भाजपा खाते उघडू शकली नाही, भाजपाच्या मतांच्या टक्केवारीत घट होत ती ६.४५ टक्क्यावर आली.

२००१ ची विधानसभा निवडणूक भाजपाने जनता दल संयुक्त, समता पक्ष आणि लोकजनशक्ती पक्ष यांच्याशी आघाडी करुन लढवली, यात भाजपाच्या २६६ जागांचा समावेश होता. यावेळी भाजपाला आपले खाते उघडता आले नाही.

आज एकदुसऱ्याचे कट्टर राजकीय विरोधक असलेल्या भाजपा आणि तृणमूल काँग्रेसने २००६ ची विधानसभा निवडणूक एकत्रित लढवली, हे सांगितले तर आश्चर्य वाटेल. तृणमूल काँग्रेसने २५७ तर भाजपाने २९ जागा लढवल्या. यावेळी तृणमूल काँग्रेसने ३० जागा जिंकल्या, तर भाजपाला पुन्हा भोपळा मिळाला, भाजपाच्या मतांची टक्केवारी १.९३ टक्के होती.

२०११ ची विधानसभा निवडणूक भाजपाने पुन्हा रालोआतर्फे लढवली, २८८ जागा भाजपाने लढवल्या, अखिल झारखंड विद्यार्थी संघटना, गोरखा जनमुक्ती मोर्चा आणि काही अपक्ष भाजपासोबत होते. यावेळीही भाजपाला एकही जागा जिंकता आली नसली तर गोरखा जनमुक्ती मोर्चाचे तीन तर एक अपक्ष असे रालोआचे चार आमदार निवडून आले. भाजपाला ४.०६ टक्के मते मिळाली. ■

## २०१६ मध्ये भाजपाने उघडले खाते

◆ **नवी दिल्ली, २२ एप्रिल**

२०१६ ची विधानसभा निवडणूक पश्चिम बंगालमध्ये भाजपाने गोरखा जनमुक्ती मोर्चातर्फे लढवली, यात भाजपाने २९१ तर मोर्चाने ३ जागा लढवल्या. भाजपाने प्रथमच राज्यात ३ जागा जिंकत आपले खाते उघडले. भाजपाला १०.१६ टक्के मते मिळाली. गोरखा जनमुक्ती मोर्चाने आपल्या ३ जागा कायम ठेवल्या.

२०२१ च्या विधानसभा निवडणुकीने राज्यात भाजपाची ताकद वाढली. भाजपाने २९३ तर मित्रपक्ष अखिल झारखंड विद्यार्थी संघटनेने १ जागा लढवली. भाजपाने ७७ जागा जिंकत राज्यात इतिहास घडवला. भाजपाच्या मतांची टक्केवारीत २७.८१ टक्क्याने वाढ होत ती ३७.९७ टक्के झाली. भाजपाच्या जागात ७४ ने वाढ झाली.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने राज्यातील सर्व म्हणजे ४२ जागा लढवत दुप्पट म्हणजे दोन जागा जिंकल्या. भाजपाला १६.८४ टक्के मते मिळाली. मागील निवडणुकीच्या तुलनेत भाजपाच्या मतांत १० टक्क्याने वाढ झाली.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने ४२ जागा लढवत विक्रमी म्हणजे १८ जागा जिंकल्या, राज्यातील भाजपाची ही सर्वोत्तम कामगिरी होती. भाजपाला ४०.२५ टक्के मते मिळाली. भाजपाच्या मतांत २३.४१ टक्क्याने वाढ झाली. २२ जागा जिंकणाऱ्या तृणमुल काँग्रेसला ४३.२८ टक्के मते मिळाली. काँग्रेसला दोन जागांवर समाधान मानावे लागले. काँग्रेसला ५.६१ टक्के मते मिळाली.

२०२४ मध्ये ४२ जागा लढवणाऱ्या भाजपाला १२ जागा जिंकता आल्या, भाजपाच्या ६ जागा कमी झाल्या, तरी भाजपाला ३९.१० टक्के मते मिळाली. म्हणजे भाजपाच्या मतांच्या टक्केवारीत १.१५ टक्क्याने घट झाली. ४२ जागा लढवणाऱ्या तृणमूल काँग्रेसने २९ जागा जिंकल्या, त्या पक्षाला ४६. २० टक्के मते मिळाली. तृणमुल काँग्रेसची मतांत ३ टक्क्याने वाढ झाली. बारा जागा लढवणाऱ्या काँग्रेसला यावेळी फक्त एक जागा जिंकता आल, त्या पक्षाच्या मतांची टक्केवारी ४.७० होती.

◀(तभा वृत्तसेवा)

# मालेगाव स्फोटातील चार आरोपींवरील आरोप रद्द

## मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय ●तपास आणि पुराव्यांवर पुन्हा प्रश्नचिन्ह

◆ **नाशिक, २२ एप्रिल**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात मोठा घडामोडींचा टप्पा गाठत मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे. २००६ मध्ये झालेल्या स्फोट प्रकरणातील चार आरोपींना न्यायालयाने मोठा दिलासा दिला असून, त्यांच्याविरोधात निश्चित केलेले आरोप रद्द केले आहेत. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून सुरू असलेला खटला आता संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. न्यायालयाच्या या आदेशानंतर या प्रकरणातील तपास आणि पुराव्यांवर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या प्रकरणात राजेंद्र चौधरी, धानसिंह, लोकेश शर्मा आणि मनोहर नरवारीया या चार आरोपींचा समावेश होता. सत्र न्यायालयाने यांच्यावर हत्या, गुन्हेगारी कट रचणे



तसेच बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत आरोप निश्चित केले होते. मात्र, या आदेशाला आरोपींनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यानंतर सुनावणीदरम्यान न्यायालयाने सादर केलेल्या पुराव्यांचा आणि तपास प्रक्रियेचा सखोल आढावा घेतला. अखेर पुरावे अपुरे असल्याचे नमूद करत सत्र न्यायालयाचा आदेशच रद्द करण्यात आला. सुनावणीदरम्यान राष्ट्रीय तपास यंत्रणेकडून एकही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सादर करण्यात आला नाही, ही बाब न्यायालयाच्या निर्णयात महत्त्वाची ठरली. घटनेचा प्रत्यक्ष अनुभव सांगणारा साक्षीदार नसल्यामुळे आरोपांची पायाभूत रचना कमकुवत ठरल्याचा मुद्दा आरोपींच्या वकिलांनी मांडला होता.

◀(वृत्तसंस्था)

### अखेर न्याय मिळाला

या निर्णयानंतर आरोपींनी न्यायालयाचे आभार मानले असून, आम्हाला उशिरा का होईना पण न्याय मिळाला, अशी प्रतिक्रिया दिली. १७ वर्षांनंतर या प्रकरणाचा निकाल लागल्याने संबंधित कुटुंबीय आणि समाजातही विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. या स्फोटांमध्ये अनेक कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले होते. त्यामुळे न्यायालयाच्या या निर्णयानंतर आता पुढे काय घडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ■

## इंजिनीअर रशीद यांच्या जामिनावर निर्णय राखून

◆ **नवी दिल्ली, २२ एप्रिल**

दहशतवादी निधी प्रकरणातील आरोपी आणि खासदार इंजिनीअर रशीद यांच्या अंतरिम जामीन अर्जावरील निर्णय दिल्ली न्यायालयाने राखून ठेवला आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश प्रशांत शर्मा यांनी २४ एप्रिलला निकाल देण्याचे आदेश दिले आहेत.

इंजिनीअर रशीद यांनी याचिका दाखल केली आहे. त्यात म्हटले आहे की, त्यांचे वडील आजारी असून व्हेंटिलेटरवर आहेत. सुनावणीदरम्यान, एनआयएच्या वकिलाने युक्तिवाद केला की त्यांना कोठडीतील पॅरोलवर सोडले जाऊ शकते.

यापूर्वी, न्यायालयाने इंजिनिअर रशीद यांना कोठडीत असताना संसदेच्या संपूर्ण अधिवेशनात उपस्थित राहण्याची परवानगी दिली होती. तसेच सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या उपराष्ट्रपती निवडणुकीतही रशीद यांना मतदान करण्याची परवानगी देण्यात आली होती.

◀(वृत्तसंस्था)

# मराठी शिकावीच लागणार

### सरनाईक यांची आक्रमक भूमिका कायम

◆ **मुंबई, २२ एप्रिल**

महाराष्ट्रात व्यवसाय करणाऱ्या रिक्षा, टॅक्सी तसेच ओला, उबर आणि ई-बाईक टॅक्सी चालकांनी प्रवाशांशी मराठीतूनच संवाद साधणे आता अनिवार्य होणार आहे. २०१९ मधील शासन निर्णयाची अनेक वर्षांपासून होत असलेली उपेक्षा आता संपुष्टात येणार असून, राज्य शासनाने या निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कडक पावले उचलली आहेत.

कलाकारांनीच नव्हे, तर प्रत्येक व्यावसायिक चालकानेही मराठीचा सन्मान राखूनच संवाद साधला पाहिजे, असे मत अभिनेते रितेश देशमुख यांनी व्यक्त केले आहे. मुंबईसह राज्यातील मोठ्या शहरांमध्ये परप्रांतीय वाहनचालकांची संख्या मोठी आहे. मात्र, अनेकांना मराठी भाषेची साधी जाणही नसल्याने प्रवाशांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी वारंवार पुढे येत आहेत.

याच पार्श्वभूमीवर परिवहन विभागाने हा विषय गांभीर्याने घेतला आहे. या निर्णयाची रूपरेषा आणि प्रशिक्षणाचा आराखडा ठरवण्यासाठी उद्या, २४ एप्रिल रोजी दुपारी ११ वाजता परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात महत्त्वाची बैठक होणार आहे. यात परिवहन आयुक्तांसह राज्यातील दिग्गज साहित्यिक, भाषा तज्ज्ञ आणि प्रशासकीय अधिकारी सहभागी होणार आहेत. वाहनचालकांना मराठीचे प्राथमिक शिक्षण देण्यासाठी विशेष अभ्यासक्रम तयार करण्यावर या बैठकीत मुख्यत्वे चर्चा होणार आहे.

◀(वृत्तसंस्था)



पश्चिम बंगालमध्ये गुरुवारी पहिल्या टप्प्यासाठी मतदान होणार असले तरी दुसऱ्या टप्प्यासाठीचा प्रचार जोरात सुरू आहे. सप्तग्राम येथे झालेल्या प्रचारसभेदरम्यान नागरिकांशी संवाद साधताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

### बिबट्याच्या हल्ल्यात चिमुकला ठार

**ठाणे** : शहापूर तालुक्यातील वनपरिक्षेत्रातील कळभोंडा येथे बिबट्याच्या हल्ल्यात एक आठ वर्षांचा मुलगा ठार झाला. तो आंबे आणण्यासाठी शेतात गेला असता दबा धरुन बसलेल्या बिबट्याने चिमुकल्यावर झडप घातली. या हल्ल्यात तो जागीच ठार झाला. या घटनेमुळे गावकऱ्यांमध्ये संतापाची लाट आहे. कृष्णा भागवत अगीवले, असे मृत मुलाचे नाव आहे. कृष्णा गुरुवारी सकाळी मित्रांसोबत आंबे पाडण्यासाठी शेतात गेला असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्याच्यावर अचानक हल्ला करून त्याला जंगलात ओढून नेले. घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी शोध घेतला असता जंगलात मुलाचा मृतदेह सापडला. त्यानंतर, कसारा पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून पोलिसांनी पंचनामा करत मृतदेह पुढील तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवला. ■

# १२ मंत्री, २२ जिल्हे

## 'स्थानिक' निवडणुकांसाठी शिवसेनेने कसली कंबर

◆ **मुंबई, २२ एप्रिल**

राज्यातील आगामी २२ जिल्हा परिषदा आणि २२५ पंचायत समिती निवडणुकांसाठी शिवसेनेने रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. या निवडणुकांमध्ये पक्षाची ताकद वाढवण्यासाठी संपर्क मंत्री अभियान अधिक व्यापक करण्यात आले असून, १२ मंत्र्यांकडे २२ जिल्ह्यांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नंदनवन निवासस्थानी झालेल्या बैठकीत निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यात आला.

या बैठकीत नेत्यांना थेट लक्ष्य निश्चित करून देण्यात आले आहे. यात महत्त्वाच्या मंत्र्यांकडे जिल्ह्यांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

यामध्ये गुलाबराव पाटील यांच्याकडे जळगाव व नंदुरबार, उदय सामंत यांच्याकडे नाशिक व अहमदनगर, योगेश कदम यांच्याकडे ठाणे व पालघर,



प्रकाश आबिटकर यांच्याकडे नांदेड व हिंगोली, भरतशेट गोगावले यांच्याकडे बीड, आशिष जयस्वाल यांच्याकडे जालना, प्रताप सरनाईक यांच्याकडे अमरावती व अकोला, संजय राठोड यांच्याकडे यवतमाळ व वाशिम, संजय शिरसाट यांच्याकडे भंडारा व गोंदिया, प्रतापराव जाधव यांच्याकडे नागपूर व वर्धा, शंभूराज देसाई यांच्याकडे गडचिरोली व चंद्रपूर, तर दादा भुसे यांच्याकडे धुळे व बुलढाणा या जिल्ह्यांची जबाबदारी देण्यात आली आहे.

या बैठकीला खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आनंदराव अडसुळ, प्रकाश पाटील यांच्यासह पक्षाचे प्रमुख नेते व मंत्री उपस्थित होते.

या मोहिमेमुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कोणत्या पक्षाची काय भूमिका असेल, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

◀(वृत्तसंस्था)

### संघटनात्मक रचनेत सक्रियता आणण्याचे प्रयत्न

निवडणूक यंत्रणा सज्ज ठेवण्यासाठी बीएलए याद्या अद्ययावत करणे, तालुका व विधानसभा स्तरावर प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे आणि जिंकण्याची क्षमता असणाऱ्या उमेदवारांची चाचपणी करणे, अशा सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी संघटनात्मक रचनेत अधिक सक्रियता आणण्याचे ध्येय पक्षाने ठेवले आहे. ■

# मारहाणीत जखमी १८ वर्षीय युवकाचा अखेर मृत्यू

### तिघां आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल -**

सोलापूर - मोठ्या भावाच्या भांडणा मध्ये पडल्याने झालेल्या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या १८ वर्षीय लहान भावाचा उपचारादरम्यान सोलापुरात आज बुधवारी दुपारी मृत्यू झाला.

सुजित सुभाष राठोड (वय १८ वर्ष, रा. लमाण तांडा, बालाजी नगर मंगळवेढा) असे त्या मयत तरुणाचे नाव आहे.यातील मयत सुजित राठोड याचा भाऊ रणजित हा दिव्यांग आहे. सोमवारी सायंकाळी बालाजी नगर येथील गणपती पवार यांच्या हॉटेल समोर शशिकांत शिवाजी पवार हा रणजित याची चेष्टा करीत होता. यातूनच शशिकांत याने रणजित याला मारहाण करण्यास सुरुवात केली. ही माहिती समजताच सुजित हा तेथे आला. भावाला का मारताय असा जाब विचारत असताना शशिकांत पवार, आशिष शिवाजी पवार, सागर राम राठोड



यांनी सुजित याला लाथाबुक्क्यांनी तसेच दगडाने मारहाण केली. सुजित याच्या डोक्यात मार बसल्याने तो जागीच बेशुध्द झाला. त्याला उपचारासाठी मंगळवेढ्यातील खाजगी




दवाखान्यातून सोलापुरातील सी एन एस रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने त्याला आज बुधवारी दुपारी साडेबारा वाजता येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले .

### एकास अटक; आज करणार मंगळवेढा कोर्टात हजर

सुजित राठोड याच्या खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी २१ एप्रिल रोजी रात्री मंगळवेढा पोलीस ठाण्यात शशिकांत बालाजी पवार, आशिष शिवाजी पवार आणि सागर राम राठोड (सर्व रा. बालाजीनगर लमाणतांडा) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता .दरम्यान आज बुधवारी दुपारी सुजित राठोड याचा मृत्यू झाल्यानंतर गुन्ह्याच्या कलमांमध्ये वाढ करून वरील तिघा आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर आरोपी सागर राठोड यास आज बुधवारी अटक करण्यात आली असून त्याला उद्या गुरुवारी मंगळवेढा येथील कोर्टात हजर करण्यात येणार आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास फौजदार नागेश बनकर हे करीत आहेत.



आम्ही जो काही मोर्चा काढला होता तो महिलांसाठीच होता. त्यांचा राग-संताप हा खूपच अनावर झालेला होता. पण यापुढे आम्ही निश्चित अशी काळजी घेऊ. मोर्चा असला, आंदोलन असले की असे प्रकार घडतात याची आपल्याला कल्पना आहे.
- **गिरीश महाजन**, मंत्री


तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, गुरुवार, २३ एप्रिल २०२६






न्यायदेवतेवर आमचा पूर्ण विश्वास होता. अखेर न्यायालयाने मला या आरोपांतून वगळत ईडीच्या कारवाईतून मुक्त केले. या प्रकरणामुळे मला नाहक त्रास सहन करावा लागला, पण आता पुढे काय करायचे हे वेळच ठरवेल.'घायल हूँ, इसलिए घातक हूँ'
- **रोहित पवार**, आमदार, राकाँ. (श.प.)

# अमेरिकेवर इराण भारी?

## लष्करी शक्ती शाबूत असल्याचा पेंटागॉनचा अहवाल

**वॉशिंग्टन, २२ एप्रिल**

इराणची लष्करी क्षमता मोठ्या प्रमाणात मजबूत आहे, असून जमिनीखाली क्षेपणास्त्र आणि ड्रोनचा मोठा साठा आणि लाँचर अगदी सुरक्षित असल्याचा दावा संरक्षण विभागाच्या (पेंटागॉन) अहवालातून करण्यात आला. या अहवालाने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांनी केलेले सर्व दावे फोल असल्याचे समोर आले आहे.

४० दिवसांच्या युद्धात इराणचे नौदल, लष्करी सामर्थ्य उद्ध्वस्त केल्याचा राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि संरक्षण मंत्री हेगसेथ यांनी केला होता, मात्र प्रत्यक्षात इराणची नौदल आणि लष्करी क्षमता अजूनमही मजबूत स्थितीत असल्याचे पेंटागॉनच्या अहवालात म्हटले आहे. अहवालाने ट्रम्प-हेगसेथ यांच्या विधानांवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे आणि एका नवीन वादाला तोंड फुटले आहे. ट्रम्प आणि सहेगसेथ यांनी दावा केला होता की, अलीकडील संघर्षांनंतर इराणच्या लष्कराचे मोठे नुकसान झाले आहे आणि त्याची ताकद लक्षणीयरीत्या कमकुवत झाली आहे. तथापि, पेंटागॉनचा गुप्तचर अहवाल या दाव्यांशी पूर्णपणे असहमत असल्याचे दिसते. अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्यानंतरही इराणचे सशस्त्र दल मजबूत स्थितीत आहे. युद्ध पुन्हा सुरू झाल्यास तीन महिने पुरेल इतका शस्त्रसाठा त्यांच्याकडे उपलब्ध आहे.

(वृत्तसंस्था)



२८ फेब्रुवारीपासून सुरू झालेले युद्ध पावणे दोन महिने होऊनही सुरूच आहे. इराणने भुयारात सुरक्षित ठेवलेले आत्मघाती ड्रोन्स

### काय म्हणाले होते ट्रम्प ?

इराणसोबतच्या शांतता चर्चेच्या दुसऱ्या फेरीपूर्वी, ट्रम्प म्हणाले, आम्ही त्यांचे नौदल, हवाई दल उद्ध्वस्त केले. आम्ही त्यांच्या नेत्यांना हटवले आणि त्यांच्याकडे शरण येण्याशिवाय पर्याय नाही. दुसरीकडे हेगसेथ यांनी सांगितले की, ऑपरेशन फ्युरी अंतर्गत, अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने इराणचा लष्करी औद्योगिक तळ नष्ट केला. त्यांचे लाँचर आणि क्षेपणास्त्र उद्ध्वस्त झाले.

### आखाती देश होऊ शकते बेचिराख

**लांब, मध्यम पल्ल्याची क्षेपणास्त्र आणि ड्रोन जमिनीखाली असलेल्या बोगद्यांमध्ये सुरक्षित आहेत. त्यांचे अनेक लाँचर अजूनही सुरक्षित असून, त्यांची क्षमता आखाती देश बेचिराख करण्याची आहे. त्यांच्या हवाई दलाला काही प्रमाणात नुकसान झाले असले तरी, त्यांची हल्ला करण्याची क्षमता कमी झालेली नाही.**

## चार जनगणना अधिकाऱ्यांना मारहाण

**ढेंकनाल** :ओडिशातील जनगणना अधिकाऱ्यांची सुरक्षा ऐरणीवर आली आहे. राज्यातील चार जनगणना अधिकाऱ्यांवर वडील व मुलाने हल्ला करुन त्यांना बेदम मारहाण केली. ही घटना बुधवारी ढेंकनाल जिल्ह्यातील कामाख्यानगर येथे घडली. अनंतपूर साही येथे एका वडील आणि त्यांच्या दोन मुलांनी चार जनगणना अधिकाऱ्यांना बेदम मारहाण करत त्यांच्या वाहनाची तोडफोड केली. तक्रारीनंतर, कामाख्यानगर पोलिसांनी आरोपी वडील आणि मुलाला अटक करून तपास सुरू केला आहे. महसूल मंत्री सुरेश पुजारी यांनी जिल्हाधिकाऱ्यांना जनगणना अधिकाऱ्यांना सुरक्षा पुरवण्याचे निर्देश दिले आहेत. ढेंकनालमध्ये चार जनगणना अधिकाऱ्यांना मारहाण झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये जनगणना प्रभारी लिपिक रघुनाथ दीक्षित, सर्कल-२ पर्यवेक्षक मधुस्मिता बेहरा आणि कर्मचारी स्वर्णलता साहू व सतीन बिरेन बेहरा यांचा समावेश आहे.

## वक्तृत्व स्पर्धेत प्रांजल नागणे, श्रुती आंबरे प्रथम



**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

लोकमंगल समृद्ध गाव अभियानांतर्गत सावळेश्वर येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये भीम जयंतीचे औचित्य साधून वक्तृत्व स्पर्धेत मोठ्या गटात प्रांजल नागणे व लहान गटात श्रुती आंबरे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

लोकमंगल समूहाचे अध्यक्ष आमदार सुभाष देशमुख यांच्या सुचनेनुसार ही स्पर्धा झाली. मुख्याध्यापक दत्तात्रय माळी व भीमशक्ती तरुण मंडळाचे अध्यक्ष अश्वजीत साबळे, शाळा समिती अध्यक्ष शिवाजी काकडे व विद्यार्थी निवड समितीचे अध्यक्ष पांडुरंग माने यांच्या उपस्थितीमध्ये ही स्पर्धा झाली. सत्कारमूर्तींना सन्मानचिन्हे व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक दत्तात्रय खंडेराव यांनी केले. लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनचे समन्वयक श्यामकुमार भंडारे यांनी आभार मानले.

**अंतिम निकाल** : मोठा गट : प्रांजल दिनकर नागणे, आर्या दामोदर गावडे, ईश्वरी अनिल आवटे. लहान गट : श्रुती सतीष आंबरे, जानवी विकास दुधाळ, अमृता नागनाथ लवटे

## नेपाळचे गृहमंत्री सुदन गुरुंग यांचा राजीनामा

**काठमांडू, २२ एप्रिल**

नेपाळमधील पंतप्रधान बालेन शहा यांच्या सरकारविरोधात नागरिकांचा असंतोष उफाळून आला आहे. भ्रष्टाचाराचा आरोप झाल्याने गृहमंत्री सुदन गुरुंग यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला. पद स्वीकारल्यानंतर केवळ तीन आठवड्यांतच त्यांनी राजीनामा दिला.

उत्पन्नापेक्षा जास्त संपत्ती आणि मनी लॉण्ड्रिंगसारखे कित्येक गंभीर आरोप करण्यात आले आहेत. वादग्रस्त व्यावसायिकाशी संबंधित कंपनीचे समभाग खरेदी केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. गुरुंग यांनी बालेहन शहा यांच्याकडे राजीनामा सोपवला.

(वृत्तसंस्था)

# होर्मुझच्या सुरक्षेसाठी ३० देश एकवटले

## ब्रिटन-फ्रान्सच्या नेतृत्वात मोहीम, सैन्य तैनातीवर चर्चा

**लंडन, २२ एप्रिल**

होर्मुझ सामुद्रधुनीचा वापर इराणकडून शस्त्रासारखा केला जात असून, यामुळे जहाजांची वाहतूक विस्कळीत झाली आहे. अमेरिकेची नाकाबंदी आणि इराणनेही हा मार्ग बंद केल्याने अनेक देश मोठ्या ऊर्जा संकटांचा सामना करताना दिसत आहेत. हा मार्ग आता पुन्हा सुरू करण्यासाठी ब्रिटन- फ्रान्सच्या नेतृत्वात ३० देश एकवटले आहे. लंडनमध्ये या देशांच्या लष्करी नियोजकांची महत्त्वाची बैठक होणार असून, यात होर्मुझमध्ये सैन्य तैनात करण्यावर चर्चा होणार आहे.



बैठकीचा मुख्य उद्देश होर्मुझमधून होणारी वाहतूक सुरक्षित करण्यासाठी ठोस लष्करी रणनीती तयार करणे हा आहे. यासंदर्भात बोलताना ब्रिटनचे संरक्षण मंत्री जॉन हीली म्हणाले, केवळ राजनैतिक सहमतीच पुरेशी नाही, तर तिचे प्रत्यक्ष संयुक्त नियोजनात रूपांतर होणेही आवश्यक आहे. या बैठकीत लष्करी क्षमता, कमांड आणि कंट्रोल इन्फ्रास्ट्रक्चर तसेच सैनिकांच्या तैनातीवर सविस्तर चर्चा होणार आहे. गेल्या आठवड्यात युरोप, आशिया आणि मध्यपूर्वेतील सुमारे ५० देशांची बैठक पार पडली. यानंतरच या योजनेला गती मिळाली. या बैठकीत ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, जपान, ऑस्ट्रेलिया, इटली, नेरदलँड, स्वीडन, नॉर्वे, फिनलँड, डेनमार्क, पोलंड, बेल्जियम आणि आखाती देशांसह अनेक देश सहभागी होणार आहे. ३० देशांच्या यादीत भारताचा आणि पाकिस्तानचा समावेश असेल की नाही, हे अद्याप अधिकृतपणे समोर आलेले नाही.

(वृत्तसंस्था)

# भोजशाळेच्या सर्वेक्षणाचे चित्रीकरण 'अपलोड' करा

## मध्यप्रदेश उच्च न्यायालयाचा पुरातत्त्व विभागाला निर्देश

**इंदूर, २२ एप्रिल**

भोजशाळा संकुलाच्या सर्वेक्षणाचे व्हिडीओ चित्रण संकेतस्थळारव अपलोज करा आणि मौलाना कमालुद्दीन वेल्फेअर सोसायटीसह इतर याचिकाकर्त्यांना ते पाहण्यासाठी सुविधा उपलब्ध करून द्या, असा निर्देश मध्यप्रदेश उच्च न्यायालयाने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाला दिला आहे.

मध्यप्रदेशातील धार जिल्ह्यातील भोजशाळा संकुलातील एका वादग्रस्त वास्तूच्या धार्मिक स्वरूपाबाबतच्या अनेक याचिकांवर न्या. विजयकुमार शुक्ला आणि न्या. आलोक अवस्थी यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. हिंदू या वास्तूला वागदेवी किंवा देवी सरस्वतीचे मंदिर मानतात, तर मुस्लिम याला कमाल मौलाना मशीद म्हणतात. मौलाना कमालुद्दीन वेल्फेअर सोसायटीच्या वतीने बाजू मांडणारे ज्येष्ठ विधिज्ञ सलमान खुर्शीद यांनी सर्वेक्षणाशी संबंधित व्हिडीओ चित्रीकरण सादर करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर मंगळवारी आभासी स्वरूपात युक्तिवाद केला. पुरातत्त्व विभागाच्या अहवालावर आक्षेप हे व्हिडीओ चित्रीकरणावरून उद्‌भवू शकतात, म्हणूनच प्रतिवादीला ते पाहण्याची मुभा मिळणे आवश्यक आहे, असा युक्तिवाद त्यांनी केला. खुर्शीद यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा एक संदर्भ दिला. व्हिडीओग्राफीमुळे उद्‌भवणाऱ्या आक्षेपांचा उच्च न्यायालयाने विचार करावा, असे यात नमूद करण्यात आले होते. व्हिडीओ चित्रीकरणाची प्रक्रिया ९६ दिवस चालली होती आणि त्याचे फुटेज इतरांना देणे किंवा प्रदर्शित करणे ही एक वेळखाऊ प्रक्रिया ठरेल, असे या याचिकेला विरोध करताना एएसआयच्या वकिलांनी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात उच्च न्यायालयाकडून संबंधित सामग्रीचे अवलोकन अभिप्रेत होते, असाही युक्तिवाद करण्यात आला.



(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### आता येणार 'मेकिंग ऑफ धुरंधर'

धुरंधर आणि धुरंधर- २ ला जगभरात अफाट यश मिळाल्यानंतर दिग्दर्शक आदित्य धर आता प्रेक्षकांसाठी यासंदर्भातील तिसरा चित्रपट आणण्याची तयारी करीत आहेत. पण, हा चित्रपट वेगळ्या धाटणीचा असेल. हा धुरंधर सारखा चित्रपट नसणार नाही तर धुरंधर बनण्याची कथा पडद्यावर आणली जाणार आहे. 'मेकिंग ऑफ धुरंधर' असे या चित्रपटाचे नाव आहे. यामध्ये चित्रपट निर्मिती, शूटिंगसोबतच चित्रपटातील कलाकारांच्या मुलाखतींचाही समावेश केला जाईल. चित्रपटाचे दिग्दर्शक आदित्य धर अनेकदा त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवरून चित्रपट निर्मितीचे व्हिज्युअल शेअर करत असतात. पण, चित्रपटातील सर्व पात्रे कशी तयार केली गेली आणि चित्रपटाचे सर्व भव्य शॉट्स कसे शूट केले गेले, हे आता चाहते पाहू शकणार आहेत. चालू वर्षाच्या शेवटी शेवटी हा चित्रपट पडद्यावर झळकणार आहे.



### अरुण कदम यांच्या आयुष्यात नवा पाहुणा

**मुंबई**: 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या लोकप्रिय कार्यक्रमामुळे घराघरात पोहोचलेले अभिनेते अरुण कदम यांनी आपल्या चाहत्यांसोबत एक आनंदाची बातमी शेअर केली आहे. आपल्या विनोदी अभिनयामुळे प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या अरुण कदम यांच्या आयुष्यात नव्या पाहुणीचे आगमन झाले. अलीकडेच त्यांनी एक नवी चारचाकी गाडी खरेदी केली असून त्याचाच आनंद त्यांनी एका व्हिडिओद्वारे व्यक्त केला आहे. या खास क्षणी त्यांच्या कुटुंबीयांचीही उपस्थिती होती. गाडी घेतल्यानंतर त्यांनी आपल्या नातवासोबत चालकाच्या आसनावर बसलेला क्षणही त्यांनी चाहत्यांसमोर मांडला आहे. या नव्या खरेदीबद्दल त्यांच्या चाहत्यांनी तसेच मनोरंजन क्षेत्रातील अनेकांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. त्यांच्या या आनंदाच्या क्षणाला सर्वांकडून भरभरून प्रतिसाद मिळताना दिसत आहे.



### 'लक्ष्मी निवास' का सोडले?

**मुंबई**: 'बिग बॉस मराठी'च्या सहाव्या पर्वात विजेतेपद पटकावलेल्या अभिनेत्री तन्वी कोलते हिने आपल्या अभिनय प्रवासाबाबत आणि 'लक्ष्मी निवास' ही मालिका सोडण्यामागील कारण स्पष्ट केले आहे. या पर्वात तिच्या स्पष्टवक्तेपणा आणि प्रामाणिक खेळीमुळे ती विशेष चर्चेत राहिली होती. अनेक स्पर्धकांमध्ये रंगलेल्या या स्पर्धेत तिने सातत्याने आपली छाप पाडत अंतिम विजेतेपद मिळवले. अलीकडेच दिलेल्या एका मुलाखतीत तन्वीने मालिकेतून बाहेर पडण्यामागील खरी भूमिका उघड केली. ती म्हणाली की, मालिकेमध्ये तिच्या भूमिकेला हळूहळू कमी महत्त्व दिले जात होते. कथानकात तिच्या पात्राची उपस्थिती कमी होत असल्याने पुढील वाटचालीबाबत ती विचार करू लागली होती. हा निर्णय सोपा नव्हता, असे ती मान्य करते, मात्र कलाकार म्हणून स्वतःच्या प्रगतीसाठी तो योग्य ठरल्याचेही तिने स्पष्ट केले. या कार्यक्रमात सहभागी झाल्यानंतर तिचा ठाम आणि निर्भीड स्वभाव अधिक ठळकपणे समोर आला.



# अमेरिकेने वसूल केलेले व्यापार शुल्क परत मिळणार

## आयातदाराच्या खात्यात करणार जमा

## भारतीय निर्यातदारांसमोर अडचणीचा डोंगर

**वॉशिंग्टन, २२ एप्रिल**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मनमानीपणे लादलेले शुल्क (टॅरिफ) न्यायालयाच्या आदेशावरून परत करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. परतावा प्रक्रियेअंतर्गत १६६ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त रक्कम परत केली जाईल, ज्यापैकी अंदाजे १२ अब्ज डॉलर्स (१.१२ लाख कोटी) भारतीय मालाशी संबंधित आहेत. मात्र शुल्काचा परतावा आयातदारांच्या खात्यात जमा केला जाणार असल्याने भारतीय निर्यातदारांसमोर अडचणीचा डोंगर उभा राहणार आहे.

ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्हने अहवालात म्हटले की, या परतावा प्रक्रियेअंतर्गत परताव्याची रक्कम केवळ अमेरिकी आयातदारांच्या खात्यात जाणार आहे आणि निर्यातदारांना त्यावर कोणताही कायदेशीर हक्क राहणार नाही. त्यामुळे, भारतीय निर्यातदारांकडे परताव्याचा दावा करण्यासाठी कोणताही थेट कायदेशीर मार्ग नसेल. पर्यायाने त्यांना अमेरिकी खरेदीदारांशी संपर्क साधावा लागेल. निर्यातदारांना परतावा देणे अमेरिकन आयातदारांवर अवलंबून असेल. कोणताही शुल्क परतावा व्यावसायिक वाटाघाटींवर अवलंबून असेल. यासाठी भारतीय निर्यातदारांना अमेरिकी खरेदीदारांशी सक्रियपणे संवाद साधावा लागणार आहे.

(वृत्तसंस्था)

### तीन प्रकारे फायदा होऊ शकतो

- सवलत-वाटप करार: भारतीय निर्यातदार त्यांच्या अमेरिकी खरेदीदारांशी परतावा वाटून घेण्यासाठी वाटाघाटी करू शकतात, ज्यामुळे प्रत्यक्ष रोख रक्कम किंवा किमतीतील सवलतीमध्ये रूपांतरित होऊ शकेल.
- किमतींची पुनर्रचना: कराराच्या किमतींमध्ये जकातीचा समावेश होता, आणि आता खर्च कमी झाला आहे, तिथे भारतीय निर्यातदार त्या करारांची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न करू शकतात.
- भविष्यातील ऑर्डर्स आणि स्पर्धात्मक फायदा: भारतीय कंपन्या अधिक स्पर्धात्मक किमतींवर नवीन ऑर्डर्ससाठी वाटाघाटी करण्याकरिता या संधीचा उपयोग करू शकतात.

# भारतीय लष्कराच्या शक्तीचे प्रदर्शन

## पहलगाम हल्ल्याच्या वर्षपूर्तीनिमित्त मानवरहित हवाई पथकाचे प्रदर्शन





**नवी दिल्ली, २२ एप्रिल**

पहलगाम हल्ल्याच्या वर्षपूर्तीनिमित्त भारतीय लष्कराने सामर्थ्य प्रदर्शित केले. लष्करातील हवाई संरक्षण रेजिमेंटने एल-७० हवाई संरक्षण तोफांचे सादरीकरण केले. या रेजिमेंटने ऑपरेशन सिंदूर दरम्यान महत्त्वाची भूमिका बजावली होती.

भारतीय लष्कराने केलेल्या सादरीकरण सतर्कता, अचूकता आणि अढळ सज्जतेचे प्रतीक असल्याचे संरक्षण विभागाने जारी केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. रेजिमेंटने एल-७० हवाई संरक्षण तोफांनी ऑपरेशन सिंदूर दरम्यान शत्रूच्या ड्रोन हल्ल्यांना प्रभावीपणे परतवून लावले आणि भारताचे हवाई संरक्षण कवच मजबूत केले. या सरावादरम्यान, भारतीय लष्कराच्या मानवरहित हवाई पथकाने आव्हानात्मक भूभागात पाळत ठेवणे, लक्ष्यभेद करणे आणि रिअल-टाइम गुप्त माहिती गोळा करण्यासाठी मानवरहित हवाई प्रणालीचे प्रदर्शन केले. भारतीय लष्कराने जल मोहिमांमध्ये आपली श्रेष्ठ सामरिक क्षमता दाखवून दिली, ज्यात विशेष युद्ध गटांनी हल्ला करणाऱ्या नौकामधून उथळ पाण्यात वेगाने हालचाल केली. शत्रूच्या प्रदेशावर आक्रमण करून वर्चस्व मिळवण्यासाठी भारतीय लष्कराने आयोजित केलेल्या सरावाने हे दाखवून दिले की, ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारतीय लष्कराने कसे वर्चस्व प्रस्थापित केले.

(वृत्तसंस्था)

### पंतप्रधान मोदींनी वाहिली श्रद्धांजली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी पहलगाम हल्ल्यात ठार झालेल्या २६ जणांना श्रद्धांजली वाहिली. त्यांनी दहशतवादाविरोधात देशाच्या एकजुटीच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. एक्सवरील एका पोस्टमध्ये पंतप्रधान म्हणाले की, ज्यांनी या हल्ल्यात आपले प्राण गमावले त्यांना कधीही विसरले जाणार नाही. एक राष्ट्र म्हणून आपण दुःखात आणि निर्धारात एकजूट आहोत. भारत कोणत्याही प्रकारच्या दहशतवादापुढे कधीही झुकणार नाही. दहशतवाद्यांचे घृणास्पद मनसुबे कधीही यशस्वी होणार नाहीत.

# दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात भारतासोबत

## पहलगाम हल्ल्याच्या वर्षपूर्तीला इस्रायलच्या राजदूतांची टिप्पणी

**नवी दिल्ली, २२ एप्रिल**

पहलगाम हल्ल्याच्या वर्षपूर्तीनिमित्त भारतातील इस्रायलच्या राजदूतानी बळी गेलेल्या २६ लोकांना श्रद्धांजली वाहिली आणि दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात इस्रायल भारतासोबत ठाम उभा असल्याचे त्यांनी सांगितले.



इस्रायलचे राजदूत रुवेन अझार म्हणाले, दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात आम्ही भारतासोबत सदैव उभे आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या दुःखद घटनेला एक वर्ष पूर्ण झाले, ज्यात २६ निष्पाप लोकांचा बळी गेला. इस्रायलनेही पहलगामसारख्या हल्ल्याचा सामना केला आहे. पहलगामचा हल्ला ७ ऑक्टोबर रोजी इस्रायलवर झालेल्या क्रूर हल्ल्यासारखाच होता. दहशतवादाला देशाची सीमा नसते आणि या धोक्याचा सामना करण्यासाठी भारत आणि इस्रायल एकजूट आहेत.

(वृत्तसंस्था)

### क्रूर घटनेचा जगाकडून निषेध

भारतावरील पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या दुःखद घटनेला एक वर्ष पूर्ण झाले आहे. अर्जेंटिनाचे सरकार आणि लोकांच्या वतीने, आम्ही पहलगाम हल्ल्यात प्राण गमावलेल्या लोकांना श्रद्धांजली अर्पण करतो. आम्ही भारताच्या पाठीशी उभे आहोत आणि दहशतवादाच्या सर्व प्रकारांचा निषेध करतो.
- **मारियानो कौसिनो, राजदूत**, अर्जेंटिना

### यूके देखील भारताच्या पाठीशी उभा आहे

ब्रिटन दहशतवादाच्या सर्व प्रकारांचा तीव्र निषेध करतो. शांतता आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आम्ही आमच्या भागीदारांसोबत मिळून काम करण्यास पूर्णपणे वचनबद्ध आहेत.
- **लिंडी कॅमरॉन**, राजदूत, ब्रिटन

वर्षभरापूर्वी पहलगाम हल्ल्यात मारल्या गेलेल्या निष्पाप नागरिकांना आम्ही श्रद्धांजली अर्पण करतो. दहशतवादाच्या लढ्यात आम्ही भारतासोबत एकजुटीने उभे आहेत.
**-उर्सुला व्हॉन डेर लियन**, अध्यक्षा, युरोपियन युनियन

पहलगाम हल्ल्याच्या पहिल्या वर्षपूर्तीच्या प्रसंगी, हिंसक कृत्यात प्राण गमावलेल्या निष्पाप लोकांप्रती संवेदना व्यक्त करतो. क्रूर हल्ला मानवतेच्या मुळावरच घाव घालणारा होता अशा कृत्यांना कोणत्याही समाजात स्थान नाही.
- **डॉ. लखू लुहाना**, अध्यक्ष, वर्ल्ड सिंध काँग्रेस

# फिफाच्या महिला विकास कार्यक्रमासाठी भारताची निवड

**नवी दिल्ली, २२ एप्रिल**

जागतिक फुटबॉल नियामक संस्था असलेल्या फिफाने आपल्या महिला विकास कार्यक्रमासाठी निवडलेल्या १२ देशांध्ये, बुधवारी भारताचा समावेश केला.

या कार्यक्रमासाठी निवडले गेलेले इतर देश म्हणजे जर्मनी, नेदरलॅण्ड, स्वीडन, स्कॉटलंड, कॅनडा, मेक्सिको, फिनलंड, घाना, जॉर्डन, लिथुआनिया आणि पॅराग्वे. महिला फुटबॉल विकासाबाबत फिफाची दृष्टी अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने (एआयएफएफ) केलेल्या प्राथमिक अर्जानंतर, तसेच त्यानंतर व्यावसायिक धोरण आणि भविष्यातील योजनांचे सविस्तर सादरीकरण केल्यानंतर, फिफाकडून या कार्यक्रमात भारताच्या समावेशाला दुजोरा देण्यात आला. हा कार्यक्रम मे ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ऑनलाइन पद्धतीने आयोजित केला जाईल, असे एआयएफएफने स्पष्ट केले. हा अभ्यासक्रम (कोर्स) फिफाद्वारेच तयार केला जाईल आणि तो देशभरातील महिला फुटबॉल क्षेत्राशी संबंधित विविध भागधारकांच्या गरजा लक्षात घेऊन विशेषरीत्या आखला जाईल. आता एआयएफएफला एका व्यावसायिक भागीदाराचा पाठिंबा लाभला असल्याने, हा कार्यक्रम विविध क्लबना शाश्वत कार्यप्रणाली उभारण्यासाठी आवश्यक असलेली साधने आणि ज्ञान पुरवेल.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# खुर्च्या उबवणाऱ्यांचे 'प्रदूषण'

भारतीय संविधानानुसार प्रत्येक भारतीय नागरिकाला जगण्याचा मूलभूत अधिकार आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण देण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने विविध खटल्यांत दिलेल्या निर्णयानुसार, जगण्याच्या अधिकारात केवळ श्वास घेणे अभिप्रेत नसून, आरोग्यदायी वातावरणात जगण्याचा अधिकारदेखील या तरतुदीचा अविभाज्य भाग मानला गेला आहे. संविधानाच्या कलम ४८-अ मध्ये सरकारला पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी दिलेली आहे. भारतातील सध्याचे प्रदूषण आणि त्यातून निर्माण होणारे प्रश्न पाहिले तर संविधानातील तरतुदींची आपल्याला खरोखर काही कदर आहे काय, असा प्रश्न निर्माण होतो. देशभरात प्रदूषणाच्या नियंत्रणासाठी यंत्रणा आहेत. त्यांच्यावर सरकार खर्च करते. अर्थातच नागरिकांकडून कराच्या स्वरूपात संकलित केलेल्या पैशांतून. नागरिक हा खर्च करतातच. शिवाय, ते प्रदूषण झेलतात, आजारीही पडतात आणि आणखी खर्च करतात. आपण महाराष्ट्रापुरते पाहिले तरी प्रगतीच्या नावाखाली पर्यावरण नासविण्याचा अफाट पराक्रम सुरू असल्याचे दिसते. पर्यावरण रक्षण व त्यासंबंधीच्या कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी) स्थापन केले आहे. हे मंडळ खरोखर आपले कर्तव्य यथायोग्य पार पाडत आहे का, असा प्रश्न उपस्थित व्हावा एवढी भयाण अवस्था राज्यातल्या दहा सर्वाधिक प्रदूषित शहरांमध्ये दिसते. उद्योगांना होणारा नफा हा निष्पाप जनतेच्या जिवावर कमावलेला नसावा, याचे साधे भान एमपीसीबीला असू नये, याचे नवल वाटते. ताज्या अहवालानुसार, राज्यात मालेगाव, परभणी, चंद्रपूर, कोल्हापूर, बोईसर, बेलापूर (नवी मुंबई), नांदेड, औरंगाबाद, नाशिक, भिवंडी, ठाणे, पुणे, नागपूर आदी अनेक शहरांमध्ये हवेची गुणवत्ता अतिशय वाईट आहे. या बहुतेक शहरांमध्ये कोळसा जाळणारे लहान मोठे उद्योग, औष्णिक वीज केंद्रे, त्यातून निर्माण झालेली फ्लाय अॅश, कोळसा खाणी, अवैध कोळसा डेपो, कोल वॉशरीज, रिफायनरी हे सारे आहे. वाहनांमुळे होणारे प्रदूषण, बांधकामांची धूळ, औद्योगिक सांडपाणी हेही कमालीच्या पातळीवर आहे. तेथील हवेची गुणवत्ता अनेकदा, विशेषतः हिवाळ्यात धोकादायक श्रेणीत नोंदली जाते. चंद्रपुरात तर या नववर्षाच्या स्वागतालाच ३१ पैकी तब्बल ३० दिवस कमाल प्रदूषण होते. एमपीसीबीचे अधिकारी पाण्यात असूनही कोरडे असल्याचा आव आणत असतात. विदर्भाच्या एका टोकावर असलेले चंद्रपूर हे महानगर आणि आसपासचा परिसर सातत्याने प्रदूषणाच्या विळख्यात आहे. अर्थ मंत्री राहिलेले भाजपाचे ज्येष्ठ आमदार सुधीर मुनगंटीवार यांना हा विषय विधानसभेत रेटावा लागला. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांना चंद्रपूरच्या महाऔष्णिक वीज केंद्र व बेलसणी येथील कोल वॉशरीज आणि कोल डेपोचे प्रदूषण पाहण्यासाठी दौरा आखावा लागला. असे म्हणतात की, तेथे गेल्यानंतर मुंडे यांची पांढरी शुभ्र कार कोळशाच्या धुळीने अगदी काळीकुट्ट झाली होती! यापेक्षा आणखी कोणता दुसरा पुरावा एमपीसीबीला आणि प्रशासनाला हवा आहे?

एमपीसीबीच्या चंद्रपूरच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांविरुद्ध फौजदारी गुन्हा नोंदवण्यासाठी सोमवारी आमदार सुधीर मुनगंटीवार यांना चक्क पोलिस ठाण्यात जावे लागले. त्यांनी हा 'एफआयआर' दाखल करून यंत्रणेला जो हिसका दिला आहे, तो राज्यातील जनतेच्या संतापाचे प्रतिनिधित्व करणारा मानला पाहिजे. आ. मुनगंटीवार यांची तक्रार केवळ प्रशासकीय निष्काळजीपणाची नाही. ती कायद्याने सोपवलेल्या कर्तव्याचे जाणीवपूर्वक उल्लंघन करून, नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर थेट परिणाम करणारी कृती केल्याबद्दलची आहे. 'एमपीसीबी'च्या प्रादेशिक अधिकाऱ्याने वेळीच प्रदूषण रोखण्यासाठी पावले न उचलल्याने परिसरातील शेतकऱ्यांचा कापूस काळवंडला. त्यांचे मोठे नुकसान झाले. गावातून बाहेर पडताच त्यांच्या नाकातोंडात कोळशाची राख जात असते, ते वेगळेच. चंद्रपूर तालुक्यातील एका कोल वॉशरीचा विषय तर धक्कादायक आहे. या कोल वॉशरीच्या प्रदूषणामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अनेक जनावरे मृत्युमुखी पडली. शासन नियुक्त समितीने परिस्थितीचा पंचनामा करून ६८ लाख रुपयांची नुकसानभरपाई निश्चित केली. मात्र, ती अद्याप या कंपनीकडून वसूल करण्यात आलेली नाही. नुकसानभरपाई वसूल करण्याची जबाबदारी प्रादेशिक अधिकाऱ्यांची होती. त्यांनी आपले कर्तव्य पार पाडले नाही आणि म्हणून शेतकऱ्यांचा संताप आ. मुनगंटीवारांच्या तक्रारीतून व्यक्त झाला. एमपीसीबीच्या अधिकाऱ्यांची ही अकार्यक्षमता साधी नाही. ते जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, वायू (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम आणि पर्यावरण संरक्षण अधिनियमातील तरतुदीनुसार नागरिकांच्या अधिकारांचे थेट उल्लंघन आहे. अशा प्रकरणात सत्ताधारी पक्षातील लोकप्रतिनिधीलाच पोलिस ठाण्याची पायरी चढावी लागते, तेव्हा कायदा पाळण्याची जबाबदारी सरकारी यंत्रणेवर आहे की नाही, असा प्रश्न पडणे स्वाभाविक असते.

एकेकाळी चंद्रपूर आणि परिसरात कोळसा साठा असल्याचे निष्पन्न झाले आणि या भागात मोठ्या संख्येत वेकोलिच्या कोळसा खाणी आल्या. मग महाऔष्णिक वीज केंद्र उभे राहिले. लहान मोठे कॅप्टिव्ह कारखानेही तयार झाले. या परिसराचा विकास होण्यासाठी ही पर्वणी मानली गेली. पण हळूहळू अतिरेक झाला. कोळशाची धूळ वातावरण दूषित करू लागली. शेतीवर, नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम झाला. जास्त नफा कमवण्यासाठी चंद्रपूर-घुग्घूस मार्गावर अवैध कोल डेपो उभे राहिले. आज रोजी या रस्त्याच्या कडेला दहाहून अधिक कोल डेपो आहेत. पण एमपीसीबीच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांच्याच वक्तव्यानुसार, त्यातील केवळ दोघा-तिघांकडेच परवाना आहे, आता बोला! केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) ने २००९-१० मध्ये केलेल्या सर्वसमावेशक पर्यावरण प्रदूषण निर्देशांक (सीईपीआय) मानांकनानुसार, चंद्रपूर ८३.८८ गुणांसह चौथ्या क्रमांकावर होते. त्यानंतर २०१७-१८ मध्ये 'सीपीसीबी'ने पुन्हा एकदा पाहणी केली असता, चंद्रपूरच्या पाणी आणि जमिनीच्या 'सीईपीआय' गुणांमध्ये तर घट झाली; मात्र, हवेच्या प्रदूषणाशी संबंधित गुणांमध्ये मोठी वाढ झाल्याचे समोर आले. शासन निर्णयानुसार, ३१ डिसेंबर २०१८ रोजी पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय देखरेख समिती स्थापन झाली. एमपीसीबीच्या सदस्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली, कृती आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित घटकांसोबत विविध बैठका घेतल्या गेल्या. भेटींसाठी संबंधित प्रादेशिक अधिकाऱ्यांचे देखरेख पथक गठित केले गेले. तसेच, प्रगतीचा आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव (पर्यावरण विभाग) आणि मुख्य सचिव यांनी वेळोवेळी बैठका घेतल्या, पाहणी केली. आराखड्यांवर आराखडे तयार झालेत. पण प्रत्यक्षात ठोस पावले उचललीच गेली नाही. त्या काळी प्रदूषणात चौथ्या क्रमांकावर असलेले चंद्रपूर आता २०२६ मध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहे! जवळपास अशीच स्थिती अख्ख्या महाराष्ट्रातील अनेक मोठ्या शहरांची आहे.

राज्यात उद्योग यायला हवेत, गुंतवणूक वाढायला हवी, यात वाद नाही. पण त्यासाठी जनतेच्या जिवाचा आणि शेतकऱ्यांच्या पिकांचा बळी दिला जाऊ शकत नाही. कारखान्यांमधील धुळीचे कण, फ्लाय अॅश हवेत मिसळू नयेत म्हणून चिमणीतून बाहेर पडण्याआधी 'ईएसपी' नावाचे यंत्र लावले जाते. 'इलेक्टोस्टॅटिक चार्ज' दिल्याने धुरातील धूलिकण या यंत्राच्या प्लेट्सना चिकटतात आणि हवेचे प्रदूषण रोखण्यास मदत होते. या यंत्राचा वीज खर्च जास्त येत असल्याने बहुतांश उद्योजक हे यंत्र बंदच ठेवतात. ते तपासण्याची जबाबदारी मंडळाच्या अधिकाऱ्यांची असते. ते आपले कर्तव्य यथायोग्य पार पाडत आहेत असे गृहीत धरले, तर मग जेथे-जेथे कारखाने आहेत, तेथील हवा प्रदूषित कशी आणि प्रदूषित शहरांचा निर्देशांक सातत्याने का वाढत आहे? एमपीसीबी असो वा अन्य ठिकाणची नोकरशाही; प्रदूषणाचा प्रश्न गंभीर होण्यास खुर्ची उबविणारे नोकरशहा जबाबदार आहेत. सरकारने विकास करावाच. पण, तो जनतेच्या जिवावर उठणारा असू नये, याची काळजी घ्यावी. त्या काळजीचा भाग म्हणून या खुर्चीधारी प्रदूषकांना तत्काळ हटविले पाहिजे आणि त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली पाहिजे.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# नावीन्यपूर्णतेच्या युगाचा करा स्वीकार

आजच्या काळात जग झपाट्याने बदलत आहे. तंत्रज्ञान, शिक्षण, करीअरच्या संधी आणि जीवनशैली या सर्व गोष्टींमध्ये मोठे परिवर्तन होत आहे. जग अशा एका टप्प्यावर उभे आहे, जिथे तंत्रज्ञान अभूतपूर्व वेगाने बदलत आहे. जागतिक माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलून गेला आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये ओरॅकल, अॅमेझॉन आणि मायक्रोसॉफ्ट यासारख्या मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झालेल्या कर्मचारी कपातीच्या (ले-ऑफ) बातम्यांनी जगभरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, या घडामोडींकडे केवळ उद्योगाची घसरण म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. उलट, हे बदल आयटी उद्योगातील एका मोठ्या संक्रमणाचे आणि परिवर्तनाचे संकेत आहेत. एखादी मोठी कंपनी कर्मचारी कपात करते, तेव्हा सामान्यतः मंदीची भीती व्यक्त केली जाते. पण सध्याचे ले-ऑफ हे मंदीपेक्षा 'बदलत्या प्राधान्यक्रमामुळे' अधिक आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ऑटोमेशन (स्वयंचलन) आणि क्लाऊड कॉम्प्युटिंग यासारख्या तंत्रज्ञानांमुळे कामाचे स्वरूप बदलत आहे. पूर्वी दहा लोकांची गरज असणारी कामे आता प्रगत सॉफ्टवेअर्सच्या मदतीने कमी वेळेत आणि अचूकपणे होऊ लागली आहेत. याचा अर्थ असा की, पारंपरिक कौशल्ये असलेल्या कर्मचाऱ्यांची गरज कमी होत असून नवीन तंत्रज्ञान अवगत असलेल्या लोकांची मागणी वाढत आहे.

भारतीय आयटी क्षेत्र हे जगाचे पॉवरहाऊस म्हणून ओळखले जाते. या क्षेत्रात अनुभवायला मिळत असलेल्या ताज्या बदलांमुळे भारतीय आयटी उद्योग आकुंचन पावेल, अशी अनेकांना भीती वाटते. परंतु वास्तव याच्या उलट आहे. भारतीय आयटी क्षेत्र कमी होत नाहीये, तर संक्रमित होत आहे. सायबर सिक्युरिटी, डेटा अॅनालिटिक्स, मशीन लर्निंग आणि रोबोटिक्स यांसारख्या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत. या क्षेत्रांसाठी केवळ पदवी पुरेशी नसून विशिष्ट कौशल्ये, विश्लेषणात्मक विचार आणि सतत शिकण्याची तयारी असणे आवश्यक आहे. स्वतःला या बदलांनुसार जुळवून घेणाऱ्या व्यावसायिकांसाठी भविष्यात संधींचे आकाश खुले आहे. त्यानुसार त्यांना परिस्थितीची जाणीव व्हायला हवी. भारतातील पुणे, बंगळुरू आणि हैदराबादसारखी शहरे आता जागतिक स्तरावर 'इनोव्हेशन हब' म्हणून नावारूपाला येत आहेत. विशेषतः पुण्यात 'ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स' (जीसीसी) मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. पूर्वी ही केंद्रे केवळ बॅक-ऑफिस कामांसाठी वापरली जात होती, पण आता ती जागतिक कंपन्यांची धोरणात्मक संशोधन आणि विकास केंद्रे बनली आहेत. याचा अर्थ असा की, भारतीय प्रतिभा आता मायदेशात राहूनच जगातील सर्वांत प्रगत तंत्रज्ञानावर काम करत आहेत. ही केंद्रे केवळ सेवा देणारी नसून जागतिक स्तरावर नावीन्यपूर्ण शोध लावणारी केंद्रे बनली आहेत. या बदलाच्या काळात आयटी विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी असलेला एक महत्त्वाचा संदेश म्हणजे अनुकूलता हीच यशाची गुरुकिल्ली आहे. पूर्वी एकदा पदवी घेतली की आयुष्यभर त्या जोरावर नोकरी करता येत असे, पण आता ती परिस्थिती राहिलेली नाही. तंत्रज्ञान इतक्या वेगाने बदलत आहे की, दर दोन-तीन वर्षांनी तुम्हाला नवीन काही तरी शिकावेच लागेल. सतत शिकणे, नवीन कौशल्ये आत्मसात करणे आणि तांत्रिक प्रगतीशी अपडेट राहणे, हे आता करीअरमधील यशाचे मूलभूत मंत्र बनले आहेत. ऑनलाईन लर्निंग प्लॅटफॉर्म्स, इंडस्ट्री सर्टिफिकेशन आणि प्रत्यक्ष प्रकल्पांवरील कामाचा अनुभव आता नोकरीच्या बाजारपेठेत तुमची किंमत ठरवत आहेत. ती ओळखून आपल्या कौशल्यांमध्ये बदल करत राहणे गरजेचे आहे, हे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या नव्या पिढीला कळणे आवश्यक आहे.

यापुढील काळात फक्त विद्यार्थ्यांनीच बदलून चालणार नाही, तर आपल्या शैक्षणिक संस्थांनाही काळानुसार बदलावे लागेल. उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञ आणि धोरणकर्ते यांनी एकत्र येऊन 'कौशल्य दरी' भरून काढण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज करणारे अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत. कल्पकता वाढवणे, उद्योजकता जोपासणे आणि डिजिटल साक्षरतेमध्ये गुंतवणूक करणे यामुळेच भारताची जागतिक स्पर्धात्मकता टिकून राहील. प्रत्येक क्षेत्रात वेगाने वाढत असलेली कृत्रिम बुद्धिमत्ता नोकऱ्या हिरावून घेईल, अशी भीती अनेकांना वाटते. पण इतिहास साक्षी आहे की, जेव्हा जेव्हा नवीन तंत्रज्ञान आले, तेव्हा सुरुवातीला काही नोकऱ्या गेल्या; पण त्यापेक्षा अनेक पटींनी नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या. संगणक आले तेव्हाही अशीच भीती होती, पण संगणकामुळे आज आयटी क्षेत्रात लाखो लोकांना रोजगार मिळाला आहे. एआय हे मानवाचे रिप्लेसमेंट नसून मानवाची क्षमता वाढवणारे एक साधन आहे. एआयचा प्रभावी वापर करायला शिकतील तेच भविष्यातील कामाच्या ठिकाणी सर्वांत मौल्यवान असतील. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व आणखी वाढणार, हे निश्चित आहे. महाराष्ट्रात या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. नवी संशोधन केंद्रे, नवउद्योग आणि शैक्षणिक संस्था या विषयावर भर देत आहेत. त्यांना अपेक्षित मनुष्यबळ आणि अस्तित्वात असणाऱ्या कार्यपद्धतीतील बदल लक्षात घेऊन आपल्या कामात बदल करणारे काळाची कसोटी पार करतील, तसेच बदलणाऱ्या अपेक्षांची पूर्तताही करतील. त्यामुळे येणाऱ्या काळात महाराष्ट्र या क्षेत्रात आघाडीवर राहील, अशी अपेक्षा आहे.

नव्या युगात टिकून राहण्यासाठी आणि प्रगती करण्यासाठी काही गोष्टींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. यातील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे जिज्ञासू वृत्ती. नेहमी प्रश्न विचारा आणि नवीन गोष्टी शिकण्यासाठी उत्सुक राहा. या युगात तांत्रिक कौशल्ये आवश्यक आहेतच, पण त्याचबरोबर 'सॉफ्ट स्किल्स'ही तेवढीच महत्त्वाची आहेत. संवादकौशल्य, नेतृत्व आणि सांघिक कार्य या बाबी मशीन करू शकत नाहीत. त्यामुळे या कौशल्यांचे महत्त्व कधीच कमी होणार नाही. नवनवीन तंत्रज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करताना प्रत्येकाने बदलांचा धैर्याने स्वीकार करायला हवा. ले-ऑफ किंवा बदलांना न घाबरता संधी म्हणून पाहायला हवे. थोडक्यात सांगायचे तर, आयटी क्षेत्राचा हा काळ नवनिर्माणाचा आहे. जुन्या पद्धती नष्ट होत आहेत आणि नव्या अधिक कार्यक्षम पद्धती जन्म घेत आहेत. बदल स्वीकारतील, स्वतःची कौशल्ये अद्ययावत करतील आणि तंत्रज्ञानाच्या प्रवाहाविरुद्ध न जाता त्या प्रवाहाचा भाग बनतील, अशा लोकांचे भविष्य उज्ज्वल आहे. भारत केवळ या बदलाचा साक्षीदार नसेल, तर या जागतिक डिजिटल क्रांतीचे नेतृत्व करेल. आपल्याला केवळ पदवीधर व्हायचे नाही, तर 'कौशल्यवान' आणि 'डिजिटल साक्षर' व्हायचे आहे. ले-ऑफच्या या वावटळीत ज्ञानाचा आणि कल्पकतेचा पाया मजबूत असलेल्यांची नौका नक्कीच सुरक्षित किनाऱ्याला लागेल. शेवटी, हे लक्षात ठेवले पाहिजे की तंत्रज्ञान माणसाला पर्याय ठरू शकत नाही, तर ते माणसाला अधिक सक्षम करते. ले-ऑफची भीती बाळगण्यापेक्षा आपण आपल्या ज्ञानाची 'बॅटरी' सतत चार्ज ठेवली पाहिजे. ही वेळ थांबण्याची नाही, तर अधिक वेगाने धावण्याची आहे. बदल स्वीकारण्याचे धाडस आणि सतत शिकण्याची तहान असलेल्यांसाठी हे 'एआय' आणि 'क्लाऊड'चे युग सुवर्णकाळ ठरेल. केवळ कपात नाही, तर बदलपरिवर्तन हाच निसर्गाचा नियम आहे आणि या परिवर्तनाशी जुळवून घेणाराच उद्याचा विजेता असेल. त्यामुळे नव्या युगाचे स्वागत करून तंत्रज्ञानाच्या अथांग महासागरात यशाची नवी नौका वल्हवू या.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# तहानलेल्या भविष्याला वाचवा

उन्हाळा सुरू झाला की पाण्याची टंचाई हा शब्द केवळ बातम्यांपुरता राहत नाही, तर तो प्रत्येक घराच्या दारात उभा ठाकतो. विहिरी कोरड्या पडतात, बोअरवेलचा तळ दिसू लागतो आणि पाण्याच्या टँकरसाठी होणारी धावपळ ही रोजचीच गोष्ट बनते. मात्र, हा प्रश्न अचानक निर्माण होत नाही. त्याची बीजे आपणच पावसाळ्यात पेरलेली असतात, हे वास्तव स्वीकारण्याची वेळ आता आली आहे. पावसाळ्यात निसर्ग आपल्यावर अक्षरशः कृपावृष्टी करतो. छतांवरून, रस्त्यांवरून, गल्लीबोळांतून वाहणारे लाखो लिटर पाणी आपण नाल्यांतून, नद्यांतून वाहून जाऊ देतो. त्या पाण्याचा साठा करण्यासाठी, जमिनीत मुरवण्यासाठी आपण फारसे प्रयत्न करत नाही आणि उन्हाळा आला की पाण्यासाठी आक्रोश करतो. ही मानसिकता बदलण्याची खरी गरज आहे.

भंडाऱ्यातील 'व्यंकटेश रेसिडेन्सी'ने या संदर्भात एक आदर्श निर्माण केला आहे. या सोसायटीने 'रेन वॉटर हार्वेस्टिंग'चा प्रभावी वापर करून पावसाळ्यात सुमारे १० लाख लिटर पाणी जमिनीत मुरवण्याची व्यवस्था केली आहे. त्याचा परिणाम असा झाला की, उन्हाळ्यातही येथे पाण्याची टंचाई जाणवत नाही. ४८ कुटुंबांना २४ तास पाणी उपलब्ध होते. हा केवळ एक प्रयोग नाही, तर भविष्यासाठीचा दिशादर्शक मार्ग आहे. आज शहरांमध्ये सिमेंटचे जंगल उभे राहत आहे. मोकळी माती, अंगणे, झाडे यांची जागा काँक्रीटने घेतली आहे. परिणामी, पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी सरळ वाहून जाते. रस्ते, इमारती, पार्किंग या सर्व ठिकाणी पाण्याचा निचरा होण्याची नैसर्गिक व्यवस्था नष्ट झाली आहे. त्यामुळे भूजल पातळी झपाट्याने खाली जात आहे. विदर्भासारख्या भागात, जिथे उष्णतेचा तीव्र परिणाम जाणवतो, तिथे ही समस्या अधिक गंभीर होत चालली आहे.

हवामान खात्याने यंदा गुजरात आणि महाराष्ट्रात उष्णतेची लाट तीव्र राहणार असल्याचा इशारा दिला आहे. अशा परिस्थितीत पाण्याचा प्रश्न आणखी बिकट होणार हे निश्चित आहे. पण या संकटावर उपायही आपल्या हातातच आहे. जल पुनर्भरण ही केवळ शासकीय योजना नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, ही जाणीव होणे अत्यंत आवश्यक आहे. आज अनेक ठिकाणी वॉटर हार्वेस्टिंगची चर्चा होते, नियम बनवले जातात, पण त्याची अंमलबजावणी मात्र अत्यल्प आहे. केवळ कागदोपत्री योजना राबवून हा प्रश्न सुटणार नाही. प्रत्येक घर, प्रत्येक सोसायटी आणि प्रत्येक शासकीय कार्यालयाने यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलिस अधीक्षक कार्यालय यासारख्या मोठ्या इमारतींमध्ये लाखो लिटर पाणी वाया जाते. तिथेही जल पुनर्भरण प्रकल्प राबवले गेले, तर त्याचा मोठा सकारात्मक परिणाम दिसून येईल. यासोबतच, स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. नगर परिषद किंवा महानगरपालिकांनी बांधकाम परवानगी देताना रेन वॉटर हार्वेस्टिंगची सक्ती करणे आवश्यक आहे. घराच्या छतावर पडणारे पाणी जमिनीत मुरवण्याची व्यवस्था केल्याशिवाय परवानगी दिली जाऊ नये. हा नियम काटेकोरपणे पाळला गेला, तर भविष्यातील पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. आज गरज आहे ती जनजागृतीसोबतच कृतीची. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था यांनी पाणी संवर्धनाचे महत्त्व पटवून देणारे उपक्रम राबवले पाहिजेत. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरापासून सुरुवात केली, तर मोठा बदल घडू शकतो. पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याची सवय लागली, तरच येणाऱ्या पिढ्यांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागणार नाही. शेवटी, पाणी ही केवळ गरज नाही, तर ती जीवनाची मूलभूत अट आहे. निसर्गाने दिलेल्या या अमूल्य संपत्तीचे जतन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. 'व्यंकटेश रेसिडेन्सी'सारखे प्रयोग हे दाखवून देतात की, योग्य नियोजन आणि इच्छाशक्ती असेल, तर पाण्याचा प्रश्न सुटू शकतो. आता गरज आहे ती प्रत्येकाने एक पाऊल पुढे टाकण्याची. कारण, आज वाचवलेला प्रत्येक थेंब उद्याच्या पिढीसाठी जीवनदायी ठरणार आहे. पाणीटंचाई ही केवळ नैसर्गिक आपत्ती नसून ती आपल्या नियोजनातील त्रुटींचा परिणाम आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे. गावागावांत, शहराशहरांत पाण्याचे स्रोत वाढवण्याऐवजी आपण उपलब्ध स्रोतांवरच अधिक ताण देत आहोत. विहिरी खोल करणे, बोअरवेल वाढवणे हे तात्पुरते उपाय आहेत; मात्र दीर्घकालीन उपाय म्हणजे जमिनीत पाणी साठवणे. पावसाचे पाणी योग्य पद्धतीने अडवले, साठवले आणि मुरवले, तरच भूजल पातळी टिकून राहू शकते. अन्यथा येणाऱ्या काळात पाणी ही केवळ गरज न राहता संघर्षाचे कारण बनण्याची भीती नाकारता येत नाही. आजच्या पिढीने जर पाण्याचे महत्त्व ओळखून योग्य सवयी आत्मसात केल्या, तर भविष्यातील संकट टाळता येईल. घरातील छोट्या-छोट्या गोष्टींमधूनही मोठा बदल घडू शकतो. हे प्रयत्न किरकोळ वाटले तरी त्यांचा एकत्रित परिणाम मोठा असतो. पाण्याबाबतची जबाबदारी ही फक्त सरकारची नाही, तर प्रत्येक नागरिकाची आहे, ही भावना मनात रुजली, तरच 'जलसंपन्न भारत' हे स्वप्न प्रत्यक्षात उतरू शकते.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**


# मल्लिकार्जुन खडगे तुम्ही सुद्धा...

तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला ४८ तास उरले असताना काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उल्लेख 'दहशतवादी' असा करत आपल्या पक्षाच्या आणि सोबत आपला मित्रपक्ष असलेल्या द्रमुकच्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे. चेन्नई येथे काँग्रेस पक्षातर्फे आयोजित एका पत्रपरिषदेत खडगे यांनी हे तारे तोडले आणि काँग्रेस पक्षाच्या डोळ्यासमोर दिवसाउजेडी तारे चमकू लागले.

मोदींसाठी दहशतवादी असा शब्द वापरून आपण चूक केली, हे लक्षात आल्यावर खडगे यांनी सावरासावर करण्याचा प्रयत्न केला, पण तो विफल ठरला. मला असे म्हणायचे नव्हते, दहशतवादी म्हणजे समोरच्याला घाबरवणारा असे म्हणायचे होते, अशा पश्चातबुद्धीचा आणि कोणाला न पटणारा खुलासा खडगे यांनी केला, पण तोपर्यंत उशीर झाला होता. मोदींना मी दहशतवादी कधी म्हटले नाही, ते लोकांना आणि राजकीय पक्षांना घाबरवत आहेत, कारण ईडी, आयटी आणि सीबीआय त्याच्या हातात आहे, असे मला म्हणायचे होते, असे खडगे म्हणाले.

दहशतवादी म्हणजे दहशतवादी असा त्याचा थेट अर्थ आहे, पण खडगेंच्या शब्दकोशात दहशतवादी म्हणजे सज्जन व्यक्ती असा अर्थ असेल तर माहीत नाही. तोंडातून निघालेला शब्द आणि भात्यातून निघालेला बाण परत घेता येत नाही, तो घाव करण्याचे आपले काम करूनच जातो. बाणामुळे झालेली जखम लवकर भरून निघते, पण वाक्बाणामुळे झालेली जखम कधीच भरून येत नाही.

खडगे काँग्रेस पक्षातील सर्वांत ज्येष्ठ, संयमी आणि अनुभवी नेते आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून अधिक जबाबदारीच्या वर्तनाची आणि विधानाची अपेक्षा असते. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी वा काँग्रेस पक्षातील अन्य नेत्यांकडून आपण जबाबदारीच्या वागणुकीची आणि विधानाची अपेक्षा करू शकत नाही. आपण काय चीज आहे, हे राहुल गांधी यांनी वारंवार सिद्ध केले आहे. पण काँग्रेस पक्षरूपी वासरात आपणही लंगडी गाय असल्याचे खडगे वारंवार दाखवून देत आहेत. अन्यथा देशातील सर्वाधिक लोकप्रिय अशा पंतप्रधान मोदींबद्दल त्यांनी असे आक्षेपार्ह विधान केलेच नसते. काँग्रेस पक्षात वाचाळ नेत्यांची कमी नाही, अशा नेत्यांची परंपरा काँग्रेस पक्षाला लाभली आहे.



त्यात आता खडगे यांची भर पडली, याचे आश्चर्य आणि वाईटही वाटते. दुर्दैवाने वादग्रस्त विधान करण्याची खडगे यांची ही पहिली वेळ नाही. २०२३ मध्ये कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या वेळी खडगे यांनी मोदी यांचा उल्लेख विषारी साप असा केला होता. २०२२ मध्ये गुजरातमधील विधानसभा निवडणुकीच्या वेळी खडगे यांनी मोदी यांना रावण म्हटले होते, आपल्यालाही रावणाप्रमाणे शंभर तोंडे आहेत का, अशी विचारणा खडगे यांनी केली होती. खरं म्हणजे रावणाला शंभर तोंडे कधीच नव्हती, तर दहा तोंडे होती, पण टीका करताना खडगे यांचे गणितही चुकते. यानिमित्ताने खडगे यांची फक्त जीभ घसरलीच नाही, तर त्यांचा पायही पूर्णपणे घसरला आहे. विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी असो की मल्लिकार्जुन खडगे यांना पंतप्रधान मोदी यांच्यावर टीका करण्याचा अधिकार आहे, पण ही टीका संयमी आणि संसदीय भाषेत असली पाहिजे. रस्त्यावर उतरून आपण समोरच्याला शिवीगाळ करतो, तशा भाषेत आणि आविर्भावात नसावी. देशाच्या पंतप्रधानाला तुम्ही दहशतवादी कसे म्हणू शकता? त्यामुळे खडगे तुम्ही सुद्धा, असे म्हणावे लागते. राहुल गांधींच्या बेताल विधानांनी देश आधीच त्रस्त झाला असताना त्यात आता खडगे यांचीही भर पडावी, हे दुर्दैवी आहे. वय झाल्यामुळे सामान्यपणे म्हातारपणी माणसाचा पाय घसरत असतो, पण येथे तर वय झाल्यामुळे खडगे यांची जीभ घसरल्याचे दिसते. खडगे यांना म्हातारचळ तर लागला नाही, अशी शंका कोणी घेतली तर त्याला दोष कसा द्यायचा. खडगे यांच्याकडून अशा वागण्याची आणि विधानाची अपेक्षा नव्हती. कारण त्यांच्याबद्दल देशातील जनतेच्या मनात आतापर्यंत आदराची भावना होती.

अण्णाद्रमुक रालोआत आहे, भाजपाच्या जवळ आहे, त्यामुळे खडगे यांचा तिळपापड झाला. अण्णाद्रमुक हा भाजपाचा गुलाम आहे, असा आरोप करताना खडगे यांनी त्या पक्षाने आपली ओळख गमावली, तो तामिळनाडूच्या हिताचे रक्षण करू शकत नाही, कारण तो मोदी यांचा गुलाम झाला आहे, असे आरोप खडगे यांनी केले. हे म्हणजे एका गुलामाने दुसऱ्याला गुलाम म्हणण्यासारखे झाले. खडगे हे स्वतःच गांधी घराण्याचे गुलाम आहेत, असे म्हटले तर ते त्यांना चालेल का? मग अण्णाद्रमुकला ते मोदींचे गुलाम कसे म्हणू शकतात.

राष्ट्रवादी विचारधारा आणि मोदी यांचे नेतृत्व पटल्यामुळे अण्णाद्रमुक जर भाजपाजवळ येत असेल वा आला असेल तर खडगे यांच्या पोटात दुखण्याचे कारण काय? कोणत्या नेत्याने कोणत्या पक्षात जावे, वा कोणत्या पक्षाने कोणत्या पक्षाशी युती वा आघाडी करावी, हा त्या नेत्याचा आणि पक्षाचा प्रश्न आहे. काँग्रेस पक्षाने जशी द्रमुकशी युती करणे गैर नाही, तसेच अण्णाद्रमुकनेही भाजपाशी युती करणे चुकीचे नाही. बरं अण्णाद्रमुक आणि भाजप यांची युती ही आजची नाही, तर फार जुनी आहे. जयललिता असल्यापासूनची आहे. मुळात तामिळनाडूत काँग्रेस पक्षाला द्रमुकच्या कुबड्या घेऊन चालावे लागते. राज्यात काँग्रेसचे अस्तित्व नाममात्र म्हणायला पाहिजे. द्रमुकने टाकलेल्या तुकड्यांवर म्हणजे दिलेल्या मतदारसंघावर काँग्रेसला निवडणूक लढवावी टाकते. ती काँग्रेस दुसऱ्या पक्षावर असंसदीय भाषेत टीका करते, ही बाब पटण्यासारखी नाही.

तामिळनाडूत काँग्रेसने आपला पराभव निवडणुकीआधीच मान्य केला, असा याचा अर्थ काढला तर तो चूक कसा म्हणायचा? भाजपाला तर यामुळे आयती संधी काँग्रेसने दिली आहे. काँग्रेस हा शहरी नक्षल्यांचा पक्ष असल्याचा आरोप भाजपाने केला आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मोदी वा भाजपावर टीका केल्याने मोदी वा भाजप यांचे एका पैशाचेही नुकसान होत नाही, उलट त्यांना याचा फायदाच होतो. कारण मोदींवर केलेल्या टीकेचा मोदींना जेवढा राग येत नसेल तर त्याच्यापेक्षा कितीतरी जास्त राग त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या देशातील जनतेला येत असतो. मोदी स्वतः आपल्यावर होणाऱ्या टीकेवर कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त करत नाही, पण देशातील जनतेच्या संतापाचा मात्र भडका उडतो. ते खाऊ की गिळू नजरेने अशी विधाने करणाऱ्या नेत्याकडे आणि पक्षाकडे पाहात असतात, ईव्हीएममधून त्यांना धडा शिकवत असतात. तरीसुद्धा काँग्रेस आणि काँग्रेसच्या नेत्यांना शहाणपण येत नाही, याचे आश्चर्य वाटते.

मुळात शहाणपण यायलाही शहाणपण असावे लागते, आडातच नाही तर पोहऱ्यात कुठून येणार? त्यामुळे काँग्रेस पक्षाने मोदी यांच्यावर जेवढी करता येईल, तेवढ्या अश्लाघ्य आणि आक्षेपार्ह भाषेत टीका करावी. मोदींवर केलेल्या टीकेमुळे मोदींचा राजकीय फायदा होतो, तर काँग्रेसचे राजकीय नुकसान. त्यामुळे राहुल गांधी असो की खडगे हे भाजपाचे शत्रू नाहीत, तर खऱ्या अर्थाने त्यांना भाजपाचे हितचिंतक म्हटले पाहिजे. भाजपाचे नेते आणि कार्यकर्ते भाजपाचा जेवढा फायदा करून देत नाही, तेवढा वा त्यापेक्षा जास्त फायदा राहुल गांधी आणि खडगे करून देतात, त्यामुळे भाजपा मित्रभूषण पुरस्कार देऊन त्यांचा सत्कार करायला हरकत नाही.

९८८१७१७८१७

## चमकोताई आणि चमकोबाबा!

महिला आरक्षण विधेयकाला विरोध करून नारीशक्तीचा आणि लोकशाहीचा अपमान करणाऱ्या विरोधकांचा निषेध करण्यासाठी भाजप - रालोआच्या नेतृत्वाखाली ठिकठिकाणी मोर्चे काढण्यात आले आहेत व येत आहेत. त्यापैकी २१ एप्रिलच्या मुंबईतील मोर्चाच्या ठिकाणी एका फुरोगामी महिलेने मोर्चामुळे वाहतूककोंडी होते असे कारण दाखवून मंत्री गिरीश महाजन यांच्यासमोर बराच थयथयाट केला. त्या महिलेने, वृत्तवाहिन्यांच्या उथळ प्रतिनिधींच्या शब्दांत, महाजन यांना तोंडावर सुनावले! (वास्तविक मोर्चे काढण्याचे स्वातंत्र्य सर्वांनाच आहे, त्यामुळे महिला पोलिसांनी त्या महिलेची उचलबांगडी करून तिला ताब्यात घेणे आवश्यक होते.) एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की, मनोज जरांगे यांच्या समर्थकांनी काही दिवस दक्षिण मुंबईचा घेतलेला ताबा, बच्चू कडू यांचे मोर्चे व रेलरोको आंदोलन, नवले यांचे किसान मोर्चे, रझा अकादमीचा मोर्चा व त्या वेळी त्यांनी केलेली अमरज्योती स्मारकाची तोडफोड, दिल्लीतील शाहीनबाग येथे रस्ते ब्लॉक करून केलेले आंदोलन अशा अनेक बाबतीत वाहतूककोंडी झाल्याची तक्रार अशा फुरोगाम्यांनी कधी केली नाही. चायबिस्कुटवाले पत्रकार आणि विशेषतः वृत्तवाहिन्यांचे उथळ व पक्षपाती प्रतिनिधी यांनी फुगविलेले बरेच बेडूक (आणि बेंडकुळ्या) महाराष्ट्रात आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात बऱ्याच चमकोताई आणि चमकोबाबा निर्माण झाले आहेत. त्यांचे प्रायोजक कोण, हे जनतेला माहीत आहेच. सत्तेतून बाहेर फेकले गेलेले वैफल्यग्रस्त विरोधक असे उद्योग करणारच. त्यांच्याबाबत शासनाने कठोर कारवाई करणे आवश्यक आहे.

**अविनाश वाघ**/पुणे

## रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीची पुणे शाखा सुरू व्हावी

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, निसर्गाच्या सान्निध्यात भाईंदर-उत्तर मुंबई येथे भव्य वास्तूत सुरू असून या ठिकाणी विविध प्रकारच्या कार्यशाळा, प्रशिक्षण, शिबिरे उत्तम रीतीने आयोजित केली जातात. रामभाऊ म्हाळगी जनसंघाचे पहिल्यांदा आमदार झाले ते पुण्यातील मावळमधून. पुढे ठाण्यातून खासदारकी. पण त्यांनी ठाण्याबरोबरच पुणे, कोल्हापूर, संभाजी नगर, नागपूर व दिल्ली येथे संसदीय कार्यालये सूरू केली होती व त्या ठिकाणी ते नियमितपणे भेट देऊन त्या भागातील नागरिकांचे प्रश्न सोडवत असत. अशा या महान नेत्याच्या नावाने असलेल्या रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीची पुणे शाखा भव्य प्रशस्त अशा वास्तूत सुरू व्हावी व या ठिकाणी पुणे व जवळपासच्या सर्व जिल्ह्यातील युवकांसाठी व नागरिकांसाठी, नेतृत्व प्रशिक्षण, शिबिरे, कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात. यासाठी प्रशस्त अशी जागा घेऊन प्रबोधिनी ची पुणे शाखा भव्य प्रमाणात सुरू करावी. प्रबोधिनीच्या संचालक मंडळाने यासाठी प्रयत्न करावा आणि या प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाचे ही सहकार्य घ्यावे.

**मोहन रानडे**/९८२३३७५३००

## वाचक पत्रे

## जागतिक पुस्तक दिनानिमित्त...

पुस्तक हे ज्ञानाचे, संस्कारांचे आणि विचारांचे अमूल्य भांडार आहे. मानवाच्या प्रगतीमध्ये पुस्तकांचा मोठा वाटा आहे. दरवर्षी २३ एप्रिल हा दिवस 'जागतिक पुस्तक दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश वाचनाची आवड वाढवणे आणि पुस्तकांचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवणे हा आहे. आजच्या आधुनिक युगात तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत आहे. मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे लोकांचा वाचनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे. तरीसुद्धा पुस्तकांचे स्थान अजूनही अद्वितीय आहे. लहानपणापासूनच मुलांमध्ये वाचनाची सवय लावली तर त्यांच्या विचारशक्तीचा आणि कल्पनाशक्तीचा विकास होतो. पुस्तके माणसाचे खरे मित्र असतात. ती आपल्याला योग्य मार्गदर्शन करतात, नवीन कल्पना देतात आणि जीवनातील अडचणींवर मात करण्याची प्रेरणा देतात. इतिहास, विज्ञान, साहित्य, तत्त्वज्ञान अशा विविध विषयांवरील पुस्तके आपल्याला जगाकडे व्यापक दृष्टीने पाहायला शिकवतात. जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने शाळा, महाविद्यालये आणि ग्रंथालयांमध्ये विविध उपक्रम आयोजित केले जातात.

वाचन स्पर्धा, पुस्तक प्रदर्शन यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पुस्तकांविषयीची आवड वाढते. आज ई-पुस्तके आणि ऑडिओबुक्सचा वापरही वाढला आहे, ज्यामुळे वाचन अधिक सुलभ झाले आहे. तरीही छापील पुस्तकांचा सुगंध आणि अनुभव वेगळाच असतो. जागतिक पुस्तक दिन हा केवळ एक दिवस नसून वाचन संस्कृती जपण्याचा आणि वाढवण्याचा एक महत्त्वाचा प्रयत्न आहे. पुस्तकांमुळे व्यक्तिमत्त्व विकास होतो, ज्ञान वाढते आणि जीवन अधिक समृद्ध होते. आपण सर्वांनी दररोज थोडा वेळ वाचनासाठी द्यावा आणि इतरांनाही वाचनाची प्रेरणा द्यावी. 'वाचाल तर वाचाल' ही म्हण आपल्या आयुष्यात खऱ्या अर्थाने उतरवणे आवश्यक आहे. आपण सर्व जण वाचनाची सवय लावूया आणि ज्ञानसमृद्ध समाज घडवूया.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ई-मेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पोलीस असल्याची बतावणी करुन वाहनधारकांची लुटमार

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. २२ एप्रिल-**

मंगळवेढा-मरवडे मार्गावर कर्नाटकातील व्यापारी द्राक्षे आणण्यासाठी पिकअप वाहनातून जात असताना बुलेटवरुन आलेल्या दोघांनी हाताचा इशारा करुन मी पोलीस आहे असे बतावणी करुन गाडी थांबवून सीट खाली ठेवलेले ९० हजार रुपये घेवून पोबारा केल्याची घटना घडली असून दोन अनोळखी तोतया पोलीसाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

यातील फिर्यादी इम्तियाज हुसेन (वय ४०, रा.कर्नाटक) हे महिंद्र बोलेरो पिकअप के.ए.१८ बी २४३४ या वाहनावर चालक असून दि.२१ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजता ते पुळूज येथे द्राक्षे खरेदी करण्यासाठी निघाले होते. मंगळवेढा -मरवडे मार्गावर फटेवाडी गावच्या शिवारात विठ्ठल चव्हाण यांच्या शेताजवळ पिकअप आले असता एक काळ्या रंगाची बुलेट मोटर सायकलवर दोन इसम त्यापैकी एक जण खाकी पँट व पांढरा शर्ट घातलेला अंगाने जाड होता. दुसऱ्याच्या अंगात काळ्या रंगाची पँट व पांढरा शर्ट होता. खाकी पँट असल्याने चालकास पोलीस असल्याचे समजून आरोपीने शिट्टी वाजवून इशारा करताच गाडी थांबवली. आरोपीने पोलीस असून त्याचे ओळखपत्रही दाखवले. परंतू हे ओळखपत्र मराठीत असल्याने फिर्यादी हे कन्नड भाषिक असल्याने वाचता आले नाही. तुमच्या गुटखा व दारु असून तुम्ही कुठे घेवून चालला आहे,गाडी चेक करायची आहे असे बोलते करत असताना दुसऱ्या इसमाने गाडी चेक करताना द्राक्ष खरेदीसाठी सीट खाली ठेवलेले ९० हजार रुपये घेवून त्या दोघांनी पोबारा केला. पैसे घेतल्याचे फिर्यादीच्या लक्षात येताच त्यांनी मोटर सायकलचा मरवडे पर्यंत पाठलाग केला मात्र ते मिळून आले नसल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान मंगळवेढ्यात पोलीसांच्या खाकी वर्दीचा वचक संपत चालला असून चोरटे पोलीस असल्याची बतावणी करुन लुटमार करीत आहेत.

कोल्हापूर परीक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांनी गांभीर्यपुर्वक लक्ष घालून येथील चोऱ्या व अशा घटना थांबवाव्यात अशी मागणी होत आहे. आत्तापर्यंत मंगळवेढ्यात अशा तीन घटना घडल्या असूनही पोलीसांना तोतया पोलीस अद्यापही पकडण्यात यश आले नाही. शहरात व ग्रामीण भागात होणाऱ्या घरफोड्या,मका धान्याची चोरी,शेळ्या चोरी,मोटर सायकल चोरी,मोटारी केबल यासह अन्य चोऱ्या पकडण्यात अद्यापतरी यश मिळाले नसल्यामुळे चोरटे शिरजोर बनत चालले आहेत. मागील दोन आठवड्यापुर्वीच मरवडे रस्त्यावर सदरच्या ठिकाणी पोलीस असल्याची बतावणी करुन द्राक्ष खरेदी करण्यासाठी निघालेल्या वाहन चालकाला पोलीस असल्याची बतावणी करुन लुटले होते.

# सोलापूरकरांनी 'मदार'मधून अनुभवली दुष्काळाची आंतरिक वेदना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**

दुष्काळग्रस्त गावातील पाण्याची अत्यंतिक तीव्र समस्या, बेरोजगारी आणि यातून एकूणच मानवी जीवनासमोर उभे ठाकलेले निसर्गाचे आव्हान पाहताना सोलापूरकरांनी मदार मधून दुष्काळाची आंतरिक वेदना अनुभवली. निमित्त होते सोलापूर फिल्म सोसायटी आणि परिवर्तन अकादमी यांच्यावतीने बुधवारी हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात सोलापूरकरांना दाखवण्यात आलेल्या मदार चित्रपटाचे.



२१ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट ठरलेला आणि फ्रान्समध्ये कान्स चित्रपट महोत्सवात जगभरातील रसिकांच्या कौतुकाचा विषय ठरलेला मदार चित्रपट सोलापूरकरांना पाहता यावा याकरिता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील रहिवासी असलेले दिग्दर्शक मंगेश बदर यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे.

या चित्रपटात दुष्काळामुळे पाण्याअभावी गावकऱ्यांचे होणारे हाल, परिणामी पुणे मुंबई सारख्या मोठ्या शहरांमध्ये होणारे तरुणांचे स्थलांतर यांचे अत्यंत वास्तववादी चित्रीकरण करण्यात आले आहे. पाण्याचा अभाव आणि यात भरीस भर म्हणून आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या गावकऱ्यांचे असह्य झालेले जगणे पाहून रसिकांच्या मनाचा ठाव चुकला. पाणीटंचाईची समस्या असह्य झाल्यानंतर मेघराजाच्या कृपेमुळे गावात बरसलेला पाऊस आणि त्यामुळे गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधानाचे हसू रसिकांच्या प्रचंड टाळ्यांचे कारण ठरले. यावेळी चित्रपटाचे दिग्दर्शक मंगेश बदर हेही उपस्थित होते. रसिकांनी चित्रपट पाहिल्यानंतर मंगेश बदर यांना भेटून त्यांचे कौतुक केले. मदार चित्रपट पाहण्यासाठी सोलापूरकरांनी तुडुंब गर्दी केली होती. सोलापूर फिल्म सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नवनीत तोष्णीवाल यांनी प्रास्ताविक केले तर सचिव प्रा. मनोज कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी शिरीष देखणे, गिरीष कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# गुंठेवारी शिबिरामुळे मालमत्तेसंबंधित प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लागतील : महापौर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**



गुंठेवारी शिबिरामुळे शहरातील नागरिकांना त्यांच्या हक्काचे प्रॉपर्टी कार्ड मिळणार असून, त्यांच्या मालमत्तेसंबंधित प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागतील. तसेच या सर्व प्रक्रियेमुळे सोलापूर महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी या शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर विनायक कोंड्याल यांनी केले.

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने प्रभाग क्र. १२ मधील नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या नीलम नगर, एमआयडीसी येथील नेताजी सभागृह येथे गुंठेवारी शिबिरास आज महापौर विनायक कोंड्याल यांनी भेट देऊन पाहणी केली. या विशेष शिबिरामध्ये प्रभागातील नागरिकांच्या मालमत्तेसंदर्भातील विविध प्रलंबित बाबी मार्गी लावण्यासाठी हद्दवाढ, मोजणी तसेच नोटरीद्वारे झालेल्या खरेदी व्यवहारांची नोंदणी करण्याची सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांना वेगवेगळ्या कार्यालयांत हेलपाटे मारावे लागू नये, यासाठी प्रशासनाने सर्व संबंधित विभागांचा समन्वय साधून हे शिबिर आयोजित केले आहे. महापौर कोंड्याल यांनी शिबिरातील सुविधा, कागदपत्र पडताळणी प्रक्रिया, पाहणी केली व संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी कामकाज पारदर्शक, जलद व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्याच्या सूचना दिल्या. कोणत्याही नागरिकाला अडचण येऊ नये व प्रत्येक अर्जदाराला योग्य मार्गदर्शन मिळावे, यासाठी विशेष दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले.यावेळी नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूलचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार यांच्या हस्ते महापौर विनायक कोंड्याल यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेवक सिद्धेश्वर कमटम यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी उपअभियंता नीलकंठ मठपती, सहाय्यक अभियंता आनंद जोशी, सहाय्यक अभियंता शकील शेख, सहायक अभियंता महेश क्षीरसागर, गौरीशंकर आळंगे विश्वराध्य मठपती, राम मगर, शिवा कोळी, व्यंकटेश वाशी, श्रीनिवास बुटा, शुभम जिल्हा,मलू अष्टगे, श्री बुधाराम, इर्शाद जरतार, दिपाली मेटकरी, रेखा चिंतलवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**'वित्तीय मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, २००२' च्या कलम १३ (२) अन्वये सूचना.**

खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट बँक लिमिटेड** जी **आयडीएफसी बँक बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खालीलप्रमाणे सुरक्षित कर्जे घेतली आहेत. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सहकर्जदारांची ही कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणाद्वारे सुरक्षित करण्यात आली आहेत. संबंधित कर्ज करारांमधील अटी व शर्तीचे पालन करण्यात ते अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांच्या कर्जफेडीमध्ये अनियमितता निर्माण झाल्यामुळे, रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांची कर्जे 'अनुत्पादक मालमत्ता' म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडे त्यांच्याकडून येणे असलेली रक्कम, त्यांना जारी करण्यात आलेल्या संबंधित सूचनांनुसार खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद करण्यात आली आहे; तसेच सदर रकमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि हे व्याज संबंधित तारखांपासून करारातील दराप्रमाणे आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 158388564 | मालमत्तेवर कर्ज | 1. अक्षय भीमराव शिरतोडे<br>2. भीमराव शिरतोडे | 26/02/2026 | INR 7,60,522.25/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक 907 असलेली, 1200 चौ.फूट क्षेत्रफळ असलेली मालमत्तेची संपूर्ण जागा आणि 5000 चौ.फूट क्षेत्रफळ असलेली मोकळी जागा; जी गाव कोंडबावी, तालुका माळशिरस, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र येथे स्थित आहे. सदर मालमत्तेच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे :- उत्तर - राजेंद्र चव्हाण (घर), दक्षिण - अर्जुन शिरतोडे (घर), पूर्व - रस्ता, पश्चिम - मोकळी जागा.

तुम्हाला याद्वारे आवाहन करण्यात येत आहे की, तुम्ही आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आहे आणि आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) वरील तक्त्यात दर्शविलेल्या तपशिलानुसार रक्कम, त्यावरील व्याजदर आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह, संबंधित तारखांनुसार, या प्रकाशनाच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत अदा करावी. असे करण्यात अयशस्वी झाल्यास, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आहे आणि आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम वसूल करण्यासाठी, सरफेसी कायद्याच्या कलम 13(4) आणि कलम 14 अन्वये उपरोक्त गहाण ठेवलेल्या मालमत्तांविरुद्ध कार्यवाही सुरू करण्याचा अधिकार अधोस्वाक्षरीकर्त्यास असेल. याव्यतिरिक्त, उक्त कायद्याच्या कलम 13(13) अन्वये, तुम्हाला उपरोक्त तारण ठेवलेल्या मालमत्ता विकण्यास/भाड्याने देण्यास किंवा अन्यथा हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

स्वाक्षरी/-
प्राधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आहे आणि आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)

दिनांक : 23/04/2026
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र



# चंद्रबाबू नायडूंच्या वाढदिवसानिमित्त तेलुगु प्रशिक्षण वर्गास सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ ऑगस्ट-**

एन. टी.आर अभिमान संघम आणि तेलुगु भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयम, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आंध्र प्रदेश मुख्यमंत्री नारा चंद्रबाबू नायडू यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त तेलुगु भाषा वाचन व लेखन प्रशिक्षण वर्गास सुरुवात करण्यात आली. हे प्रशिक्षण २५मे पर्यंत होईल.

प्रथम तेलुगु तल्ली प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून द्वीप प्रज्वलन करण्यात आले. नगरसेवक विजय चिप्पा यांनी मनोगतात तेलुगु भाषा शिकणे गरजेचे असून आंध्र प्रदेश व तेलंगाना येथे गेले असता आपल्याला त्याचा उपयोग होतो असे मत व्यक्त केले. प्रास्ताविकात ग्रंथालयमचे अध्यक्ष मल्लिकार्जुन कमटम यांनी गेल्या पन्नास वर्षापासून तेलुगु भाषा वाचन व लेखन प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येत आहे असे सांगितले. नगरसेवक सत्यनारायण गुर्रम यांनी अध्यक्षीय समारोपात आपल्याला तेलुगु भाषा वाचता लिहिता येणे आवश्यक आहे, यामुळे आपल्याला तेलुगु साहित्य कळते, असे मत व्यक्त केले. यावेळी शिक्षिका राजलक्ष्मी गुडूर यांनी तेलुगु भाषा प्रशिक्षणाला सुरुवात केली.

यावेळी ग्रंथालयमचे सचिव तिपण्णा गणेरी, कार्याध्यक्ष बालराज बोल्ली, उपाध्यक्ष श्रीनिवास यनगंदूल, सदस्य संजीव नादरगी, शंकर चौगुले, नरसिंहम कनकी ग्रंथपाल विजयालक्ष्मी गुडूर, मोहन सामलेटी, ॲड श्रीनिवास क्यातम, जनार्दन इंजामुरी, किसन आडम, शंकर द्यावरकोंडा, श्रीनिवास गणेरी, साईकुमार अलवाल, वेणुगोपाल म्याना, ईरण्णा भंडारी, श्रीनिवास नंदाल, तिमप्पा गडगी, रायलिंग मिठ्ठापल्ली, बाळकृष्ण आंबट, पुरुषोत्तम बुधारम आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवियत्री रेणुका बुधारम यांनी केले. कवी प्रा. नरेंद्र गुंडेली यांनी आभार मानले.

## चुक दुरूस्ती नोटीस

आमच्या अशिल सुवर्णा कोंडी यांच्याकडून यापूर्वी दि. ०६/०४/२०२६ रोजी त्या नोटीसीमध्ये नमूद केलेले मिळकतीबाबत जाहीर नोटीस तरुण भारत या दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द केलेली होती. मात्र त्या नोटीसीमध्ये आमचे अशिलाचे नांव प्रियंका शितल कांबळे असे चुकुन टायपिंग मिस्टेकमुळे आलेली आहे. तरी आमचे अशिलाचे नाव प्रियंका शितल कांबळे ऐवजी सुवर्णा कोंडी असे वाचण्यात यावे.

हे चुक दुरूस्ती नोटीस दिली तारीख-२२/०४/२०२६

सही/-
**ॲड. हरिसिंग जा. राजपूत**
**बी.कॉम., एम.एस.डब्ल्यू., एलएल.बी.**
**रा.ए-३९, शिवगंगा नगर भाग-१,**
**जुळे सोलापूर, सोलापूर-४१३००४**
**मो.नं.९६२३५२२७८९**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १७/२०२६
नि. ६

## अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

**श्रीमती शबनम इस्माईल मुजावर,**
वय - ५४ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. दस्तगीर गल्ली, अक्कलकोट,
ता. अक्कलकोट, जि. सोलापूर. — **अर्जदार**

विरुध्द

**कोणीही नाही** **- सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांचे वडील इस्माईल दस्तगीर मुजावर यांचे दिनांक ०४/०४/२००१ रोजी अक्कलकोट येथे मयत झालेले आहे. यातील अर्जदार हे इस्माईल दस्तगीर मुजावर यांचे कायदेशीर वारस आहे असे घोषित होऊन त्यांचे नावे वारसा दाखला मिळणेसाठी या मे. कोर्टात अर्ज सादर केलेले आहे.

त्याअर्थी मयत इस्माईल दस्तगीर मुजावर यांचे कायदेशीर वारस आहे असे घोषित होऊन त्यांचे नावे वारसा दाखला यांना अर्जदार यांचे व्यतिरिक्त इतर कोणी कायदेशीर वारस असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत अथवा पुढील नेमलेली तारीख १७/०६/२०२६ रोजी स्वतः अथवा प्रतिनिधीमार्फत हजर होऊन आपली लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास मे. कोर्ट अर्जदार यांचे नावे वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) देण्याचे पुढील हुकूम करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

आज दिनांक २२ माहे ४ इसवी सन २०२६ रोजी आमच्या सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रसिध्द केले.

**सही/-**
**लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक,**
**अधिक्षक दिवाणी न्यायालय**
**क. स्तर, अक्कलकोट**

## ग्रामपंचायत निमगाव (मा) ता. माढा, जि. सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत निमगाव (मा) ता. माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोत्यात निविदा मागविण्यात येत आहे

**लेखाशीर्ष :-**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार पर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जि.प.शाळा दुरुस्ती ररंगोटी करणे | ३८,९६०/- | ० | १००/- | ३ महिने | सु.बे. |
| २ | विस्तारीत दलित वस्तीमध्ये रस्ता करणे | १,५०,०००/- | ० | १००/- | ३ महिने | सु.बे. |
| ३ | प्राथमिक आरोग्यकेंद्र दुरुस्ती करणे | ३०,०००/- | ० | १००/- | ३ महिने | सु.बे. |
| ४ | जि.प.शाळा दिव्यांगासाठी रॅम्प दुरुस्ती करणे | २०,०००/- | ० | १००/- | ३ महिने | सु.बे. |
| ५ | गावांतर्गत बंदिस्त गटर करणे, गटर दुरुस्ती करणे, सांडपाणी व्यवस्थापन करणे | ३,३५,२२०/- | ० | १००/- | ३ महिने | सु.बे. |
| ६ | मातंग वस्तीमध्ये पाणी टाकी दुरुस्ती करणे | २८,६२७/- | ० | १००/- | ३ महिने | सु.बे. |
| ७ | विस्तारीत दलित वस्तीमध्ये बोरवेल घेणे | १,५०,०००/- | ० | १००/- | ३ महिने | सु.बे. |
| ८ | गावांतर्गत पाणीपुरवठा देखभाल दुरुस्ती करणे | ६६,५९३/- | ० | १००/- | ३ महिने | सु.बे. |

**टीप -**
१) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि. २३/०४/२०२६ सकाळी ११.०० पासून
२) भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक ३०/०४/२०२६ पर्यंत सकाळी ११ ते ०० वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय निमगाव (मा)
३) निविदा उघडण्याचा दिनांक ०४/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता
४) निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.
५) निविदा मंजूर/नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**पद्मराज जाधवर**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रा.पं. निमगाव (मा) ता. माढा**

**शिक्का**

**सही/-**
**राजेंद्र बारंगुळे**
**सरपंच**
**ग्रा.पं. निमगाव (मा) ता. माढा**

# शेतीच्या कारणावरुन मुलांची वडिलास मारहाण

**मंगळवेढा, दि. २२ एप्रिल-**

तुमच्या नावावर असलेली शेती आमच्या नावावर करा असे म्हणत एका ५० वर्षीय पित्यास मुलाने मारहाण केल्याची घटना घडली असून या प्रकरणी पत्नी राधाबाई व दोन मुले दऱ्याप्पा व बिरुदेव यांच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस दिलेली माहिती अशी,यातील जखमी फिर्यादी धोंडीबा नामदेव ढगे (वय ५०) यांना दि.२० एप्रिल रोजी रात्री १०.३० च्या दरम्यान ते जेवण करुन टीव्ही पाहत बसले असताना पत्नी राधाबाई व दोन मुले जवळ आले व त्यांनी फिर्यादीस तुमच्या नावावर असलेली शेती आमच्या नावावर करा असे म्हणत शिवीगाळी सुरु केली. त्यावेळी फिर्यादीने पत्नीस मुलीच्या लग्नासाठी पैसे खर्च झालेले आहेत. त्यामुळे तीन लाख रुपये कर्ज झाले आहे असे सांगत असाना तिघांनी मिळून लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. चहाचे पातेले पाठीवर व तोंडावर मारल्याने जखमेतून रक्त येवू लागले. या दरम्यान फिर्यादी ओरडताच आवाज ऐकून फिर्यादीचे आई वडिल धावत आले व मारु नका असे म्हणाले असतानाही त्यांनी ऐकले नाही. मारहाण करीत तुला जीवंत सोडत नाही असे म्हणाल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

## CHANGE OF NAME

I hereby declare that my Old Name: - **ALTAF HUSAIN BUZRUK LALKOT** has been changed to New Name :- **ALTAF HUSAIN BUZRUKSAB LALKOT**
Address:- HOUSE NO 131, Dr. ANSARI CHOWK, SHASTRI NAGAR, SOLAPUR, 413003

## CHANGE OF NAME

I hereby declare that my Old Name :- **KAUSAR BEGUM ALTAF HUSAIN LALKOT** has been changed to New Name :- **KAUSAR BANO ALTAF HUSAIN LALKOT**
Address:- HOUSE NO 131, Dr. ANSARI CHOWK, SHASTRI NAGAR, SOLAPUR, 413003

## नावात बदल

नाझे लग्नाआधीचे (वडिलांकडील) नाव **महेमूदाबी बाबूलाल शेख** असे होते. लग्नानंतरचे नवीन नाव **महामुदा अ.जब्बार प्यारे** असे आहे. सदर दोन्ही नावाची एकच व्यक्ती आहे. पत्ता २२३, तेलंगी पाच्छा पेठ, जेल रोडजवळ, सोलापूर ४१३००५
**गॅझेट नोंदणी क्र. पी-२५९२०६३**

Classifieds

## विकणे आहे

'मारुती अपार्टमेंट' रुबी नगर सिध्देश्वर ज्वेलर्स समोर बॉम्बे पार्क रोड, जुळे सोलापूर येथील दुसऱ्या मजल्यावरील २ बीएचके प्लॅट लमसम रकमेवर भाडेवर अथवा योग्य किंमतीस विकणे आहे.
मो. ९६७३१६१६९०/ ८१८०८६१०३८/ ९२२५७४९०४०

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील पेठ फक्रोद्दीन नगर, झोपडपट्टी, दक्षिण सदर बझार, सोलापूर या नावाने ओळखले जाणाऱ्या नगरातील झोपडी घर नं. १३६ ही मिळकत झोपडी घरजागा आमचे अशील अशपाक रफिक शेख यांचे मयत वडील पै. रफिक उमरसो शेख यांचे नावावर असून याची नोंद सोलापूर महानगरपालिकेच्या ग.व.सु. विभागात कर आकारणीस नोंद आहे. सदर ठिकाणी त्यांचे नांवे १५ x २० फुटाची एक खोली आहे व समोरील बाजूस व्हरांडा आहे. सदरची खोली वीट, मातीने बांधून वरती पन्हाळी पत्रे व अँगल घातलेले आहेत.

पै. रफिक उमरसो शेख यांचे दिनांक ३०/०१/२०२१ रोजी मृत्यू झालेला आहे तसेच आमचे अशिलाचे आई शहनाज रफिक शेख या देखील आमचे अशिलाचे लहानपणीच मयत झालेली आहे. त्या दोघांच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा नामे अशपाक रफिक शेख हा मुलगा या नात्याने कायदेशीर वारस आहे व त्यांचे व्यतिरिक्त १) बिस्मिल्ला रफिक शेख, २) फातिमा उमर पठाण व ३) बीबीआयेशा रफिक शेख असे तीन मुली वारस आहेत. सदरहू वर नमूद घरजागेत आमचे अशील अशपाक रफिक शेख हे त्यांच्या कुटुंबासह राहण्यास असून त्यांचे आई वडिलांचे हयातीपासून सदरहू घर जागेत ते राहण्यास आहेत. याकरिता वर नमूद तिघा बहिणींनी आमचे अशील अशपाक रफिक शेख यांचे एकट्याचेच नावाची वारस नोंद होण्यास संमती दिलेली आहे.

तरी सदरहू वर नमूद झोपडी घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर कोणाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षीस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षीसपत्र, अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर अथवा आमचे अशिलाचे वर नमूद पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही झोपडी घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशील त्यांचे वर नमूद घरजागेवर त्यांचे नावाची वारस नोंद सो.म.पा.चे कर आकारणी व कर संकलन विभाग, ग.व.सु. विभागाचे दप्तरी त्यांचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचीही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

ही नोटीस दिली तारीख : २२/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. ढेकणे एस.एम.**
**रा. १२६-अ, वाणी गल्ली बाळे,**
**ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

**नमुना झेड**
**(नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) पहा)**

### स्थावर मालमत्ता ताब्यात घेतलेबाबतची नोटीस

ज्या अर्थी खाली सही करणार विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री कृष्णाहरी यल्लप्पा मैसूर C/O श्री महावीर अर्बन को. ऑप. बँक ली., सोलापूर ही संस्था महाराष्ट्र सहकारी कायदा १९६१ अन्वये यादीतील ऋणको (थकबाकीदार) याने रक्कम जमा करण्यास कसूर केले आहे. त्या अर्थी खाली सही करणाऱ्याने खालील नमूद यादीतील ऋणको यांची स्थावर मिळकतबाबत जप्तीची नोटीस देऊन व रजि. गहाणखत अन्वये गहाण ठेवलेली यापुढे निर्दिष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्त केलेली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला आणि सर्व नागरिकांना जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार प्रतीकात्मक (सिम्बॉलिक) ताबा घेतलेला आहे.

विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, खाली नमूद केलेल्या मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को-ऑप. बँक ली., सोलापूर या संस्थेच्या खाली नमूद केलेल्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व भविष्यात होणारे इतर खर्चाचा बोजा सदर मिळकतीवर राहील, याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | कर्जदार / जामिनदाराचे / मिळकतदाराचे नाव | मिळकतीचे वर्णन | सि.स.नं./ गट नं / क्षेत्र | दिनांक मागणी नोटीस व प्रतिकात्मक ताबा ३१/०३/२०२६ अखेर येणेबाकी |
|---|---|---|---|---|
| १ | सिटी ट्रेडिंग ॲन्ड कंपनी प्रोप्रा. असलम मोहमद युसुफ बागवान | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोमपा हद्दीतील न्यू पाच्छा पेठ टीपी.१, | सि.स.नं. १०३८४ पैकी फा. प्लॉट नं.२९/ए याचे क्षेत्र ३५८.६३ चौ. मी. यांसी पूर्वेस - प्लॉट नं.२९/ए पैकी राहिलेले क्षेत्र, दक्षिणेस - प्लॉट नं.२९/ए पैकी अ मुनाफ महिबूब बागवान यांचे क्षेत्र, पश्चिमेस - रस्ता, उत्तरेस - रस्ता | २३/०८/२०२४<br>२१/०४/२०२६<br>रु. १,८२,३७,२७५/- |

वरील सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा, ताबा पत्रावर सही करून, खाली नमूद वसुली अधिकारी यांच्याकडून संपूर्ण थकबाकी भरून या जाहीर प्रसिद्धीकरण दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत घ्यावा. अन्यथा, तसे न केल्यास मुदतीनंतर सदर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्याची कायदेशीर प्रक्रिया मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे अर्ज करून पार पाडले जाईल व तसेच उपरोक्त स्थावर मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल. तरी त्यापुढील होणाऱ्या सर्व परिणामास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : २१/०४/२०२६**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**






## महत्त्वाचे

### महाराष्ट्राला १९ वर्षांखालील टेबल टेनिसचे उपविजेतेपद

**डेहराडून** : येथे आयोजित आंतरराज्य कनिष्ठ आणि युवा राष्ट्रीय टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राच्या १९ वर्षांखालील मुलांच्या संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. तामिळनाडूने महाराष्ट्राचा ३-१ ने पराभव करत सांघिक विजेतेपदावर आपले नाव कोरले आणि आपल्या टेबल टेनिसमधील नैपुण्याचे प्रदर्शन घडविले. तामिळनाडूच्या मोहिमेचे नेतृत्व अत्यंत भक्कम कामगिरी करणाऱ्या पी. बी. अभिनंदने केले. त्याने नील मुळे व कुशल चोपडा यांच्यावर निर्विवाद विजय मिळविले व परतीच्या एकेरीच्या सामन्यात विजयाची मोहोर उमटवत विजेतेपद मोठ्या दिमाखात निश्चित केले. महाराष्ट्राचा संघ मोठ्या प्रमाणावर चोपडावर अवलंबून होता. चोपडाने महाराष्ट्राला अंतिम फेरीपर्यंत पोहोचवले, परंतु त्याच वेळी त्यांच्या संघात क्षमतेची कमतरता असल्याचे दिसून आले. मुळेने कडवी झुंज दिली खरी, परंतु निर्णायक क्षणी ही जोडी तामिळनाडूच्या संतुलित आणि सर्वसमावेशक ताकदीची बरोबरी करू शकली नाही.

### मोहम्मद नवाझचे भविष्य अनिश्चित

**कराची** : २०२६ च्या टी-२० विश्वचषक स्पर्धेदरम्यान झालेल्या ड्रग्ज चाचणीत पॉझिटिव्ह आढळल्याच्या वृत्तामुळे चौकशी सुरू झाली असून, पाकिस्तानचा अष्टपैलू खेळाडू मोहम्मद नवाझच्या भविष्याबद्दल अनिश्चितता निर्माण झाली आहे.



स्पर्धेदरम्यान मोहम्मद नवाझकडून घेतलेल्या नमुन्यात मनोरंजनासाठी ड्रग्जच्या सेवनाचे कथित पॉझिटिव्ह निष्कर्ष आले आहेत. नवाझला आता पाकिस्तान क्रिकेट मंडळाच्या चौकशीला सामोरे जावे लागत आहे, त्यामुळे खेळाडूंचे वर्तन आणि डोपिंगविरोधी मानकांवर नवीन प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नवाझने विश्वचषक मोहिमेदरम्यान पाकिस्तानसाठी सर्व सात सामने खेळले आणि संघाला सुपर एट टप्प्यापर्यंत पोहोचण्यास मदत केली. फलंदाजीतील त्याची कामगिरी माफक असली तरी, त्याने सात बळी घेतले आणि एक विश्वासार्ह अष्टपैलू खेळाडू म्हणून आपली भूमिका बजावत राहिला.

### प्रशिक्षकावर हल्ला प्रकरणी पुद्दुचेरीचे तीन क्रिकेटपटू निलंबित

**पुद्दुचेरी** : पुद्दुचेरी क्रिकेट संघटनेने आपल्या तीन प्रथम-श्रेणी क्रिकेटपटूंना तात्काळ प्रभावाने निलंबित केले आहे. गत वर्षी ८ डिसेंबर रोजी १९ वर्षांखालील राज्य संघाचे प्रशिक्षक व्यंकटरमण यांच्यावर या खेळाडूंनी हल्ला केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे; या राज्यस्तरीय संस्थेने बुधवारी ही घोषणा केली. जे. कार्तिकेयन, ए. अरविंदराज आणि एस. संतोष कुमारनया तीनही खेळाडूंनी अलिकडच्या वर्षांत रणजी करंडक, विजय हजारे करंडक आणि सय्यद मुश्ताक अली करंडक या स्पर्धांमध्ये पुद्दुचेरीचे प्रतिनिधित्व केले आहे. किंबहुना, अरविंदराज याने गेल्या देशांतर्गत हंगामातही या केंद्रशासित प्रदेशाचे प्रतिनिधित्व केले होते. या तिघांवर व्यंकटरमण यांची हत्या करण्याचा प्रयत्न केल्याचा आणि त्यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. सेदुरापेट पोलीस ठाण्याच्या स्टेशन हाऊस ऑफिसरने एफआयआर औपचारिक दोषारोपपत्र दाखल केले असून, हे प्रकरण सध्या पुद्दुचेरी येथील न्यायिक दंडाधिकारी यांच्या न्यायालयात प्रलंबित आहे, असे पुद्दुचेरी क्रिकेट संघटनेने म्हटले आहे.

### रिअल माद्रिदचा अलावेसवर २-१ ने विजय

**माद्रिद** : रिअल माद्रिदने ला लीगा फुटबॉल स्पर्धेत घरच्या मैदानावर संघर्ष करणाऱ्या अलावेसवर २-१ असा विजय मिळवला. कायलियन एमबाप्पे व विनिसियस ज्युनियरने केलेल्या गोलच्या जोरावर रिअल माद्रिदने सर्व स्पर्धांमधील आपली चार सामन्यांची विजयाविना असलेली मालिका संपविली. या विजया मुळे दुसऱ्या स्थानावर असलेला रिअल संघ ७३ गुणांवर पोहोचला आहे. आता त्यांचा सामना सेल्टा व्हिगोविरुद्ध घरच्या मैदानावर होणार आहे. अलावेससाठी, या पराभवामुळे ते १७ व्या स्थानावर आहेत, हे रेलीगेशनच्या अंतिम स्थानावरील एल्चेपेक्षा एका गुणाने पुढे आहेत. म्युनिचकडून चॅम्पियन्स लीगमध्ये नुकत्याच झालेल्या पराभवातून सावरण्याचा प्रयत्न करणाऱ्या रिअलने सामन्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात वर्चस्व गाजवले, तसेच त्यांना ला लीगा मधील आपले शेवटचे सामनेही जिंकले.

# राजस्थानची उडाली भंबेरी

### लखनौच्या वेगवान गोलंदाजाचे वर्चस्व

**लखनौ, २२ एप्रिल**


१९ व्या इंडियन प्रीमियिर लीग हंगामात बुधवारी घरच्या मैदानावर राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या आयपीएल सामन्यात लखनौ सुपर जायण्ट्सच्या वेगवान गोलंदाजांनी वर्चस्व गाजविले. प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्सची भंबेरी उडाली. लखनौने जबरदस्त गोलंदाजी व क्षेत्ररक्षण करीत राजस्थान रॉयल्सला मर्यादित २० षटकांत ६ बाद १५९ धावांवर रोखले. आता लखनौ संघासमोर विजयासाठी १६० धावांचे सोपे लक्ष्य राहिले.

लखनौचा कर्णधार ऋषभ पंतने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला, कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित त्यांच्या गोलंदाजांनी वेगवान मारा करीत तिसऱ्या षटकांतच राजस्थान रॉयल्सला दोन जबरदस्त हादरे दिले व चौथ्या षटकांत आणखी एक धक्का दिला. विशेषतः मोहम्मद शमीने लागोपाठ चेंडूवर यशस्वी जयस्वाल व ध्रुव जुरेलला बाद केले. चार षटकांत राजस्थान रॉल्सने ३२ धावांत तीन महत्त्वपूर्ण मोहरे गमावले. शमीने सलामीवीर यशस्वी जयस्वालला (२२) यष्टीमागे पंतकडे झेस सोपविण्यास भाग पाडले, त्यानंतर पुढच्याच चेंडूवर ध्रुव जुरेलला (०) आल्यापावली तंबूत परत पाठविले. नंतर मोहसीन खानने पहिले निर्धाव षटक टाकत वैभव सूर्यवंशीला (८) राठीकडून झेलबाद केले.

कर्णधार रियान पराग व शिमरॉन हेटमायरने संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला, परंतु प्रिन्स यादवने परागला (२०) पूरनकडून झेलबाद केले. रियानने हेटमायरसोबत ३० धावांची भागीदारी केली. नंतर हेटमायर रवींद्र जडेजाच्या साथीने संघाची धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला, परंतु मोहसीन खानने हेटमायरच्या रुपात आपला दुसरा बळी घेतला. हेटमायरने १८ चेंडूंत २२ धावा केल्या. तोपर्यंत राजस्थान रॉयल्सने १०.२ षटकांत ७७ धावांत आपला निम्मा संघ गमावला.


मोहम्मद शमी


मोहसीन खान


प्रिन्स यादव

अष्टपैलू रवींद्र जडेजाने डोनोव्हन फरेराच्या साथीने संघाला १६ षटकांत शंभर धावांचा टप्पा ओलांडून दिला.

प्रिन्स यादवच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी फरेराने १९ चेंडूंत २० धावांची भर घातली व सहाव्या गड्यासाठी ३३ धावांची भागीदारी केली. जडेजाने शुभम दुबेच्या साथीने नाबाद खेळी करत राजस्थान रॉयल्सला ६ बाद १५९ धावा उभारून दिल्या. रवींद्र जडेजाने २९ चेंडूंत २ चौकार व एका षट्काराच्या मदतीने नाबाद ४३ धावांची खेळी केली, तर शुभम १९ धावांवर नाबाद राहिला. लखनौकडून मोहम्मद शमी, प्रिन्स यादव व मोहसीन खानने प्रत्येकी २ बळी घेतले. (वृत्तसंस्था)

### वैभव सूर्यवंशीचा नवा विक्रम

लखनौ सुपर जायण्ट्सविरुद्धच्या सामन्यात राजस्थान रॉयल्सच्या वैभव सूर्यवंशीने ११ चेंडूंत २ चौकारांसह ८ धावांची खेळी केली. या कामगिरीच्या आधारावर सूर्यवंशीने आयपीएलमध्ये २२७ चेंडूंत ५०० धावा पूर्ण केल्या. त्याची ही आयपीएलमधील सर्वात वेगवान कामगिरी ठरली. यापूर्वीचा विक्रम ग्लेन मॅक्सवेलच्या नावावर होता, त्याने २६० चेंडूंमध्ये हा टप्पा गाठला होता.

सूर्यवंशीने आपल्या नेहमीच्याच आक्रमक शैलीत डावाची सुरुवात केली. दुसऱ्या षटकांत प्रिन्स यादवच्या पहिल्या दोन चेंडूंवरच त्याने दोन चौकार ठोकले.

# सचिन खेळाच्या माध्यमातून दंतेवाडाचा कायापालाट करणार

**दंतेवाडा, २२ एप्रिल**

क्रिकेट दिग्गज सचिन तेंडुलकर छत्तीसगडमधील दंतेवाडा येथे एका तळागाळातील क्रीडा उपक्रमाचे नेतृत्व करीत आहे. एकेकाळी नक्षलग्रस्त असलेल्या या प्रदेशातील तरुणांसाठी एका भरभराटीस आलेल्या क्रीडा केंद्रात रूपांतर करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

सचिन तेंडुलकर जगदलपूर विमानतळावर दाखल झाला व त्यानंतर त्याने दंतेवाडा जिल्ह्यातील छिंदनार गावाला भेट दिली. या ठिकाणी मैदान कप उपक्रमांतर्गत एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

मैदान कप उपक्रमांतर्गत आम्ही सुमारे ५० शाळांची क्रीडांगणे विकसित केली आहेत, याचा मला मनस्वी आनंद होत आहे, असे तेंडुलकर जगदलपूर विमानतळावर पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाला.

दंतेवाडा येथे मैदान कप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, याला मानदेशी व सचिन तेंडुलकर फाऊंडेशनचा पाठिंबा लाभला आहे. या उपक्रमामुळे ५,००० हून अधिक मुलांना फायदा होत आहे.

**क्रीडा संस्कृतीला चालना**

या प्रदेशाची संघर्षग्रस्त अशी ओळख पुसून काढण्यासाठी व क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, गेल्या वर्षी मानदेशी आणि सचिन तेंडुलकर फाऊंडेशन यांच्या सहयोगाने मैदान कप उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला होता, असे जिल्हा प्रशासनाच्या सूत्राने सांगितले.


क्रिकेट दिग्गज सचिन तेंडुलकरचे बुधवारी छत्तीसगडमधील बस्तर, जगदलपूर येथील माँ दंतेश्वरी विमानतळावर आगमन झाले, तेव्हाचा क्षण

या क्रीडा स्पर्धेत कबड्डी, खो-खो, ॲथ्लेटिक्स व व्हॉलीबॉल यांसारख्या खेळांचा समावेश आहे. कदाचित मलाही या मुलांसोबत खेळण्याची संधी मिळेल, असे तेंडुलकर म्हणाला. (वृत्तसंस्था)

# चार भारतीय मुष्टियोद्धे 'टॉप्स'च्या मुख्य गटामध्ये

**नवी दिल्ली, २२ एप्रिल**

चार भारतीय मुष्टियोद्धे - प्रीती पवार, प्रिया, अरुंधती चौधरी आणि सचिनची २०२६ च्या आशियाई मुष्टियुद्ध एलिट स्पर्धेतील त्यांच्या प्रभावी कामगिरीमुळे टार्गेट ऑलिम्पिक पोडियम स्कीमच्या (टॉप्स) मुख्य गटामध्ये बढती करण्यात आली आहे; तर इतर तिघांचा विकास गटामध्ये समावेश करण्यात आला आहे.

हा निर्णय बुधवारी पार पडलेल्या मिशन ऑलिम्पिक सेलच्या (एमओसी) १७२ व्या बैठकीदरम्यान घेण्यात आला.

या महिन्याच्या सुरुवातीला मंगोलियातील उलानबातर येथे पार पडलेल्या या खंडीय स्पर्धेत प्रीती (५४ किलो), प्रिया (६० किलो) आणि अरुंधतीने (७० किलो) सुवर्णपदकाची कमाई केली, तर सचिनने (६० किलो) रौप्यपदक पटकावले.

आराखड्यांतर्गत खेळाडूंच्या कामगिरीचा आढावा घेणाऱ्या मिशन ऑलिम्पिक सेलने, अलीकडील स्पर्धांमधील निकाल, जागतिक क्रमवारी



आणि कामगिरीतील प्रगती यांच्या सखोल मूल्यमापनावर आधारित हा निर्णय घेतला आहे.

प्रीती या वर्षाच्या उत्तरार्धात नियोजित असलेल्या ग्लासगो येथील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा व जपान येथील आशियाई क्रीडा स्पर्धा, या दोन्ही स्पर्धांमध्ये सहभागी होणार आहे. प्रीतीसोबतच जैस्मिन (५७ किलो), प्रिया (महिला ६० किलो), अरुंधती (महिला ७० किलो) आणि सचिन (पुरुष ६० किलो) हे खेळाडूही या स्पर्धेत सहभागी असतील. प्रीती, प्रिया आणि सचिन हे खेळाडू आशियाई क्रीडा स्पर्धेतही सहभागी होत आहेत. बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या निवड धोरणानुसार, या मुष्टियोद्ध्यांनी थेट पात्रतेच्या आधारे २०२६ च्या राष्ट्रकुल आणि आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये स्थान मिळविले आहे. (वृत्तसंस्था)

### दक्षिण आशियाई महिला फुटबॉल गोव्यात

**ढाका, २२ एप्रिल**

आगामी २५ मे ते ६ जून या कालावधीत गोव्यातील मडगाव येथे होणाऱ्या दक्षिण आशियाई महिला फुटबॉल स्पर्धेच्या (साफ) गट ब मध्ये भारतीय महिला फुटबॉल संघाची बांगलादेश व मालदीव या संघांसोबत गटवारी करण्यात आली आहे. गट अ मध्ये नेपाळ, श्रीलंका आणि भूतान या संघांचा समावेश आहे.

बुधवारी ढाका येथील सचिवालयात पार पडलेल्या सोडतीनुसार, प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत प्रवेश करतील. पाकिस्तानने आपला संघ न पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.

दक्षिण आशियाई महिला फुटबॉल स्पर्धेचे यजमानपद भूषविण्याची भारताची ही दुसरी वेळ असेल. यापूर्वी २०१६ मध्ये पश्चिम बंगालमधील सिलीगुडी येथे भारताने या स्पर्धेचे यजमानपद भूषविले होते व त्यावेळी भारताने आपले चौथे विजेतेपद पटकावले होते.

गोव्यामध्ये स्पर्धेचे आयोजन होण्याची ही दुसरी वेळ असेल. १९९९ मधील पुरुषांची अजिंक्यपद स्पर्धा देखील जवाहरलाल नेहरू स्टेडियमवरच पार पडली होती; जिथे अंतिम सामन्यात बांगलादेशचा पराभव करून भारताने विजेतेपद पटकावले होते. (वृत्तसंस्था)

# मुंबई, चेन्नईला हवी सातत्यपूर्ण कामगिरी

**मुंबई, २२ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात गुरुवारी वानखेडे स्टेडियमवर यजमान मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. या हंगामाची सुरुवात चढ-उतारांनी झाल्यानंतर हे दोन्ही संघ आता सातत्यपूर्ण कामगिरी करण्याच्या प्रयत्नात आहेत. दोन्ही संघांची गुणस्थिती समान आहे. दोन्ही संघांना पहिल्या सहा सामन्यांतून केवळ दोनच विजय नोदविता आले आहेत.

दुखापतीमुळे आयुष म्हात्रे आयपीएलमधून बाहेर झाल्यामुळे सीएसकेला मोठा धक्का बसला आहे. हंगामाची सुरुवात संथ गतीने झाल्यानंतर, तिलक वर्माचा बहरलेला फॉर्म आणि विल जॅक्सचा संघात समावेश झाल्यामुळे मुंबई इंडियन्सच्या मोहिमेला पुन्हा एकदा नवी उभारी मिळेल अशी आशा आहे.

हे दोन संघ आमने-सामने येतील, तेव्हा त्यांचे चाहते मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार रोहित शर्मा व सीएसकेचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीच्या पुनरागमनाची आतुरतेने वाट पाहत असतील. हे दोघेही आता दुखापतीतून सावरत


हार्दिक पांड्या


ऋतुराज गायकवाड

असून पुनरागमनाच्या मार्गावर आहेत.

मंगळवारी झालेल्या ऐच्छिक सराव सत्रात रोहित अनुपस्थित होता; तर दुसरीकडे, या हंगामात अद्याप एकही सामना न खेळलेल्या धोनीने मात्र कसून सराव केला. बदली खेळाडू म्हणून तो संघात पुनरागमन करू शकतो.

**म्हात्रेच्या जागी उर्विल पटेल**

आयपीएलची एकूण १० विजेतेपदे आपापसात वाटून घेणाऱ्या या दोन्ही संघांना सध्या अनेक आघाड्यांवर विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे.

स्थानिक खेळाडू व २०१ धावांची कामगिरी करणाऱ्या आयुष म्हात्रेला पायाची दुखापत झाली. यामुळे संघाला मोठा धक्का बसला. त्यामुळे सीएसकेला ११ नव्याने रणनीती आखण्याची वेळ आली आहे. फलंदाजीच्या फळीत निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी ते आता पर्यायांचा शोध घेत आहेत, यात गुजरातचा यष्टिरक्षक-फलंदाज उर्विल पटेल हा एक प्रमुख पर्याय म्हणून समोर येत आहे.

सनरायझर्स हैदराबादकडून झालेल्या निराशाजनक पराभवानंतर, सीएसकेचे फलंदाज आता एकत्रितपणे व दमदार कामगिरी करतील अशी संघाला अपेक्षा आहे. हैदराबादविरुद्धच्या सामन्यात, ९० चेंडूंत १३० धावांचे आव्हान गाठताना हातात आठ गडी शिल्लक असतानाही सीएसकेला तो सामना सहजपणे जिंकता आला असता;

**आजचा सामना**

**मुंबई इंडियन्स वि. चेन्नई सुपर किंग्स**
**स्थळ** : वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

परंतु मधल्या फळीतील फलंदाजांनी पुढाकार न घेतल्यामुळे सीएसकेला पराभवाचा सामना करावा लागला. मुंबई इंडियन्सविरुद्धच्या आपल्या अलीकडील भक्कम कामगिरीवर सीएसकेने गत पाचपैकी चार सामन्यांत विजय मिळविला आहे. आता सीएसके आपल्या सलग दोन सामन्यांच्या पराभवाची मालिका खंडित करण्याचेही ध्येय बाळगून असेल.

दोन्ही संघांचे प्रत्येकी चार गुण असल्याने, गुणतालिकेत सातव्या क्रमांकावर असलेल्या (०.०६७) आणि आठव्या क्रमांकावरील (-०.७८०) यांच्यात केवळ नेट रन रेटचाच फरक उरला आहे; कारण सध्या बहारदार फॉर्ममध्ये असलेल्या इतर संघांनी आधीच आठ किंवा त्याहून अधिक गुणांसह आघाडी घेतली आहे. (वृत्तसंस्था)

# जॅनिक सिनर फ्रेंच ओपनमध्ये वर्चस्व गाजविणार

**पॅरिस, २२ एप्रिल**

आगामी २४ मेपासून येथे प्रारंभ होणाऱ्या फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेसाठी इटलीचा जॅनिक सिनर सज्ज होत आहे. चार वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेता असलेल्या सिनरने आपल्या संयम आणि नियंत्रणावर केलेल्या अथक परिश्रमामुळे फ्रेंच ओपनमध्ये तो क्ले कोर्टवर प्रतिस्पर्ध्यांवर मात करण्यासाठी एक प्रमुख खेळाडू झाला आहे. सिनरचे सात मेजर स्पर्धा जिंकलेल्या स्पेनच्या कार्लोस अल्काराझसमोर मोठे आव्हान असणार आहे.



अल्काराझ एक जबरदस्त क्लेकोर्ट खेळाडू असून तो विद्यमान रोलँड गॅरोस विजेता आहे, परंतु या महिन्याच्या सुरुवातीला मॉन्टे कार्लोच्या अंतिम सामन्यात तो सिनरकडून पराभूत झाला होता. त्यानंतर बार्सिलोनामध्ये त्याला मनगटाची दुखापत झाली, ज्यामुळे पॅरिसमधील त्याच्या तयारीमध्ये व्यत्यय आला आहे. सिनरची प्रगती या आठवड्यात माद्रिदमध्ये सुरू राहील, तो इतर युरोपियन क्ले कोर्टच्या तुलनेत अधिक उंचीवर आहे आणि त्यामुळे कोर्टचा वेग वाढतो, ज्यामुळे या २४ वर्षीय खेळाडूला आपली अनुकूलनक्षमता दाखवण्याची आणखी एक संधी मिळेल. गत काही वर्षांतील मोठ्या स्पर्धांमधील निकालांवरून पाहता, सिनर व अल्काराझ यांच्या कामगिरीत फारसा फरक दिसून येत नाही; अल्काराझपेक्षाही अधिक, सिनरकडे एक अत्यंत शांत व अविचल वृत्ती आहे असे ग्रीनवॉल्ड यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# आंतराष्ट्रीय मास्टर्स जलतरण स्पर्धेत ओंकार गायकवाडला सुवर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

येथील ओंकार हरिदास गायकवाड यांनी १७ ते २० एप्रिल दरम्यान थायलंड येथे झालेल्या वर्ल्ड मास्टर्स जलतरण स्पर्धेत सुवर्ण पदक पटकाविले. त्यांनी ५० मीटर बॅक स्ट्रोकमध्ये ही कामगिरी केली. नाशिक येथे झालेल्य राष्ट्रीय जलतरण स्पर्धेतून त्यांची निवड झाली होती. त्यांचे सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, सतीश जाधव, शिरीष हुंबे, बाबासाहेब धर्मे, मरगु जाधव, मनिषा गायकवाड, नागनाथ जाधव आदींनी अभिनंदन केले.





# सोलापूरची जिवनी धर्मे विभागीय टेबल टेनिस स्पर्धेत अजिंक्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटनेची उदयोन्मुख खेळाडू जिवनी जितेंद्र धर्मे हिने केंद्रीय विद्यालयाच्या विभागीय टेबल टेनिस स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलींच्या गटात निर्विवाद वर्चस्व गाजवत अजिंक्यपद पटकावले. या घवघवीत यशामुळे तिची ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

**राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी निवड**

विभागीय स्पर्धा पुणे येथील नॅशनल डिफेन्स अकॅडमी खडकवासला येथे नुकतीच पार पडली. या स्पर्धेत जिवनीने आपल्या आक्रमक खेळाच्या जोरावर सर्व प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. तिच्या चपळ हालचाली आणि अचूक फटक्यांसमोर प्रतिस्पर्धी खेळाडूंचा निभाव लागला नाही. जिवनीला या यशासाठी झेड. एम. पुणेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

### राष्ट्रीय स्पर्धेतही ती अशीच कामगिरी करेल

विभागीय स्तरावर सुवर्णपदक पटकावल्यानंतर आता जिवनी ऑगस्ट २०२६ मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करणार आहे. जिवनीने अत्यंत जिद्दीने हे यश संपादन केले आहे. सोलापूरच्या टेबल टेनिस क्षेत्रासाठी ही अभिमानाची गोष्ट असून, राष्ट्रीय स्पर्धेतही ती अशीच चमकदार कामगिरी करेल, असा विश्वास सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजीव प्रधान यांनी व्यक्त केला.

# तलवारबाजी जिल्हा निवड चाचणी स्पर्धा रविवारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

सोलापूर शहर व जिल्हा तलवारबाजी असोसिएशन यांच्या वतीने २१ वी कॅडेट जिल्हास्तरीय तलवारबाजी निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन रविवार २६ एप्रिल रोजी सायंकाळी ५.०० वाजता छत्रपती शिवाजी प्रशाला व नाईट कॉलेज येथे केले आहे. या स्पर्धेसाठी खेळाडूंचा जन्म ०१जानेवारी २०१० नंतरचा व ३१ डिसेंबर २०१३ पूर्वीचा असावा. या स्पर्धेतून निवडलेला संघ ३० एप्रिल ते २ मे दरम्यान छ. संभाजीनार येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये सहभागी होईल. इच्छुक खेळाडूंनी पवन भोसले (९६३७९६३७७७), अक्षय माने (८३२९०७०७६४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संघटनेचे जिल्हा सचिव दीपक शिंदे यांनी केले आहे.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# बंद पडणाऱ्या एसटीमुळे मंद्रुपच्या प्रवाशांचे हाल

## दररोज दोन ते तीन एसटी बंद पडण्याच्या घटना

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

उन्हाच्या तीव्रतेमुळे एसटीमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येमध्ये वाढ होत आहे. मात्र या एसटी गाड्या सोलापूरला जाताना दोन ते तीन ठिकाणी बंद पडत असल्यामुळे भर उन्हात प्रवाशांना दुसऱ्या एसटीच्या प्रतीक्षेत थांबावे लागत आहे. दक्षिण सोलापूर व मंद्रूप परिसरात दररोज दोन ते तीन एसटी गाड्या बंद पडत असल्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. याकडे लोकप्रतिनिधी व आगार प्रमुखांचे दुर्लक्ष होत असल्यामुळे प्रवासी वर्गातून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

सोलापूर आगारातून मंद्रूप परिसरात भंडारकवठे, कुसूर, तेलगाव, टाकळी,





औराद, कंदलगाव ,वडापूर व कारकल या गावांसाठी एसटी गाड्या सोडण्यात येतात. सोलापूरहून निघालेल्या एसटी गाड्या तांत्रिक बिघाडामुळे बंद पडण्याच्या प्रमाणात वाढ होत आहेत. भर दुपारी एसटी बंद पडल्यामुळे प्रवाशांना दुसऱ्या एसटीसाठी उन्हातच ताटकळत बसावे लागत आहे. शिवाय तिकीट काढल्यामुळे दुसऱ्या वाहनांनी प्रवासही करता येत नाही. यामुळे प्रवाशांचे तारांबळ होत आहे. मंद्रूप परिसरात कामचलाऊ व रस्त्यावर बंद पडणाऱ्या गाड्या सोडण्यात येत असल्यामुळे प्रवाशांमधून लोकप्रतिनिधी व आगार प्रमुखां विरोधात नाराजी दिसून येत आहे. कोणत्याही लोकप्रतिनिधी कडून याबाबत पाठपुरावा करण्यात येत नसल्यामुळे प्रवासी वर्गामधून संताप व्यक्त करण्यात येत आहे. ऐन ऊन्हाळ्यात वाहक व चालक यांनाही एसटी दुरुस्त करून रस्त्यावर आणण्यासाठी उन्हातच दुरुस्ती करावे लागत आहे. त्यामुळे वाहक व चालक यांचीही कसरत दिसून येत आहे. मात्र आगारातूनच नादुरुस्त व बिघडलेल्या गाड्या ग्रामीण मार्गावर सोडण्यात येत असल्यामुळे वाहक व चालकासह प्रवाशांनाही त्रास सहन करावे लागत आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधी व आगार प्रमुख यांनी सुस्थितीत असणाऱ्या गाड्या मंद्रूप मार्गावर सोडण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे.

**प्रवाशांच्या समस्यांकडे दुर्लक्ष**

दक्षिण तालुक्यातील सीना भीमा नदी परीसरात एसटीने प्रवास करणार्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. मात्र प्रवास करताना एसटी रस्त्यावरच बंद पडत असल्यामुळे अनेक समस्या उद्भवत आहेत.

त्यामुळे आमदार, सभापती, जिल्हा परीषद व पंचायत समिती सदस्यासह सर्व गावाच्या सरपंचांचे प्रवाशांकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते.

### बंद पडणाऱ्या एसटीमुळे कामावर परीणाम

दररोज एसटीने सोलारला कामाला जातो. सकाळी साडेनऊ वाजता एसटी मध्ये बसल्यानंतर १० वाजेपर्यंत कामावर हजर राहण्याचे ठरविले असते. मात्र एसटी रस्त्यातच बंद पडल्यामुळे कामावर जाण्यासाठी एक ते दिड तास उशिर होत आहे. त्यामुळे वरिष्ठांकडून बोलणे खावे लागते.

**- श्रीशैल लिगाडे, प्रवाशी मंद्रुप**

## महत्वाचे...

### महिला सक्षमीकरणासाठी जिल्हा परिषदेचे पूर्ण सहकार्य असणार : अर्चनाताई पाटील

**वैराग, दि. २२ एप्रिल-**

महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी 'एकता महिला मंच' सारख्या व्यासपीठांची गरज आहे. आगामी काळात जिल्हा परिषदेच्या विविध योजनांच्या माध्यमातून महिलांच्या प्रश्नांना न्याय मिळवून दिला जाईल. तसेच मंचच्या आगामी मोहिमेत मी स्वतः उपस्थित राहून भगिनींना मार्गदर्शन करेन, अशी ग्वाही धाराशिव जि.प.च्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील यानी दिली. धाराशिव जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचाा 'एकता महिला मंच'च्या



वतीने त्यांचा सत्कार केला. त्याप्रंसगी त्या बोलत होत्या. त्या म्हणाल्या की, एकता महिला मंच सध्या बार्शी तालुक्यातील ४९ गावांमध्ये अत्यंत प्रभावीपणे कार्यरत आहे. सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून महिलांचा आत्मविश्वास आणि मानसन्मान वाढवण्याचे मोठे काम या मंचने केले आहे. महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य, सामाजिक प्रतिष्ठा आणि 'मी विधवा नव्हे, मी स्त्री' यांसारख्या मोहिमेतून विधवा महिलांना सन्मान मिळवून देण्यासाठी मंच करत असलेल्या कार्याचा आढावा क्षीरसागर यांनी मांडला.

### सोलापूरच्या यशराजचे सीबीएसईमध्ये यश

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

सीबीएसई इयत्ता १० वी बोर्ड परीक्षा २०२६ मध्ये नागेश करजगी अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत उच्च गुण मिळवले असून, काही विद्यार्थ्यांनी १००% गुणांचीही कामगिरी केली आहे. यात येथील यशराज प्रविण भोसले याने ९९% गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. देशातील अव्वल कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये पंजाबमधील फाजिल्का येथील वैभव अरोरा, गुजरातमधील अहमदाबाद येथील अमोलिक पंडिता आणि ओडिशातील भुवनेश्वर येथील आयुष्यमान मोहापात्रा यांनी १००% गुण मिळवत देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे.



## निधन वृत्त...

### डॉ. मिलिंद शाहीर

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**



भवानी हॉस्पिटलचे डॉ. मिलिंद शिवमूर्ती शाहीर (वय ६५) यांचे बुधवार दि.२२ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा गुरुवार २३ एप्रिल रोजी सकाळी ११.०० वा. भवानी पेठ निवासस्थानातून रूपा भवानी हिंदु स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले एक भाऊ सुना नातवंडे असा परिवार आहे.

### संतोष घोटकर

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**



तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील संतोष भाऊराव घोटकर (वय-४३) यांचे मंगळवार, दि. २१ एप्रिल रोजी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ-भावजय, पत्नी, २ मुले असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे तामलवाडी गावावर शोककळा पसरली होती.

### राजन गांधी

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**



राजन कांतिलाल गांधी (वय ७१) यांचे बुधवारी (दि. २२ एप्रिल) रोजी पहाटे १२.३० वाजता आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी दुपारी मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### अनुसया येमुल

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**



अक्कलकोट रोडवरील हेरिटेज मणीधारी सोसायटीचे संचालक विलास येमूल यांच्या मातोश्री अनुसया बालय्या येमूल (वय ७८) यांचे बुधवार, दि.२२ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# रेल्वेत नोकरी लावतो म्हणून फसवणूक; आरोपीचा जामीन अर्ज पुन्हा नामंजूर

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२२ एप्रिल-**

येथील अनेक तरुणांची लाखो रुपये घेऊन रेल्वेत नोकरी लावतो, असे सांगून बनावट कागदपत्रे देऊन फसवणूक करणाऱ्या आरोपीचा जामीन अर्ज बार्शी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी फेटाळला.

पांगरी पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीनुसार, फिर्यादी बार्शी येथील खाजगी बँकेमध्ये डेप्युटी मॅनेजर या पदावर काम करत असून त्याची तोंड ओळख असलेला समाधान बालाजी वट्टमवार (रा. सुभाषनगर) याने रेल्वेत नोकरीला आहे, असे सांगून फिर्यादीस देखील रेल्वेत नोकरी लावतो असे म्हणून त्यास विश्वासात घेऊन, तुला रेल्वेमध्ये सुरक्षा ठेव म्हणून सात हजार रुपये भरावे लागतील, असे सांगून फिर्यादीकडून पैसे घेतले व फिर्यादीस रेल्वेचा शिक्का असलेली पावती त्याने दिली. त्यामुळे फिर्यादीचा आरोपीवर विश्वास बसला. तसेच आरोपी वारंवार आणखी रक्कम घेत गेला. फिर्यादीची कुर्डूवाडी येथे ज्युनिअर अकाउंटंट या पदावर नेमणूक केलेली आहे, त्यासाठी एकूण दोन लाख चौऱ्याऐंशी हजार रुपये लागतील व तुला ७३ हजार रुपये पगार मिळेल, असे सांगितले.

या दरम्यान फिर्यादीने आरोपीस एक लाख एक्काहत्तर हजार रुपये एवढी एकूण रक्कम दिलेली होती व आरोपीने फिर्यादीस रेल्वेमध्ये नोकरी लागल्याबद्दलचे जॉइनिंग लेटर व अग्रीमेंट लेटर दिले. ही कागदपत्रे घेऊन फिर्यादीने रेल्वे विभागात चौकशी केली असता त्यास समजले की, सर्व कागदपत्रे बनावट असुन आपली फसवणूक झालेली आहे. याबाबत फिर्यादीने पांगरी पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली आहे. त्यानंतर आरोपीस पोलिसांनी अटक करुन अधिक तपास केला असता आणखी काही तरुणांची फसवणूक झाल्याचे तपासात निष्पन्न झाले. यातील फसवणुकीची एकूण रक्कम ३३ लाख ३९ हजार १२६/- रुपयांपर्यंत पोहोचली. याप्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक राजकुमार यावलकर यांनी तपास पूर्ण करुन दोषारोप बार्शी न्यायालयात दाखल केले होते. आरोपी समाधान बालाजी वट्टम वार याने दोषारोपपत्र न्यायालयात दाखल झाल्यानंतर यापूर्वीही सदर आरोपीने न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता, परंतु तो नामंजूर करण्यात आला होता. त्यानंतर पुन्हा बार्शी न्यायालयात त्याचे विधीज्ञ यांचेमार्फत जामीन अर्ज दाखल केला होता. या अर्जावर सुनावणी दरम्यान, या घटनेतील फसवणूक झालेले तरुण यांनी जामीन अर्जावर हरकत घेऊन विधीज्ञांमार्फत न्यायालयात आपले म्हणणे मांडले. या प्रकरणात हरकतदार यांनी महत्त्वाची कागदपत्रे व मुद्दे न्यायालयासमोर सादर केली. हरकतदार यांचे विधीज्ञ आणि सरकारी वकील यांनी आरोपीचा जामीन अर्ज फेटाळण्यासाठी जोरदार युक्तिवाद केला.

सरकारी पक्षाच्या व हरकतदार यांचेवतीने विधीज्ञांनी न्यायालयासमोर आरोपीच्या कृत्यामुळे हरकतदार प्रसन्न लुंगारे व सौरभ महंकाळे व फिर्यादी यांना झालेला मानसिक, आर्थिक त्रास, आणि साक्षीदारांच्या सुरक्षिततेविषयी उपस्थित झालेला धोका यावर जोर दिला. यावर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती रेवती बागडे यांनी सरकारी वकील आणि हरकतदार यांचे वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर केला. या प्रकरणात हरकतदारांचेवतीने ॲड. सुहास कांबळे, सरकारी पक्षातर्फे ॲड. स्वप्नील पवार यांनी काम पाहिले तर पांगरी पोलीस ठाण्याचेवतीने कोर्ट पैरवी एस.आर. थोरात हे होते.

## दासरींची पक्षातून हकालपट्टी करा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २२ एप्रिल-**

माजी जिल्हाप्रमुख अजय दासरी यांची पक्षातून हकालपट्टी करण्याची मागणी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे करण्यात आली असल्याची माहिती शिवसेनेचे नूतन जिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी जिल्हाप्रमुख संभाजी शिंदे, शरण राज केंगनाळकर, प्रवीण काकडे, लोकसभा प्रमुख हुकूमचंद्र राठोड, संजय पौळ, महिला आघाडी जिल्हा संघटिका मंगला थोरात, प्रिया बसवंती आदी उपस्थित होते.

दासरी यांनी मंगळवारी पत्रकार परिषद घेत शिवसेना उबाठाच्या सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख सुषमा अंधारे यांच्यावर तीव्र शब्दात टीका केली होती. त्याचा निषेध पत्रकार परिषदेत करण्यात आला. तसेच महिला असूनही सोलापूर शहर व जिल्ह्यात धडाडीने काम करणाऱ्या अंधारे यांच्यावर आपल्या बगलबच्चांना सोबत घेत विनाकारण टीका करत असल्याचा आरोप जिल्हा प्रमुख धनंजय डिकोळे, सोलापूर महानगर प्रमुख महेश धाराशिवकर आदींनी केला.

# वंचित शेतकऱ्यांना पी.एम किसान योजनेचा लाभ द्या

### कृषी मंत्री भरणेंकडे आ. डॉ. देशमुख यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २२ एप्रिल-**

सांगोला विधानसभा मतदारसंघातील पी.एम किसान योजनेपासून वंचित असलेल्या १३८७ शेतकऱ्यांना लाभ देण्याची तसेच महाडिबीटी द्वारे पेमेंट मध्ये असंख्य अडचणींमुळे शेतकरी विविध अनुदानांपासून वंचित राहत असून त्यावर तोडगा काढावा त्याचबरोबर गेल्या अनेक महिन्यांपासून ट्रॅक्टर अनुदाना पासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना लवकरात लवकर अनुदान मिळावे अशी मागणी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी राज्याचे कृषी मंत्री दत्तामामा भरणे यांची मंत्रालय, मुंबई येथे भेट घेऊन केली.

रासायनिक खतांच्या पुरवठ्यात कंपन्यांकडून होणारे लिंकींग त्वरित बंद करावे, शेजारील राज्यांतून येणाऱ्या अप्रमाणित एच.टी.बी.टी कपाशी बियाण्यांवर बंदी घालावी, साथी पोर्टलचा वापर विक्रेत्यांवर सक्तीने न लादता तो उत्पादक व पुरवठादार कंपन्यांपर्यंत मर्यादित ठेवणे, खतांचा पुरवठा एफओआर पद्धतीने करण्यात यावा, बियाणे सॅम्पल फेल झाल्यास विक्रेत्यांना



आरोपी न धरता साक्षीदार म्हणून मान्यता द्यावी, गुणवत्ता तपासणीसाठी घेतलेल्या सॅम्पलची प्रलंबित रक्कम शासनाकडून तातडीने देण्यात यावी, खरीप हंगाम २०२६ साठी युरिया व डीएपी खत वितरण पद्धतीचा फेरविचार करावा, शेजारील राज्यांतून येणाऱ्या अवैध व निकृष्ट दर्जाच्या कृषी इनपुट्सवर कठोर कारवाई करण्यात यावी अशीही मागणी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी यावेळी केली. कृषी मंत्री भरणे यांनी सर्व मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत, संबंधित विभागांना तपासणी करून योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. तसेच शेतकरी व कृषी व्यवसायिकांना दिलासा मिळेल अशा उपाययोजना लवकरच करण्यात येतील असेही त्यांनी सांगितले.

# पालखी मार्गावरील वारकऱ्यांना सुविधा देण्यासाठी दक्ष रहा

## सिईओ कुशल जैन यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ एप्रिल -**

आषाढी यात्रेत पालखी मार्गावरील वारकरी यांना सुविधा देणे साठी दक्ष रहा. आषाढी यात्रेची तयारी आता पासून सुरू करा. अशा सुचना सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी आज दिल्या.



जिल्ह्यातील माळशिरस व पंढरपूर तालुक्यातील संत श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील धर्मपुरी, खुडूस, कारूंडे, सदाशिवनगर, पुरंदावडे, वेळापूर वाखरी, भंडीशेगाव तर संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील पिराची कुरोली, महाळुंग, बोरगाव, अकलूज, माळीनगर या पालखी मार्गाची व पालखी तळाची पाहणी बुधवारी सीईओ जैन यांनी केली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, पंढरपूरचे गटविकास अधिकारी अमोल जाधव, माळशिरस पंचायत समिती गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे, जिल्हा कक्षातील वैभव आहाळे आदी उपस्थित होते. वाखरी पालखी तळापासून पाहणीची सुरूवात करून धर्मपुरी पर्यंत वारकरी यांना देणेत येणारे सुविधांचाही माहिती जाणून घेतली. त्यानंतर संत तुकाराम पालखी मार्गावरील पालखी तळाची पाहणी केली.

**आषाढी यात्रा हायटेक राहणार**

पालखी मार्गावर वारकरी यांना सुविधा देण्यासाठी संवाद यंत्रणा अती जलद राहील याची दक्षता घेणेत येत आहे. मुख्यमंत्री वारकरी निवारा कक्षात गतवर्षी चांगल्या सुविधा दिल्यामुळे वारकरी यांचे होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन काळजी घेणेत येत आहे. माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग वारकरी यांचेसाठी करणेत येणार आहे.

वारकरी यांचे सेवेसाठी जिल्हा परिषदेचे कर्मचारी यांचे बरोबरच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांची देखील मदत घेणेत येणार आहे. यात्रपुर्वी यंत्रणेत पडणारा ताण कमी करणेसाठी आता पासून नियोजन व त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी नियोजन करणेत येत असल्याचे सीईओ जैन यांनी सांगितले. एका दिवसात दोन पालखी मार्गावरील मुक्कामी व विश्रांतीची ठिकाणावरील पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, मुख्यमंत्री वारकरी निवारा कक्ष,रस्ते, शौचालय व स्नानगृह सुविधासाठी ची जागा, पालखी तळाची स्वच्छता, पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत या बाबत ची माहिती घेऊन त्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना सुविधांची तयारी करणेचे सुचना जैन यांनी दिल्या.

# एक सोनेरी पान


**दरवर्षी २३ एप्रिल हा दिवस 'जागतिक पुस्तक दिन' म्हणून साजरा केला जातो. पुस्तकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा, वाचनाची सवय जपण्याचा आणि नव्या पिढीला अक्षरांची ओढ लावण्याचा हा दिवस आहे. आजच्या वेगवान आणि डिजिटल युगात पुस्तकांचे स्वरूप बदलले असले, तरी त्यांचे महत्त्व अजिबात कमी झालेले नाही. पुस्तकाचे एक पान एखाद्याचे सोनेरी आयुष्य घडवू शकते त्याविषयी...**

पुस्तकांचा इतिहास पाहिला तर तो माणसाच्या उत्क्रांतीइतकाच जुना आहे. सुरुवातीला विचार दगडांवर, गुहांच्या भिंतींवर कोरले गेले. पुढे ताडपत्रे आणि भुर्जपत्रांवर लेखन सुरू झाले. याचा अर्थ, अगदी मानवाच्या प्राथमिक अवस्थेपासूनच त्याला अक्षरांविषयी ओढ होती. बोलण्याची भाषा विकसित होण्याआधीही तो भिंतींवर चित्रे काढून, चिन्हांद्वारे आपले विचार व्यक्त करत होता.भारतात वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत यांसारख्या ग्रंथांनी वाचनसंस्कृतीला गती दिली. हस्तलिखित परंपरेतून छापील ग्रंथांपर्यंतचा हा प्रवास म्हणजे ज्ञानाच्या लोकशाहीकरणाची कहाणी आहे.



**जागतिक पुस्तक दिवस**

छपाई तंत्रज्ञानाचा शोध लागल्यानंतर ज्ञानाचा प्रसार झपाट्याने वाढला आणि पुस्तक सामान्य माणसाच्या हातात आले. भारतात वाचन ही केवळ सवय नसून संस्कृतीचा भाग आहे. गुरुकुल परंपरेत मौखिक पद्धतीने ज्ञान दिले जात होते, तर पुढे वाचनालयांनी समाजात बौद्धिक चैतन्य निर्माण केले. महाराष्ट्रात सार्वजनिक वाचनालयांची परंपरा विशेष मजबूत आहे. अनेक गावांमध्ये आजही वाचनालय हे सामाजिक जीवनाचे केंद्र आहे. पुस्तकांच्या विक्रीकडे आणि वाचनाच्या सवयींकडे पाहिले तर गेल्या पाच वर्षांत काही ठळक बदल दिसतात. २०१९ पर्यंत छापील पुस्तकांची विक्री तुलनेने स्थिर होती. कोविड काळात (२०२०-२१) ई-बुक्स आणि ऑडिओबुक्सची मागणी झपाट्याने वाढली. त्यानंतर २०२२ पासून पुन्हा छापील पुस्तकांची विक्री वाढू लागली. भारतातील प्रकाशन उद्योग दरवर्षी साधारण ६ ते ८ टक्के दराने वाढत असल्याचे विविध अहवालांमधून दिसते.



मात्र, वाचनाच्या सवयींचे चित्र काहीसे चिंताजनक आहे. ढळाश णीश डीींशिनुसार २०१९ ते २०२४ दरम्यान मनोरंजनासाठी वाचन करणाऱ्यांचे प्रमाण ५.४ टक्क्यांवरून सुमारे ४ टक्क्यांपर्यंत घसरले आहे. म्हणजेच नियमित, सवयीने पुस्तक वाचणाऱ्यांची संख्या कमी होत असल्याचे संकेत मिळतात. वयोगटानुसार पाहिले तर ८ ते १८ वयोगटातील मुलांमध्ये वाचनाची आवड घटताना दिसते. एका सर्वेक्षणानुसार केवळ ३४.६ टक्के मुलांना मोकळ्या वेळेत वाचन करायला आवडते, तर फक्त २०.५ टक्के मुले दररोज काहीतरी वाचतात. हे प्रमाण पूर्वीच्या तुलनेत घटल्याचे दिसते. तर दुसरीकडे, युवकांमध्ये वाचन पूर्णपणे नाहीसे झालेले नाही; मात्र त्याचे स्वरूप बदलले आहे. सुमारे ६१ टक्के युवकांनी मागील वर्षात किमान एक पुस्तक (छापील, ई-बुक किंवा ऑडिओबुक) वाचले आहे, पण नियमित वाचन करणाऱ्यांचे प्रमाण तुलनेने कमी आहे. मोबाईल, सोशल मीडिया आणि लघु व्हिडिओंचा प्रभाव इतका वाढला आहे की, दीर्घकाळ लक्ष केंद्रित करून वाचन करण्याची सवय कमी होत चालली आहे.याच पार्श्वभूमीवर पुढच्या पिढीसाठी वाचनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. पुस्तकं ही केवळ माहिती देणारी साधने नाहीत; ती विचार घडवतात, संवेदनशीलता वाढवतात आणि व्यक्तिमत्त्व घडवतात. वाचनामुळे भाषा समृद्ध होते, कल्पनाशक्ती विस्तारते आणि निर्णयक्षमता सुधारते. एका अर्थाने पुस्तकं माणसाला 'विचार करणारा नागरिक' बनवतात. झेन-जी पिढी वाचन करते का, हा प्रश्न अनेकदा विचारला जातो. उत्तर थोडं मिश्र आहे. ही पिढी वाचते, पण पारंपरिक पुस्तकांपेक्षा डिजिटल माध्यमातून अधिक वाचते. त्यामुळे त्यांना वाचनाकडे वळवण्यासाठी पुस्तकांचे सादरीकरण, विषय आणि माध्यम यामध्ये बदल करण्याची गरज आहे. अनेकजण प्रत्यक्ष भेटल्यावर एकच विचारतात, वाचनाला सुरुवात कशी करावी. त्यासाठी काही खास पद्धत वगैरे नाही. किंवा त्याचे असे काही शास्त्रही नसते.

ज्याला मनातून वाचनाची आवड आहे तो काहीही वाचू शकतो. रस्त्यावरून जाणाऱ्या जाहिरातींपासून ते अगदी वर्तमानपत्रांपर्यंत. जे-जे काही वाचयला मिळेल ते-ते आपण वाचू शकतो. तरीही कुणाच्या मनात शंका असेल तर किंवा ज्यांना वाचनाची सवय लावायची आहे, त्यांनी सुरुवात सोप्या पद्धतीने करावी. स्वतःच्या आवडीचा विषय निवडावा. कथा, आत्मचरित्र, प्रवासवर्णन किंवा प्रेरणादायी लेख. सुरुवातीला दररोज १० ते १५ मिनिटे वाचन करावे. मोठी आणि जड पुस्तके घेण्यापेक्षा लहान, रंजक पुस्तके निवडली, तर सवय टिकून राहते. हळूहळू ही सवय वाढत जाते. काही कविता, चारोळ्यांपासून तुम्ही वाचनाला सुरुवात करू शकता. आपल्याला पुस्तक वाचताना तो विषय आवडला किंवा नाही हे सांगायला दुसऱ्या कुणाचीही गरज नाही. आपल्याला ते कळतेच.

पुस्तकांचे भवितव्य काय? हा प्रश्नही वारंवार विचारला जातो. तंत्रज्ञान बदलत राहील, माध्यम बदलतील. कागदी पुस्तके, ई-बुक्स, ऑडिओबुक्सही; पण ज्ञानाची गरज कधीही संपणार नाही. पुस्तकं ही माणसाच्या विचारविश्वाची पायाभरणी आहेत आणि ती कायम राहणार आहेत. जागतिक पुस्तक दिन हा केवळ उत्सव नाही; ते एक स्मरण आहे. अक्षरांशी नातं जोडण्याचं. कारण शेवटी, पुस्तकं केवळ वाचली जात नाहीत ती माणसाला घडवतात.

**- नितीन फलटणकर,** जनसंपर्क अधिकारी, प्रिसिजन कॅमशाफ्ट्स

ज्याच्या समीर टेकवावे
मस्तक..
असा जिवलग सखा है
पुस्तक..
पुस्तकांनीच घडवले,
शिकवले वादळात पाय
रोवून खंबीरपणे तोंड
द्यायला..
पुस्तकानेच आंजारले,
गोंजारले खचलेल्या
मनाला... घेतले जवळ,
आईच्या ममतेने..
पुस्तकाने दिली सशक्तता,
समर्थतता, सक्षमता...
यशाच्या हिमालयावर..
झेंडा रोवण्याची ...
पुस्तकांनीच व्यापलं माझं..
अवघं निरर्थक, निर्हेतुक,
निष्क्रिय आयुष्य.
केले मला अर्थपूर्ण, समृद्ध
पैलण्यासाठी.
जगण्याचे शिवधनुष्य. ते हे
पुस्तक, माझे हस्तक नित्यच
त्यासमोर व्हावे नतमस्तक.

- प्रा. डॉ. श्रुतीश्री
वडगबाळकर, सोलापूर.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात हभप औसेकर महाराजांचा सन्मान

**अक्कलकोट, दि. २२ एप्रिल-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात स्वामी भक्तांकरिता प्राधान्य पूर्वक नियोजन हे वटवृक्ष मंदिर समितीचे स्वागतीय कार्य असल्याचे मनोगत पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान समितीचे सहअध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमेश इंगळे यांनी हभप गहिनीनाथ महाराज औसेकर यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान केला. यावेळी हभप औसेकर महाराज बोलत होते. याप्रसंगी हभप आबा महाराज कुरनूरकर, प्रशांत गुरव, श्रीकांत मलवे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, शिवशरण अचलेर, अमर पाटील, सागर गोंडाळ, खाजप्पा झंपले, श्रीकांत मलवे, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, तुषार मोरे उपस्थित होते.



### ज्याठिकाणी भुयारी गटार पूर्ण; तेथील रस्ता खडीकरण काम चालू : नगराध्यक्ष माने

**सांगोला, दि. २२ एप्रिल-**

सांगोला नगरपरिषद हद्दीतील पहिल्या टप्प्यामध्ये ज्या ठिकाणी भुयारी गटार योजनेचे काम पूर्ण झाले आहे, त्याठिकाणी आता रस्त्यांच्या खडीकरणाचे काम चालू झाले असून ते लवकरच पूर्ण होणार असल्याची माहिती सांगोला नगरपरिषदेचे नगराध्यक्ष आनंदा माने यांनी दिली. दरम्यान ७२ लाख रूपयांच्या खडीकरणाच्या रस्त्याच्या कामांचे भूमीपूजन माजी नगराध्यक्षा राणी माने, आरोग्य सभापती गोदाबाई बनसोडे, महिला व बालकल्याण सभापती छाया मेटकरी, मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी, नगरसेविका आशा यावलकर, सीमा सरगर, दिव्याणी दौंडे, अनिता केदार, नगर अभियंता किरण काळे, अनिल भद्रे, इंजि. मोईन इनामदार, संजय दौंडे यांच्या उपस्थितीत झाले. यामध्ये सांगोला शहरातील कर्मवीर नगर नं.५ येथे वासूद रोड ते मकरंद जवंजाळ घर ते रविकांत मराळ घर ते सदाशिव पुजारी घरापर्यंत, दत्तनगर येथे वासूद रोड ते शिवाजी भोसले घर ते म्हेत्रे बिल्डींग ते वाघमारे घरापर्यंत, सदानंद नगर येथे वासूद रोड ते प्रविण मोहिते घर ते संजय चौगुले घर ते मणेरी घरापर्यंत, विद्यानगर येथे पंढरपूर रोड ते घोंगडे घर ते काटकर घर ते विद्यामंदिर इंग्लिश मिडीयम शाळेपर्यंत, फुले चौक येथे, मिरज पंढरपूर हायवे ते अलराईन नगर येथे मुल्ला घर ते तांबोळी किराणा दुकानापर्यंत, मिरज रोड ते सह्याद्री इंग्लिश मिडीयम स्कूलपर्यंत रस्ता ते कांबळे घरापर्यंत, यशनगर येथे लवटे हॉस्पिटल ते खुळपे घरापर्यंत, वाढेगांव वेस येथे, कडलास रोड ते पारे रस्ता बालाजी टाईल्सच्या पाठीमागे ही रस्ता खडीकरण करणे कामे लवकरच पूर्ण होणार आहेत.

### मोदी खाना येथे एकाची आत्महत्या

**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**

दारूच्या नशेत एका ४२ वर्षीय इसमाने घरातील छताच्या लाकडी वाशाला इलेक्ट्रिक वायरने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मोदीखाना येथे आज बुधवारी दुपारी चार वाजता उघडकीस आली. किरण रामप्पा चलवादी (वय ४२ वर्ष, रा. मोदीखाना सोलापूर ) असे गळफास घेतलेल्या व्यक्तीचे नाव आहे. आज बुधवारी दुपारी तो फोन उचलत नसल्याने त्याला पाहण्यासाठी नातेवाईक घरी आले असता घराचा दरवाजा आतून बंद होता. आवाज देऊनही प्रत्युत्तर न आल्याने शेवटी नातेवाईकांनी शेजारच्यांना बोलवून दरवाजा तोडला . तेव्हा आत मध्ये किरण चलवादी याने गळफास घेतला असल्याचे आढळून आले. गळफास सोडवून त्याला बेशुद्ध अवस्थेत येथील शासकीय रुग्णालयात सदर बाजार पोलीस ठाण्याचे हवालदार एस एम मोरे यांनी सायंकाळी पावणे सात वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मयत किरण बिगारी म्हणून काम करायचा. त्याला दारूचे व्यसन ही होते. त्याच्या पश्चात पत्नी, चार मुली असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

# पटपडताळणी, समायोजनानंतरच बदली प्रक्रिया

## सोलापूर जिल्ह्यातील शिक्षकांना बदलीसाठी प्रतीक्षा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यातील शिक्षकांच्या बदली प्रक्रियेबाबत उत्सुकता वाढली असताना, पट पडताळणी मोहीम पूर्ण झाल्यानंतर समायोजन प्रक्रिया राबवली जाणार असून त्यानंतरच बदली प्रक्रियेला सुरुवात होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे बदलीच्या प्रतीक्षेत असलेल्या शिक्षकांना आणखी काही काळ वाट पाहावी लागणार आहे.

दरम्यान, यापूर्वी राबविण्यात आलेल्या दोन पट पडताळणी मोहिमांमध्ये सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद तसेच खासगी अनुदानित शाळांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती समाधानकारक आणि लक्षणीय स्वरूपाची दिसून आली आहे. अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याचे चित्र समोर आले असून शिक्षण विभागासाठी ही सकारात्मक बाब मानली जात आहे.

**अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन महत्वाचे**

विद्यार्थ्यांच्या संख्येची अचूक नोंद आणि शाळांतील वास्तव परिस्थिती समोर यावी, यासाठी पट पडताळणी मोहिमेचा शेवटचा टप्पा पूर्ण झाला आहे. आता अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन हा महत्त्वाचा टप्पा राबवला जाणार आहे. समायोजन पूर्ण झाल्यानंतरच जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदली प्रक्रियेला हिरवा कंदील मिळेल, अशी माहिती प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिली.

विद्यार्थी संख्या वाढल्याने काही शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता तर काही ठिकाणी अतिरिक्त शिक्षकांची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे समायोजन प्रक्रियेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. कोणत्या शाळेत किती शिक्षकांची आवश्यकता आहे, याचा अंतिम आढावा घेऊन शिक्षकांना नियुक्त दिली जाणार आहे. दुसरीकडे, बदलीसाठी अर्ज केलेले शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्यातही उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. समायोजनानंतर बदली प्रक्रिया पार पडणार असल्याने शिक्षकांना अपेक्षित ठिकाणी नियुक्ती मिळणार का, याबाबत चर्चा रंगू लागल्या आहेत. प्रशासनाच्या पुढील निर्णयाकडे आता जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

**समायोजनाच्या फेऱ्यात शिक्षकांचे वेतन रखडले**

पट पडताळणी आणि समायोजन प्रक्रियेमुळे अनेक शिक्षकांचे वेतन तात्पुरत्या स्वरूपात थांबले आहे. प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेतन वितरणाला विलंब होत असल्याने शिक्षक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. घरखर्च, कर्जाचे हप्ते, शैक्षणिक खर्च आणि दैनंदिन जबाबदाऱ्या सांभाळताना शिक्षकांना मोठा ताण सहन करावा लागत आहे. रखडलेले वेतन तातडीने वर्ग करावे, अशी मागणी शिक्षकांकडून होत आहे.

## दक्षिण सोलापूरच्या विकासासाठी मंत्रालयात पार पडली उच्चस्तरीय बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**



दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नांची तड लावण्यासाठी आणि मतदारसंघाचा कायापालट करण्यासाठी मंत्रालयात एका उच्चस्तरीय आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत शिक्षण, आरोग्य आणि मूलभूत पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणावर विशेष भर देत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सुभाष देशमुख यांच्यासह इतर अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. या बैठकीमध्ये शिक्षणाचा दर्जा आणि शाळांची सुधारणा गावागावातील शाळांची स्थिती सुधारून विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि आधुनिक शिक्षण मिळावे, यासाठी विशेष निधीची तरतूद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मतदारसंघातील आरोग्य उपकेंद्रे आणि दवाखाने अधिक सक्षम करून, सर्वसामान्यांना वेळेत आणि तातडीची आरोग्य सेवा मिळावी याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. रस्ते, वीज आणि स्मशानभूमी यांसारख्या मूलभूत गरजांमध्ये कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. सीमावर्ती गावांमधील पाणी, वीज आणि रस्त्यांचे प्रश्न तातडीने सोडवण्यावर या बैठकीत एकमत झाले.

हत्तरसंग कुडलसंगम या तीर्थक्षेत्राच्या विकास आराखड्याला गती देण्यात आली आहे. या आराखड्याला उच्चाधिकार व शिखर समितीची मान्यता मिळवून देऊन, आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. यामुळे या परिसरातील पर्यटनाला आणि अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. दक्षिण सोलापूरचा विकास केवळ कागदावर मर्यादित न राहता, तो प्रत्यक्ष जमिनीवर आणि प्रत्येक घटकापर्यंत पोहोचला पाहिजे.

विकासाचा हा वेग अधिक वाढवून येत्या काळात मतदारसंघाचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याची माहिती पालकमंत्री गोरे यांनी यावेळी दिली.

## यंदाही रेशन दुकानातून महिलांना मिळणार साडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल**



राज्य सरकारने यंदाही अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना मोफत साडी वाटपाचा निर्णय घेतला आहे. एप्रिलअखेर किंवा मे महिन्याच्या सुरुवातीला रेशन दुकानांमार्फत या साड्यांचे वितरण सुरू होणार आहे. ऐन लग्नसराईच्या आणि सणासुदीच्या काळात हा निर्णय घेतल्याने गरीब कुटुंबांना मोठा आर्थिक आधार मिळणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांनी दिली.

ही योजना प्रामुख्याने समाजातील सर्वात दुर्बल असलेल्या 'अंत्योदय' शिधापत्रिकाधारकांसाठी मर्यादित आहे. ज्या कुटुंबांचे उत्पन्न अत्यंत कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांना या निर्णयाचा थेट लाभ मिळेल. शिधापत्रिकाधारकांसाठी ही आनंदाची बातमी असून अंत्योदय योजनेतील लाभार्थ्यांना मागच्या वर्षीप्रमाणे यंदाही मोफत साड्या देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. घरातील ज्येष्ठ महिलेला ही साडी दिली जाणार असल्याची माहिती राज्य शासनाच्या परिपत्रकात देण्यात आली आहे. मागील वर्षी शहर व ग्रामीण भागातील ६५ हजारांहून अधिक लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला होता. यंदाही हा उपक्रम राबवला जाणार असल्याने लाभार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. मागील वर्षीप्रमाणे यंदाही अंत्योदय रेशनकार्डधारक म्हणजेच गरीब कुटुंबांना मोफत साडी देण्यात येणार आहे.

एप्रिलअखेर किंवा मे महिन्याच्या सुरुवातीला रेशनदुकानांमार्फत वितरण सुरू होईल. लग्नसराईच्या काळात या योजनेमुळे गरीब कुटुंबांना दिलासा मिळणार आहे. पिवळे रेशनकार्डधारकांसाठी ही योजना राबवली जात असून राज्यातील सुमारे २४ लाखांहून अधिक कुटुंबांना लाभ मिळणार आहे. सोलापूर शहरातील सुमारे सहा हजार तर ग्रामीण भागातील ४९ महिलांना याचा लाभ मिळेल.



## अक्कलकोटमध्ये अतिक्रमणावर 'बुलडोझर'; वटवृक्ष मंदिर अन् अन्नछत्र परिसर मोकळा

**अक्कलकोट, दि. २२ एप्रिल-**

अक्कलकोट तीर्थक्षेत्र श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान मंदिर परिसर अन्नछत्र मंडळ परिसरात बुधवारी सर्वात मोठी अतिक्रमण विरोधी मोहिम राबविल्यामुळे वटवृक्ष मंदिर आणि अन्नछत्र परिसर मोकळा झाला. यामध्ये ५४ अतिक्रमण केलीली दुकाने बाह्य वळण रस्त्यावरील ३४ अनधिकृत रहिवाशी घरे जेसीबी ने जमीनदोस्त करण्यात आली.

पोलिस निरिक्षक दिपक भिताडे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांच्या नेतृत्वाखाली १५० पोलिस नपाचे ३० कर्मचारी अधिकारी व ७० सफाई कर्मचारी विद्युत वितरण कंपनीचे कर्मचारी व शासकीय इतर अधिकारी मोठ्या फौज फाट्यासह सर्वात मोठी कारवाई करण्यात आली. मंदिर परिसरात पोलीस व साहित्याची वाहतुक करणारे छोटी वाहने स्क्रैप मलबा पत्रे, रॅक बाकडे खुर्चीचा खच पडला होता दुकानदाराची धांदल उडाली होती. या मोहिमेत ५ जेसीबी पोकलेन, दोन दहा ट्रॅक्टर दोन हायवा, या फौज फाट्यासह १५० पोलीस. सहाय्यक रचनाकार नगर पालिका अककलकोट चे शुभम मागुरे ' नगर अभियंता अभिषेक काकडे रचना सहाय्यक उत्कर्ष उकरंडे पो नि भिताडे मुख्याधिकारी रमाकांत डाके सहभागी झाले होते. ही मोहिम पुढील दोन दिवस गुरुवार २३ एप्रिल व २४ एप्रिल रोजी ही चालू राहणार आहे. नागरिकांनी विना परवाना बांधकाम अतिक्रमण स्वतःहुन काडावे असे आवाहन नपा वतीन करण्यात आल आहे.

## नवी पेठ, डी-मार्ट परिसरात अतिक्रमणावर कारवाई; चार हातगाड्या, तीन खोक्यांसह दोन पत्रा शेडवर बुलडोझर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ एप्रिल-**



महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज नवी पेठ आणि जुळे सोलापुरातील डी मार्ट परिसरात बेधडक कारवाई केली. नव्या पेठेत पाच हातगाड्या जप्त केल्या तर डी मार्ट परिसरात चार चाकी चार हातगाड्या, तीन खोके आणि दोन पत्रा शेड जेसीबीच्या साह्याने जागेवरच निष्काशीत करण्यात आले.

सोलापूर शहरात रस्त्यावर अडथळा ठरणारे आणि महापालिकेच्या जागेवर करण्यात आलेले अतिक्रमण हटविण्याची मोहीम महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने राबविण्यात येत आहे. आज सकाळी साडेदहाच्या सुमारास मध्यवर्ती बाजार पेठ असलेल्या नवी पेठ येथे अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली. यावेळी येथील चार चाकी हात गाडीवाल्या व्यापाऱ्यांची मोठी धावपळ उडाली. अतिक्रमण विरोधी पथकाची गाडी पाहताच पथविक्रेते तसेच हात गाडीवाल्यांनी आपल्या गाड्या घेऊन पळ काढला. यामुळे नवी पेठेतील हा रस्ता मोकळा झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. त्यानंतर दुपारी साडेबारा वाजता अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या पथकाने आपली मोहीम जुळे सोलापुरातील डी मार्ट परिसराकडे वळवली. या मोहिमेत चार चाकी चार हातगाड्या, तीन खोके, दोन पत्रा शेड जागेवरच जेसीबीच्या साह्याने निष्काशीत करण्यात आले. त्याचबरोबर दुकानासमोरचे कट्टे जमीन दोस्त करण्यात आली. जाहिरातीचे फलक जप्त करण्यात आले, अशी माहिती महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी दिली. कारवाई वेळी पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. पोलीस बंदोबस्तात ही मोहीम राबवण्यात आली. विक्रेत्यांनी कोणत्याही परिस्थितीत रस्त्यावर आपला व्यवसाय करू नये. रस्त्याला अडथळा आल्याचे दिसून आल्यास तातडीने कारवाई करण्यात येणार आहे. रस्त्याला अडथळा निर्माण होईल आणि सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण केल्यास जप्ती आणि इतर कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी दिला आहे.







## भगवंत महोत्सवात पावसाची बॅटिंग

### न्यू होम मिनिस्टरमध्ये व्यत्यय, संयोजकांकडून फेरआयोजनाची घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ एप्रिल-**



भगवंत महोत्सवाच्या पहिल्या दिवशी महिलांच्या तुफान गर्दीने सुरु झालेल्या न्यू होम मिनिस्टर कार्यक्रमात नुकतीच रंगत सुरु होण्यास सुरुवात झाली अन त्याच दरम्यान अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने महिलांचा काहीसा हिरमोड झाला. मात्र संयोजकांनी लवकरच हा कार्यक्रम पुन्हा एकदा घेण्याचे जाहीर केले.

भगवंत मैदानावर भगवंत महोत्सवाचा शुभारंभ झाला. पहिलाच दिवस अन हजारो महिलांची उपस्थित होती. क्रांती नाना मळेगावकर यांनी कार्यक्रमाची सुरुवात ही जोरदारपणे केली. लग्न होऊन दहा वर्षे झालेल्या महिला व्यासपीठावर बोलावून त्यांच्याकडून उखाणे म्हणून घेण्यास सुरुवात झाली अन् विजांच्या कडकडाटांसह पावसाला सुरुवात झाली अन कार्यक्रम मध्येच थांबवावा लागला. क्रांती नाना मळेगावकर हे लोकप्रिय अभिनेते असून त्यांनी न्यू होम मिनिस्टर (खेळ पैठणीचा) या कार्यक्रमात दमदार एन्ट्री घेतली. विनोदी शैली आणि वहिनींशी संवाद साधण्याच्या पद्धतीमुळे महिलांचा उत्साह वाढला. कार्यक्रमाच्या प्रारंभी बार्शीतील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रतिभावंत, ज्ञानवंत व कर्तव्यनिष्ठ महिलांचा भगवंत महोत्सव समितीच्यावतीने सन्मान करण्यात आला. उद्घाटक म्हणून वर्षा ठोंबरे व कविता राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरुवात श्री भगवंतांच्या प्रतिमेचे पूजन व आरतीने करण्यात आली. त्यानंतर दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

बार्शी नगरपरिषदेतील महिला नगरसेविका, नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, पंचायत समितीचे सभापती मीनाक्षी रोंगे, पंचायत समिती व जिल्हा परिषदेतील महिला सदस्य तसेच भगवंत महोत्सव निवड समिती सदस्य यांच्या हस्ते हा सत्कार संपन्न झाला. यावेळी प्रा. डॉ. उषा गव्हाणे, डॉ. स्मिता यादव, डॉ. वर्षा मोरे, डॉ. अजिता गंभीर, डॉ. सारंग बुरगुटे, डॉ. कविता बेनवडे, डॉ. गीतांजली पाटील, प्रा. स्मिता सुरवसे, प्रा. लाजवंती राठोड, कांचन गुंड, बबीता गवळी, डॉ. ज्योती निंबाळकर, ॲड. वंदना जगनाडे, प्रा. मंजुश्री श्रीमंगल, अमृता कुंकूलोळ, गौरी पाटील, कविता अंधारे, नेहा घाडगे, पाली फाटक, सोनाली रामगुडे, अनुश्री महिंद्रकर, सनवी मोरे, तृप्ती मंगरुळे, विद्या काळे, वैष्णवी कळसाईत, शिल्पा सरवदे, सीमा रुद्रवार, योगिता कटारिया, सुखदा नाईक, ॲड. जयश्री घोडके, प्रा. प्रणाली तायडे, ॲड. योजना घोलप, ॲड. अनुराधा मनगिरे, ॲड. सारिका कोकाटे, ॲड. वृषाली वाघमारे या महिलांना सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. विजयश्री पाटील यांनी केले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लग्नाचे आमिष दाखवून २९ वर्षीय तरुणीवर अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ एप्रिल -**

आनंदनगर पोलीस ठाणे हद्दीत एका २९ वर्षीय तरुणीवर लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी संबंधित तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी (नाव व गाव गोपनीय) हिला दि. १४ जून २०२४ ते दि. १६ मार्च २०२६ या कालावधीत आरोपीने लग्नाचे आमिष दाखवून विविध ठिकाणी नेऊन तिच्यावर अत्याचार केला. तसेच शिवीगाळ करत मारहाण केली व लग्नाचा विषय काढल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.



या संदर्भात पीडितेने दि. २१ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून भा.न्या.सं. कलम ६४, ११५ (२), ३५१(२), ३५२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करीत आहेत.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### सभापतीपदी संतोष बोबडे यांची बिनविरोध निवड

**तुळजापूर, दि.२२ एप्रिल -**

तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी संतोष बोबडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे विश्वासू सहकारी म्हणून त्यांची ओळख आहे. सभापती पदाची निवड प्रक्रिया डीडीआर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या निवडीत सूचक म्हणून माजी सभापती विजय गंगणे, तर अनुमोदक म्हणून आशिष सोनटक्के यांनी काम पाहिले. निवडीनंतर भाजप नेते सज्जन साळुंखे व सचिन रोचकरी यांच्या हस्ते नूतन सभापती संतोष बोबडे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच आ. राणाजगजितसिंह पाटील, नगराध्यक्ष विनोद गंगणे, विजय गंगणे आणि पंचायत समिती सभापती विक्रम देशमुख आदी मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.



### बोरामणी येथे 'श्री लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा' संपन्न

**इटकळ, दि.२२ एप्रिल -**

बोरामणी येथे सोमवार, दि.२० एप्रिल रोजी 'श्री लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा' मोठ्या उत्साहात संपन्न झाला. येथील 'श्री भावार्थ रामायण' ग्रंथ पारायणादरम्यान युद्धकांडातील हा विशेष सोहळा भक्तिभावात साजरा करण्यात आला. सायंकाळी ६ वाजता ग्रंथ वाचन व निरूपण सेवेस प्रारंभ झाला. युद्धकांडातील अध्याय ४३ ते ४९ असे सात अध्याय, एकूण ११३५ ओव्यांचे वाचन व निरूपण पार पडले. हा 'श्री लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा' तब्बल १२ तास सुरू होता. मंगळवार, दि.२१ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता सोहळ्याची सांगता करण्यात आली. यानंतर महाआरती करून उपस्थित रामभक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या सोहळ्यात गाव व परिसरातील सुमारे २०० वाचक व सूचक रामभक्तांनी सेवा बजावली. रामकथा श्रवणासाठी बोरामणी व परिसरातील बहुसंख्य भाविकांनी उपस्थिती लावली होती.



### अध्यक्षपदी डॉ. नंदकुमार राऊत यांची निवड

**धाराशिव, दि.२२ एप्रिल -**

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयोजित ३२ व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. नंदकुमार राऊत यांची निवड करण्यात आली आहे. साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांनी त्यांना निवडीचे पत्र प्रदान केले. दि.२९ व ३० मे २०२६ रोजी धाराशिव येथील लोकनेते अजितदादा साहित्य नगरीतील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात हे संमेलन पार पडणार असून, देशभरातून सुमारे ९०० साहित्यिक उपस्थित राहणार आहेत. अध्यक्ष निवडीसंदर्भात डॉ. शरद गोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सर्वानुमते हा निर्णय घेण्यात आला. यावेळी साहित्य परिषदेचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.



### बदलीनिमित्त डोंगरे यांना निरोप

**भूम, दि.२२ एप्रिल -**

उपविभागीय अधिकारी रेवैयाह डोंगरे यांच्या बदलीनिमित्त कार्यालयात निरोप समारंभ पार पडला. महसूल कर्मचाऱ्यांकडून त्यांचा सत्कार करण्यात आला. अजिनाथ राऊत यांनी संविधान व 'बहिष्कृत भारत' पुस्तके भेट दिली. आपल्या कार्यकाळात डोंगरे यांनी पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन देत पुरपरिस्थितीत जीव धोक्यात घालून अनेकांचे प्राण वाचवले. तसेच शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी व कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी केली.

### १.७८ लाखांचा दंड वसूल

**धाराशिव दि.२२ एप्रिल -**

शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी दि. २१ एप्रिल रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष मोहिम राबवत मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली. या मोहिमेत एकूण २०६ प्रकरणांवर कारवाई करण्यात आली असून १ लाख ७८ हजार ५०० रुपयांचा तडजोड शुल्क वसूल करण्यात आला आहे.

# तुळजापूर शहरासह तालुक्यात वादळी पाऊस व गारपीट

## ▶▶ जनजीवन विस्कळीत, शेतीसह लग्नसमारंभांना फटका

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ एप्रिल -**

तीर्थक्षेत्र तुळजापूर शहरासह तालुक्यात मंगळवारी सायंकाळी अचानक वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. सायंकाळी सुमारे ५ वाजता सुरू झालेल्या या पावसामुळे शहरातील जनजीवन काही काळ विस्कळीत झाले.

तुळजापूरपासून सुमारे १० ते १२ किलोमीटर अंतरावर असलेल्या धारूर येथे अवकाळी पावसासोबत जोरदार गारपीट झाली. या गारपिटीमुळे परिसरातील रस्ते अक्षरशः पांढरे शुभ्र दिसू लागले असून काही ठिकाणी गारांचे थर साचल्याचे चित्र पाहायला मिळाले.

अचानक झालेल्या गारपिटीमुळे नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या आकाराच्या गारांमुळे शेतीपिकांनाही फटका बसल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. विशेषतः भाजीपाला व फळबागांचे नुकसान झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. गारपिटीचा जोर इतका होता की काही काळ वाहतूक मंदावली. रस्त्यावर साचलेल्या गारांमुळे वाहनचालकांना अत्यंत काळजीपूर्वक वाहन चालवावे लागले. वादळी वाऱ्याचा वेग प्रचंड असल्याने मंदिर परिसरात भाविकांसाठी उभारलेले तात्पुरते पडदे उडून गेले. तसेच एका वाहनावर झाड कोसळले; मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. विजांच्या कडकडाटासह ढगांचा गडगडाट होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. काही भागांत वीजपुरवठाही खंडित झाला.

अचानक आलेल्या पावसामुळे दर्शनासाठी आलेल्या भाविकांची मोठी धावपळ उडाली. अनेकांना पावसातच दर्शन घ्यावे लागले. बाजारपेठेतही व्यापाऱ्यांचे नुकसान झाले असून तात्पुरत्या उभारलेल्या साहित्यांचे वाऱ्याने नुकसान झाले.



तुळजापूर तालुक्यातील काही गावांमध्येही वादळी वाऱ्यासह मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला असून काही ठिकाणी गारपीट झाल्याची माहिती आहे.

दरम्यान, लग्नसराईचा हंगाम सुरू असल्याने या अवकाळी पावसाचा लग्न समारंभांनाही मोठा फटका बसला. गोरज मुहूर्तावर होणाऱ्या लग्नसोहळ्यांमध्ये अचानक पावसामुळे तारांबळ उडाली. अनेकांना समारंभ हॉलमध्ये हलवावे लागले, तर डेकोरेशनचेही नुकसान झाले.

## जिल्ह्यात वादळी पाऊस व गारपीट; वीज पडून एकाचा मृत्यू, प्रशासनाचा सतर्कतेचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ एप्रिल -**

जिल्ह्यात बुधवारी संध्याकाळपासून निसर्गाचा रौद्ररूप पाहायला मिळाले. अनेक भागांत वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस आणि मोठ्या प्रमाणावर गारपीट झाली. या नैसर्गिक आपत्तीत वीज पडून एका व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.




परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता प्रशासनाने पुढील काही दिवसांसाठी हवामानाबाबत सतर्कतेचा इशारा दिला आहे. येत्या काही दिवसांत पुन्हा वादळ, जोरदार वारे, पाऊस आणि गारपिटीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी स्वतःची व कुटुंबाची योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ज्या भागांत शेती व मालमत्तेचे नुकसान झाले आहे, त्या ठिकाणी उद्या सकाळपासून पंचनामे करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. नुकसानीचा आढावा घेऊन पुढील शासकीय प्रक्रिया तातडीने पूर्ण केली जाणार असल्याचे प्रशासनाने सांगितले. पुढील काही दिवस हवामान प्रतिकूल राहण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी विनाकारण बाहेर पडणे टाळावे आणि हवामान खात्याच्या सूचनांचे पालन करावे. आपत्तीच्या काळात स्वतःची व कुटुंबीयांची सुरक्षितता सुनिश्चित करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, आ. राणादादा यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.



## कळंबमध्ये घरफोडी; सुमारे ३.९८ लाखांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२२ एप्रिल -**

तालुक्यातील बोर्डा येथील भारत भगवान काळे (वय ५९) यांच्या घरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सुमारे ३ लाख ९८ हजार २५० रुपयांचा ऐवज चोरून नेला.

दि.२० एप्रिल रात्री ११ ते २१ एप्रिल पहाटे ३ वाजताच्या दरम्यान चोरट्यांनी घराच्या चॅनल गेटचा कडी-कोंडा तोडून आत प्रवेश केला. कपाटातील १२४ ग्रॅम सोन्याचे दागिने व ८० हजार रुपये रोख रक्कम असा मुद्देमाल लंपास करण्यात आला.

या प्रकरणी भारत काळे यांच्या फिर्यादीवरून कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## दत्ताभाऊ कुलकर्णी यांना विधान परिषदेत संधी देण्याची कार्यकर्त्यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ एप्रिल -**

धाराशिव प्रतिनिधी

भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांना विधान परिषदेवर संधी द्यावी, अशी मागणी धाराशिव जिल्ह्यातील कार्यकर्त्यांतून जोर धरत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जिल्हा परिषद, नगर परिषद व पंचायत समिती स्तरावर त्यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने लक्षणीय यश मिळवत सत्ता स्थापन केली. त्यामुळे पक्ष संघटन बळकट करण्यात त्यांचा मोठा वाटा असल्याचे कार्यकर्त्यांचे मत आहे.



कुलकर्णी यांनी तळागाळातील कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क ठेवत संघटनात्मक बांधणी मजबूत केली आहे. बूथ पातळीवरील नियोजन, कार्यकर्त्यांना सक्रिय करण्याची क्षमता आणि विकासाभिमुख दृष्टीकोन या त्यांच्या जमेच्या बाजू मानल्या जातात. स्थानिक राजकारणातील आरोप-प्रत्यारोपांपासून दूर राहून त्यांनी विकासाच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले असल्याचेही कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. महायुतीतील घटक पक्षांमध्ये समन्वय साधत विविध प्रश्न मार्गी लावण्यात त्यांनी पुढाकार घेतला.

सिद्धिविनायक परिवाराच्या माध्यमातून सहकार, बँकिंग व उद्योग क्षेत्रात काम करत त्यांनी रोजगार निर्मितीलाही चालना दिली आहे. तसेच 'संकल्प ते सिद्धी' यांसारख्या उपक्रमांद्वारे पक्ष कार्यकर्त्यांना एकत्रित करून संघटन विस्ताराचे काम केले आहे.

दरम्यान, महाराष्ट्र विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली असून दि. १२ मे रोजी मतदान होणार आहे. विधानसभेतील संख्याबळ लक्षात घेता महायुतीचे वर्चस्व स्पष्ट असल्याने भाजपच्या वाट्याला येणाऱ्या जागांपैकी एक जागा दत्ताभाऊ कुलकर्णी यांना द्यावी, अशी मागणी कार्यकर्त्यांकडून अधिक तीव्र होत आहे.

## विधान परिषदेसाठी ॲड. व्यंकटराव गुंड पाटील यांच्या उमेदवारीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ एप्रिल -**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या १२ मे रोजी होणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ॲड. व्यंकटराव गुंड यांना उमेदवारी द्यावी, अशी मागणी कार्यकर्ते व नागरिकांकडून जोर धरत आहे.

पाडोळी (आ.) येथील गुंड परिवार गेल्या चार दशकांपासून सामाजिक, औद्योगिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असून, ॲड. गुंड हे सध्या भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य आहेत.

संघटन कौशल्य, पक्षनिष्ठा आणि व्यापक जनसंपर्क यामुळे त्यांची उमेदवारी सक्षम मानली जात आहे.

## कानेगाव शाळेचा परसबाग स्पर्धेत प्रथम क्रमांक; सेंद्रिय शेतीचा आदर्श

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२२ एप्रिल -**

तालुकास्तरीय परसबाग स्पर्धेत लोहारा तालुक्यातील कानेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने प्रथम क्रमांक पटकावून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. या स्पर्धेत तालुक्यातील विविध भागांतील अनेक शाळांनी सहभाग नोंदविला होता.

स्पर्धेत बागेचे नियोजन, सेंद्रिय खतांचा वापर, दुर्मिळ वनस्पतींचे जतन तसेच पाणी व्यवस्थापन या निकषांवर परीक्षण करण्यात आले. कानेगाव शाळेने आपल्या परसबागेत वांगी, टोमॅटो, कोबी, मिरची यांसारख्या विविध भाज्यांसह फळझाडांची शास्त्रशुद्ध पद्धतीने लागवड केली आहे. विशेष म्हणजे, घरगुती कचऱ्यापासून तयार केलेल्या सेंद्रिय खताचा वापर करून शाळेने पूर्णपणे विषमुक्त बाग विकसित केली आहे. गावकऱ्यांच्या लोकसहभागातून ही परसबाग उभारण्यात आली असल्याने या उपक्रमाचे विशेष कौतुक होत आहे. या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दादासाहेब कदम, उपाध्यक्ष विद्या पतंगे तसेच सदस्य विवेकानंद भारती, माधुरी कांबळे, पूजा पाटील, भागवत पुरी, सुषमा भुरे, संभाजी मोरे, मंगल बन, नसरीन तांबोळी, एकनाथ तरमुडे,



कमलाकर कदम, स्वाती कदम, किरण लोभे यांनी अभिनंदन केले.

परसबाग निर्मितीसाठी गावकऱ्यांचे सहकार्य लाभले, अशी माहिती देताना शाळेचे मुख्याध्यापक बालाजी साळुंके यांनी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांच्या परिश्रमांचे कौतुक केले. या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी शिवहार बिराजदार, विस्ताराधिकारी विश्वजीत चंदनशिवे व केंद्रप्रमुख मोहन शेवाळे यांच्यासह विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

## डिकसळ ग्रामपंचायतीचा कारभार रामभरो!

### ▶▶ मठ रोडवरील नाली बांधकामावर आक्षेप; कामाची चौकशी करण्याची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२२ एप्रिल -**

कळंब शहराचा विस्तारित भाग व डिकसळ ग्रामपंचायत हद्दीतील मठ रोडलगत सुरू असलेल्या नाली बांधकामावर स्थानिकांकडून तीव्र आक्षेप घेण्यात आला आहे. सदर काम तांत्रिकदृष्ट्या चुकीचे असून, जनतेच्या कररकमेचा दुरुपयोग होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.




या परिसरात मोठ्या प्रमाणावर वस्ती तसेच पक्की घरे आहेत. त्यामुळे लोकसंख्या आणि घरांची संख्या लक्षात घेता किमान १.५ बाय १.५ फूट रुंद व तितक्याच खोलीची नाली बांधकाम करणे आवश्यक असताना, सध्या दोन इंची पाईपद्वारे पाणी निस्सारणाची व्यवस्था केली जात आहे. प्रत्येक वीस फुटांवर चेंबर तयार करून हे काम केले जात असून, ही पद्धत अपुरी व अयोग्य असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (श.प.) चे मुसाद्देक काझी व भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे कलीम तांबोळी यांनी डिकसळ ग्रामपंचायत कार्यालयातील ग्रामविकास अधिकाऱ्यांना निवेदन देत कामाची तांत्रिक तपासणी करून योग्य नाली बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी केली आहे.

सदर काम केंद्र सरकारच्या योजनेतून जिल्हा परिषद यंत्रणेच्या माध्यमातून होत असल्याचे ग्रामपंचायतीकडून सांगण्यात येत असले, तरी कामाचा दर्जा आणि मंजुरीप्रमाणे काम होत आहे की नाही, याकडे ग्राम पंचायतीने लक्ष देणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.


दरम्यान, मठ रोड तसेच डॉक्टर आवटी हॉस्पिटल पाठीमागील रस्ता अत्यंत खराब व खड्डेमय झाला आहे. विशेषतः पावसाळ्यात या रस्त्यावरून नागरिकांना चालणेही कठीण होते.

वारंवार निवेदने देऊनही रस्त्याची दुरुस्ती होत नसल्याने परिसरातील रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

## वाशी तालुक्यात अवकाळी पावसाचा तडाखा; शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२२ एप्रिल -**

दि.२१ एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाने अचानक हजेरी लावली. या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांची एकच धावपळ उडाली.



शेतात काढून ठेवलेली ज्वारी झाकण्यासाठी शेतकरी पळापळ करताना दिसून आले.

अनेक ठिकाणी काढलेली ज्वारी पावसात भिजल्यामुळे नुकसान झाले, तर वादळी वाऱ्यामुळे उभी पिकेही सपाट झाल्याचे चित्र दिसून आले. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठी चिंता व्यक्त होत आहे.

यासोबतच या पावसाचा आंबा पिकालाही फटका बसल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. विजांच्या कडकडाटामुळे काही काळ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

अचानक आलेल्या या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्तांना मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## केबल व विद्युत साहित्य चोरी; १.२० लाखांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ एप्रिल -**

नळदुर्ग पोलीस ठाणे हद्दीतून सप्लाय केबल व विद्युत साहित्य चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. २२ मार्च २०२६ रोजी रात्री १० वाजता ते दि. २३ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास नळदुर्ग येथील बूरेज क्र. ०१ येथून सप्लाय केबल, पॅनेलमधील तांब्याचे वायर तसेच एमसीबी असा एकूण १ लाख २० हजार २३६ रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने लंपास केला.



या संदर्भात फिर्यादी प्रसाद वळवंतराव कांबळे (वय ४६, रा. रावळ गल्ली, तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी दि. २१ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### बारूळच्या विद्यार्थिनींचा थ्रोबॉलमध्ये राज्यस्तरीय तृतीय क्रमांक

**तुळजापूर, दि.२२ एप्रिल -**

तालुक्यातील बारूळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या १४ वर्षाखालील मुलींच्या थ्रोबॉल संघाने राज्यस्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. संघातील तीन विद्यार्थिनींची राष्ट्रीय स्तरासाठी निवड झाली आहे. ग्रामीण शाळेच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत असून, विद्यार्थिनींसह शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा मोठा वाटा मानला जात आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांच्या वतीने विद्यार्थिनी व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास सिद्धेश्वर कोरे, हेमंत भिंगारेदेवे, दयानंद शिंदे यांच्यासह मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थिनींच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### बेकायदेशीर पेट्रोल साठ्यामुळे स्फोट; महिला ठार

**उमरगा, दि.२२ एप्रिल -**

तालुक्यातील व्हंताळ येथे किराणा दुकानात बेकायदेशीररित्या पेट्रोल साठवून ठेवल्यामुळे झालेल्या स्फोटात एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. महादेव जीवन चव्हाण यांनी दुकानात पेट्रोलच्या बाटल्या ठेवून



तंबाखू पॅकिंग करताना दिव्यामुळे पेट लागून स्फोट झाला. या घटनेत कमल गणपती मुळे या गंभीर जखमी झाल्या होत्या; उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी बालाजी मुळे यांच्या फिर्यादीवरून उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# जि.प. शाळांना उपाध्यक्षा उषाताई गायकवाड यांची सदिच्छा भेट

### शाळा एकत्रिकरणास पालकांचा विरोध

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ एप्रिल -**

धाराशिव जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा उषाताई गायकवाड यांनी दि.२२ एप्रिल रोजी नळदुर्ग येथील केंद्रीय प्राथमिक शाळेसह जि.प. प्रशालेला सदिच्छा भेट देऊन पाहणी केली.

प्रारंभी केंद्रीय प्राथमिक शाळेला भेट दिल्यानंतर त्यांनी शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक, विद्यार्थी व शिक्षकांशी विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी पालकांनी प्राथमिक व माध्यमिक शाळांचे एकत्रिकरण करण्यास विरोध दर्शविला. शाळेची गुणवत्ता, पटसंख्या आणि विद्यार्थ्यांची सुरक्षितता अबाधित ठेवण्यासाठी तसेच शाळेच्या परिसरातील अतिक्रमण हटविण्यासाठी जागेची मोजणी करण्याबाबत प्रयत्न करणार असल्याचे उषाताई गायकवाड यांनी सांगितले.

यावेळी नगरसेविका व शाळा समितीच्या सदस्या सुमनबाई ठाकूर यांनी उषाताई गायकवाड यांचा सत्कार केला. कार्यक्रमात शालेय समितीचे अध्यक्ष संतोष पुदाले, सदस्य प्रमोद कुलकर्णी, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके व मुख्याध्यापक मस्के यांनी शाळेसमोरील विविध समस्या मांडल्या.

भेटीदरम्यान उषाताई गायकवाड यांनी प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच शाळेतील स्वच्छता, शैक्षणिक वातावरण, पटसंख्या व गुणवत्तेबाबत शिक्षकांचे कौतुक केले.




यावेळी नगरसेवक तानाजी जाधव, बलदेवसिंग ठाकूर, समिती सदस्य नेताजी महाबोले, विलास येडगे, उत्तम बनजगोळे, भगवंत सुरवसे, दत्तात्रय वाघमारे, सहशिक्षिका धुमाळ, भंडारे, गायकवाड, माने तसेच युवासेनेचे विजय ठाकूर यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानंतर उषाताई गायकवाड यांनी जि.प. प्रशालेला भेट देऊन शाळेची पाहणी केली. यावेळी स्वच्छता व कमी विद्यार्थीसंख्येबाबत त्यांनी मुख्याध्यापकांकडून माहिती घेतली. दरम्यान, काही नागरिकांनी शाळेतील समस्या मांडत असताना मुख्याध्यापकांनी त्यांच्याशी वाद घातल्याची घटना घडली. या ठिकाणीही शाळेच्या वतीने उषाताई गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला.

## गोलाई चौकात वाहतूक अडथळा; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२२ एप्रिल -**

शहरातील गोलाई चौकात सार्वजनिक रस्त्यावर वाहने धोकादायकरीत्या उभी करून वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी भुम पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हे नोंदवले आहेत.

याबाबत पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, राहुल बाजीरंग कांबळे (रा. वरुडा) व अदिनाथ चांगदेव पालके (रा. वांगी) यांनी दि.२१ एप्रिल रोजी दुपारी आपापल्या ताब्यातील टमटम (क्र. एमएच २५ पी ५६४५) व कार (क्र. एमएच २५ एल ६६७३) गोलाई चौक येथे रस्त्यावर उभी केल्याचे निदर्शनास आले.

या प्रकरणी भुम पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम २८५ (मोवाका) अन्वये स्वतंत्र दोन गुन्हे नोंदवले आहेत.

## सिंदगाव येथे एकल महिलांची सहविचार सभा; विविध समस्यांकडे लक्ष वेध



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ एप्रिल -**

येथील परिवर्तन सामाजिक संस्थेअंतर्गत साऊ महिला संघटनेच्या वतीने तालुका तुळजापूर येथील सिंदगाव येथे विधवा, निराधार, परित्यक्ता व एकल महिलांची सहविचार सभा उत्साहात पार पडली.

या सभेत परिवर्तन सामाजिक संस्थेचे सचिव तसेच मिशन वात्सल्य समिती तुळजापूरचे अशासकीय सदस्य मारुती बनसोडे यांनी उपस्थित महिलांना शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. तसेच गावातील महिलांच्या अडचणी व समस्या जाणून घेत त्यावर मार्गदर्शन केले.

सभेदरम्यान अनेक समस्या समोर आल्या. सुमारे २० महिला उपस्थित होत्या. त्यापैकी चार महिलांना घरकुल योजनेचा लाभ मिळालेला नाही. दोन महिलांच्या मुलांना मिळणारा बालसंगोपन योजनेचा लाभ अचानक बंद झाल्याची तक्रार करण्यात आली. तसेच एका घटस्फोटित महिलेला पाच वर्षांचा मुलगा असूनही तिला कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळालेला नसल्याची बाब समोर आली.

महाराष्ट्रात हेरंब कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली साऊ एकल महिला संघटना कार्यरत असून धाराशिव जिल्ह्यात विजय काका जाधव व मारुती बनसोडे हे कोरोना काळापासून या प्रश्नांवर सातत्याने काम करत आहेत.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कमल पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

## तुळजापूर तालुक्यात वादळी पावसाचा फटका




**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ एप्रिल -**

तुळजापूर तालुक्यात दि. २१ एप्रिल रोजी झालेल्या वादळी पावसामुळे आंबा बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून आंबा उत्पादक शेतकरी संकटात सापडले आहेत.

वादळी वाऱ्याच्या तडाख्यामुळे झाडांवरील आंबे मोठ्या प्रमाणात गळून पडले. यावर्षी आधीच आंब्याला तुर कमी लागल्याने उत्पादन घटले होते. त्यातच अवकाळी पावसाने उरलेसुरले पीकही जमीनदोस्त केल्याने शेतकऱ्यांमध्ये मोठी हळहळ व्यक्त होत आहे. तालुक्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांसह सचिन हंगरगेकर यांच्या बागेचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती आहे. अचानक झालेल्या या नुकसानीमुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले आहे.

नुकसानग्रस्त बागांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना योग्य ती नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांतून करण्यात येत आहे.

## सेवावृत्ती गोविंद सोमाणी व सुमन सोमाणी यांचा गौरव समारंभ संपन्न




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ एप्रिल -**

एकलव्य विद्या संकुल यमगरवाडी येथे नांदेड येथील गोविंद सोमाणी व सुमन सोमाणी यांनी संकुलात तीन वर्षे सेवावृत्ती म्हणून दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांचा शुभेच्छा व निरोप समारंभ उत्साहात पार पडला.

नांदेडमध्ये प्लायवूडचा मोठा व्यवसाय आणि विस्तीर्ण परिवाराची जबाबदारी सांभाळत असतानाही, समाजकार्याची जाणीव ठेवून त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मार्फत सेवा कार्यासाठी वेळ देण्याचा निर्णय घेतला. त्यांनी आपल्या परिवारापासून दूर राहून यमगरवाडी प्रकल्पावर पूर्णवेळ सेवा केली.

सर्व सुविधांपासून दूर असलेल्या या प्रकल्पावर त्यांनी अत्यंत समर्पित आणि निस्वार्थ भावनेने काम करत भटके-विमुक्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेत बचत बँक व ग्राहक भांडार सुरू करून विद्यार्थ्यांमध्ये बचतीची सवय रुजवली. तसेच भटक्या वस्त्यांवर जाऊन त्यांच्या जीवनाचा अभ्यास केला.

सेवेची तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानच्या वतीने उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर, कार्यवाह विवेक अयाचित, कोषाध्यक्ष नरेश पोटे, तसेच संघटनमंत्री राहुल चव्हाण यांच्या हस्ते त्यांचा पूर्ण पेहराव व तुळजाभवानीची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे यांनी प्रास्ताविक केले.

या कार्यक्रमाला प्रतिष्ठानचे पदाधिकारी, सोलापूर येथील भुतडा परिवार, मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, अण्णासाहेब कोल्हटकर तसेच कर्मचारी, कार्यकर्ते आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरीश मगदूम यांनी केले तर आभार संगीता पाचंगे यांनी मानले.

## कळंबमध्ये दुकानफोडी; १५ हजारांची रोकड चोरी, दोन ठिकाणी चोरीचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२२ एप्रिल -**

कळंब पोलीस ठाणे हद्दीत दुकानफोडीची घटना घडली असून अज्ञात चोरट्याने रोकड चोरून नेल्याची माहिती समोर आली आहे. तसेच शेजारील दोन दुकानांमध्ये चोरीचा प्रयत्न केल्याचेही उघड झाले आहे.पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संभाजीनगर (डिकसळ) येथील उमाकांत दासराव जगधने (वय ४६) यांच्या 'श्रद्धा बॅग हाऊस' या दुकानाचे शटर उचकटून अज्ञात व्यक्तीने आत प्रवेश केला. कॅश काउंटरमधील ड्रॉवर तोडून १५ हजार रुपयांची रोकड चोरून नेली.

याच परिसरातील नगरपरिषद शॉपिंग सेंटरमधील 'मॉडर्न कलेक्शन' व 'शिंदे क्लॉथ सेंटर' या दोन दुकानांचे शटरचे कुलूप तोडून चोरीचा प्रयत्न करण्यात आल्याचेही समोर आले आहे.



या प्रकरणी फिर्यादी उमाकांत जगधने यांनी दि.२१ एप्रिल रोजी दिलेल्या तक्रारीवरून कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## नळदुर्गमध्ये मटका जुगारावर छापा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ एप्रिल -**

जुगारविरोधी कारवाईदरम्यान नळदुर्ग पोलिसांनी बसस्टॉप परिसरात छापा टाकून मटका जुगार चालवणाऱ्या आरोपीवर कारवाई केली.

दि.२१ एप्रिल रोजी दुपारी बसस्टॉपजवळील चिकन दुकानासमोरील पत्र्याच्या शेडलगत छापा टाकला असता जमीर महेबुब उडचणे (रा. इंदिरानगर, नळदुर्ग) याच्याकडून टाईम बाजार मटका जुगाराचे साहित्य व ३,७४० रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली.

## तुळजापूरात अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी; आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ एप्रिल -**

तुळजापूर येथील जुने बसस्थानक रोड ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गावर वाढलेल्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडीची समस्या तीव्र झाली आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी तसेच मधोमध भाजी विक्रेते व छोटे व्यापारी बसत असल्याने रहदारीला अडथळा निर्माण होत आहे.




या पार्श्वभूमीवर परिसरातील व्यापाऱ्यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांना निवेदन देऊन अतिक्रमणे हटवण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, जुने बसस्थानक रोड हा भवानी मंदिराकडे जाणारा तसेच प्रमुख व्यापारी पेठेचा मार्ग आहे.

याच मार्गावर नगर परिषद, पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय तसेच शैक्षणिक क्लासेस असल्याने दिवसभर मोठ्या प्रमाणात वर्दळ असते.

मात्र सध्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी आणि मधोमध भाजी विक्रेते व छोटे व्यापारी अतिक्रमण करत असल्याने वारंवार वाहतूक कोंडी होत आहे.

या ठिकाणची भाजी मंडई व इतर अतिक्रमणे तातडीने हटवावीत, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा व्यापाऱ्यांनी दिला आहे.

संबंधित निवेदनावर परिसरातील व्यापाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय भाषा आत्मसात कराव्यात : संजय मिस्किन

### माणकेश्वर येथे 'गौरव सोहळा' उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२२ एप्रिल -**

विद्यार्थ्यांनी मातृभाषेबरोबरच जर्मन, जपानी, फ्रेंच यांसारख्या आंतरराष्ट्रीय भाषांवर प्रभुत्व मिळवून जागतिक स्तरावर संधी साधाव्यात, असे प्रतिपादन राजकीय विश्लेषक संजय मिस्किन यांनी केले.

भूम तालुक्यातील माणकेश्वर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (अंधारेवस्ती) येथे कर्मवीर परिवारातर्फे आयोजित 'गौरव सोहळा' उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बार्शी तालुका कृषी अधिकारी किशोर अंधारे होते. प्रमुख पाहुणे म्हणून परंडा येथील बाल विकास प्रकल्प अधिकारी तथा पालकमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी गणेश कुकडे, तसेच शिक्षण विस्तार अधिकारी सोमनाथ टकले उपस्थित होते. यावेळी संजय मिस्किन यांनी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी एकजूट आवश्यक असल्याचे सांगत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी विविध उपक्रम राबवण्याचे आवाहन केले. कर्मवीर परिवाराच्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे त्यांनी विशेष कौतुक केले.



कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये संदीप मोरे (केंद्रप्रमुख), विशाल अंधारे (पुणे पोलीस), आरोही सांगडे (नवोदय विद्यालय, तुळजापूर), अनया अंधारे (भोसला मिलिटरी स्कूल, नाशिक), प्रशांत क्षीरसागर (भारतीय रेल्वे सेवा), साधना अंधारे (सदस्य, जिल्हा परिषद धाराशिव), पूजा ढगे (सभापती, पंचायत समिती भूम), परसू गवारे (उपसभापती, पंचायत समिती परांडा), मनोज अंधारे (सदस्य, पंचायत समिती भूम), सुदाम पाटील (जिल्हाध्यक्ष, कामगार मोर्चा धाराशिव) तसेच विशाल ढगे (संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती भूम) यांचा समावेश होता. पाणी फाउंडेशन, शिवजल क्रांती, निजामकालीन शाळा, सकाळ रिलीफ फाउंडेशन, मुलींसाठी जिल्हा वस्तीगृह आदी क्षेत्रांत भरीव योगदान दिल्याबद्दल पत्रकार संजय मिस्किन यांचा कर्मवीर परिवार व ग्रामस्थांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

शिक्षण विस्तार अधिकारी सोमनाथ टकले, नूतन केंद्रप्रमुख संदीप मोरे, गणेश महाराज अंधारे व किशोर अंधारे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष तोडकरी यांनी केले. प्रास्ताविक डॉ. राहुल अंधारे यांनी, तर आभार प्रदर्शन दत्तात्रय घोडके यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भालचंद्र पाटील, प्रवीण अंधारे, ज्ञानेश्वर कातुरे, अशोक बनसोडे, दत्तात्रय गुंजाळ, रत्नदीप अंधारे, अमोल चोपडे, अलका तांबे, मंजुषा सुरवसे, प्रमिला जावळे, विद्या वैद्य, वैजनाथ नरके, दिगंबर मोहिते आदी कर्मवीर परिवारातील सदस्यांनी परिश्रम घेतले.

## तुगाव येथे मारहाणीची घटना; ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ एप्रिल -**

ढोकी पोलीस ठाणे हद्दीत तुगाव येथे जुन्या वादातून मारहाण केल्याची घटना घडली असून या प्रकरणी ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. २० एप्रिल २०२६ रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास तुगाव येथे आरोपींनी मागील भांडणाच्या कारणावरून एकत्र येत फिर्यादी जयश्री भैरवनाथ गडकर (वय ४५, रा. तुगाव, ता. जि. धाराशिव, सध्या मुंबई-मजगाव) यांना शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व दगडाने मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी नेताजी शिवाजी गडकर, शिवाजी गडकर, धनाजी गडकर, अंकुश गडकर, बबन गडकर, सुनंदा गडकर, पार्वती गडकर, सुचिता गडकर, बालिका गडकर, प्रियंका गडकर व संभाजी गडकर (सर्व रा. तुगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

फिर्यादी जयश्री गडकर यांनी दि.२१ एप्रिल रोजी दिलेल्या तक्रारीवरून ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनधारकांवर तात्काळ कारवाईची मागणी

तभा वृत्तसेवा
लातूर, दि. २२ एप्रिल : लातूर शहरातील मिनी मार्केट नजीकच्या कामदार पेट्रोल पंपावरून विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनधारकांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी होत आहे.
कामदार पेट्रोल पंपावरून दुचाकीधारक, चार चाकीधारक मध्येच रस्ता ओलांडण्याची घाई करत सिग्नल पडलेले असतानाही मिनी मार्केटकडून येणाऱ्या वाहनधारकांची गोची करतात. हा प्रकार मागच्या अनेक काळापासून चालू आहे.
या सिग्नलवर कर्तव्यावर असणाऱ्या वाहतूक शाखेच्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या कानावर अनेकांनी ही बाब घातली. पण, वाहन धारक दाद देत नसल्याचे त्यांचे म्हणणे आले. आता या वाहनधारकांवर तात्काळ दंडात्मक कारवाई करण्यात यावी, जेणेकरून हा प्रकार थांबेल,अशी आशा संतप्त वाहनधारक व्यक्त करत आहेत.अनेकदा विरुध्द दिशेने येणाऱ्या सिग्नल पडले असतानाही मिनी मार्केटकडून येणाऱ्या वाहनांना रस्ता मिळत नसल्याने एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकाराता येत नाही



## विविध वृत्त...

## समूह बुद्ध, भीमगीत गायन स्पर्धा

तभा वृत्तसेवा
लातूर दि. २२ एप्रिल : शहरातील समता नगर येथील बुद्ध गार्डनमध्ये १ मे रोजी बुद्ध पौर्णिमेनिमित्त बुद्ध व भीमगीतांच्या समूह गीतगायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक २१ हजार, द्वितीय पारितोषिक ११ हजार तर दोन तृतीय पारितोषिक प्रत्येकी रुपये ५ हजार रुपयांचे असंणार आहे. लातूर अर्बन को-ऑप. बँकेच्या सहकार्याने ही स्पर्धा अष्टविनायक प्रतिष्ठान संचलित बुद्ध गार्डन येथे होणार आहेत. स्पर्धेसाठी समूहामध्ये किमान ६ गायक आवश्यक असणार आहेत. बुद्ध व भीम गीतांचेच सादरीकरण करावे लागणार आहे. स्पर्धकांनी २८ एप्रिलपर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन समता नगरमधील बुद्धगया महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## बौद्ध साहित्य संमेलनानिमित्त रोहित पिसाळ लातूरमध्ये


तभा वृत्तसेवा
लातूर दि. २२ एप्रिल : दिं.१० मे रोजी बौद्ध साहित्य संमेलना निमित्त उद्योजक तथा बौद्ध अभ्यासक रोहित पिसाळ हे लातूर येथे येत असून त्यांचे लातूर मधील आगमन म्हणजे एक वेगळे आकर्षण ठरणार असून, त्यांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी लातूरमध्ये चालू असल्याचे, बौद्ध साहित्य संमेलन संयोजन समितीचे अध्यक्ष चंद्रकांत शिंदे, कार्याध्यक्ष तथा संयोजक राजेंद्र कांबळे, सचिव यु.डी. गायकवाड यांनी कळविले आहे.
याविषयी अधिक माहिती अशी की, दिनांक दहा मे २०२६ वार रविवार रोजी लातूर येथील भालचंद्र ब्लड बँक येथे दुसऱ्या मराठी बौद्ध साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रसिद्ध उद्योगपती तथा बौद्ध अभ्यासक रोहित पिसाळ, तसेच संमेलन अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध साहित्यिक, डॉ .प्रशांत गायकवाड, डॉ. नारायण कांबळे, डॉ. विजय गैबीमोरे, प्रा. सुकुमार कांबळे, डॉ. गिरीश मोरे, अमित मेधावी, जगदीश ओहोळ यांच्यासह अनेक साहित्यिक या संमेलनास उपस्थित राहणार आहेत.

## कडब्याने भरलेला छोटा हत्ती जळून खाक



तभा वृत्तसेवा
लातूर दि. २२ एप्रिल : बाभळगाव : विद्युत तारेच्या खाली उभा असलेल्या कडब्याच्या छोटा हत्ती टेम्पोवर वादळी वाऱ्यामुळे शॉर्टसर्किट होऊन ठिणगी पडली. यामुळे कडब्यासह संपूर्ण टेम्पोच जळून खाक झाल्याची घटना लातूरजवळील बाभळगाव रोडवरील काझी पेट्रोल पंपाजवळ सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास घडली.
टेम्पो मालक शेरखान पठाण हे मंगळवारी सायंकाळच्या सुमारास त्यांचा कडब्याने भरलेला छोटा हत्ती टेम्पो (एम एच २४ जे ९७७०) घेऊन काझी पेट्रोल पंपाजवळ थांबले होते. त्याचवेळी विद्युत तारेचे घर्षण होऊन तार तुटली. ती छोटा हत्तीवर तुटून पडल्याने अचानक आग लागली. त्यातच वादळी वारे सुटल्याने आग भडकली. यामुळे कडब्यासह टेम्पो पेटला. यात नुकसान झाले आहे. काल सकाळी त्यांनी वलांडी येथून कडबा खरेदी करून विक्रीसाठी छोटा हत्ती गाडीत कडक भरला होता. बाभळगाव रोडवरील काझी पेट्रोल पंपाजवळ चहा पिण्यासाठी उभा केला होता.
लातूर येथून अग्निशामक दलाचे विकास हिंगोले, फायरमन जे. बी शेख यांच्यासह अग्निशामक दलाने आम आटोक्यात आणली. मात्र आगीत मोठ्य प्रमाणात नुकसान झाल्याने प्रशासनान नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे.

## संतोष सोनवणे यांना विकासरत्न प्रेरणा पुरस्कार



तभा वृत्तसेवा
लातूर दि. २२ एप्रिल : समृद्धी पर्यटन सांस्कृतिक विकास सेवा ट्रस्टच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय विकासरत्न प्रेरणा पुरस्कार व समृद्धी कला सादरीकरण सोहळा २०२६ हा भव्य कार्यक्रम कांदिवली (पूर्व), मुंबई येथील अशोक सावंत हॉलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा अत्यंत दिमाखदार पद्धतीने पार पडला.
या सोहळ्यात लातूर येथील पत्रकार संतोष सोनवणे यांना विकासरत्न प्रेरणा पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.
या सोहळ्यास अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक, गीतकार व समाजकार्यकर्ते ॲड. बाळासाहेब तोरस्कर उपस्थित होते.
प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रकाश सुर्वे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस सब इन्स्पेक्टर मंगेश अनंत नाईक यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून करण्यात आले.
स्वागताध्यक्ष व संयोजिका म्हणून सौ. मीनाक्षी महादेव पाखरे यांनी मान्यवरांचे स्वागत केले, तर ट्रस्टचे सचिव महेश महादेव पाखरे यांनी कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन केले यावेळी राष्ट्रीय सुवर्णपदक प्राप्त प्राध्यापिका व ज्येष्ठ साहित्यिका डॉ. अलका नाईक तसेच डॉ. रावसाहेब नाना घोडेराव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत प्रेरणादायी विचार मांडले.

## वाढत्या उष्णतेमुळे वीजयंत्रणेजवळ कचरा टाकू अथवा जाळू नये महावितरणचे आवाहन

तभा वृत्तसेवा
लातूर, दि. २२ एप्रिल : वाढत्या उष्णतेमुळे आग लाण्याचे प्रकार वाढत असल्याने महावितरणच्या वीजयंत्रणेजवळ कचरा टाकण्याचे व तो जाळण्याचे प्रकार नेहमीच होत असतात. महावितरण, महानगरपालिका प्रशासनाने वारंवार सूचना देवूनही रोहित्रा जवळ कचरा सातत्याने टाकला जातो. मागील वर्षी रोहित्रा जवळ कचरा जाळल्याने रोहित्र जळून वीजपुरवठा खंडीत होण्याबरोबरच लाखो रूपयांचे नुकसान झाल्याच्या घटना घडल्या आहेत.
वाढत जाणारी उष्णता लक्षात घेता वीजयंत्रणा सुरक्षीत राहण्यासाठी व अखंडीत वीजपुरवठयासाठी वीजयंत्रणेजवळ कचरा टाकू अथवा जाळू नये असे आवाहन महावितरणने केले आहे.
शहरातील अनेक भागात नागरिक रस्त्यावर कचरा टाकत आहेत. मोकळ्या जागी, मुख्य रस्त्याच्या कडेला तसेच वीजपुरवठा करणाऱ्या रोहित्रांच्या जवळील कचरा जाळण्याचे प्रमाण कमी होत नाही. त्यामुळे रोहित्राला आग लागण्याच्या घटना घडत असतात. रोहित्राजवळील कचरा जाळल्यामुळे आग लागल्याने वीजपुरवठा खंडीत होण्याबरोबर लाखो रूपयांचे नुकसान दरवर्षी महावितरणला सोसावे लागते. प्रसंगी रोहित्रातील ऑईल लीकेज झाल्यास कचरा पेटण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.
नागरिकांनी उघड्यावर असलेल्या वीज यंत्रणेला धोका निर्माण होईल अशा ठिकाणी कचरा टाकू नये किंवा साठवलेला कचरा जाळू नये. अशा घटनांतून वीज यंत्रणेला आग लागल्यास अग्निशमन दला सोबतच महावितरणच्या १९१२ किंवा १९१२०, १८००-२१२-३४३५ आणि १८००-२३३-३४३५ या टोल फ्री क्रमांकांवर किंवा नजीकच्या महावितरण कार्यालयाला त्याची सूचना देण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.
रोहित्राजवळील कचरा जळाल्याने वीजयंत्रणेला मोठा फटका बसतो. पर्यायाने वीजग्राहकांनाही याची झळ सहन करावी लागते. रोहीत्रे उन्हाच्या तिव्रतेने गरम झालेले असतात. अशावेळी रोहित्रा जवळ कचरा जाळल्यास त्याची धग रोहित्रास बसून रोहित्राचे तापमान वाढल्याने प्रसंगी रोहित्रास आग लागून रोहित्र जळून जाते. परिणामी वीजपुरवठा खंडीत होतो. त्याचबरोबर रोहित्रा चा स्फोट झाल्यास गंभीर अपघातही होण्याची शक्यता असते.त्यामुळे वीजग्राहकांनी सजग राहून रोहित्राजवळ कचरा टाकू नये अथवा कचरा टाकून जाळणाऱ्यास मज्जाव करावा असे आवाहन केले.

## वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने नूतन नगरसेवकांचा सत्कार



तभा वृत्तसेवा
लातूर दि. २२ एप्रिल : वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी समाजातील नूतन नगरसेवक भीमाशंकरप्पा बेंबळकर व बसवराजप्पा धरणे यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.
लातूर वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने वीरशैव भवन याठिकाणी महात्मा बसवेश्र्वर जयंती त्या निमित्ताने महात्मा बसवेश्र्वरांच्या प्रतिमेचे पूजन समाजाचे अध्यक्ष विश्र्वनाथ निगुडगे, लक्ष्मीकांत मंठाळे, उमाकांत कोरे, बंडाप्पा जावळे. महादेवआप्पा लामतुरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी लातूर महापालिकेत नगरसेवक म्हणून विजयी झालेले भीमाशंकर बेंबळकर व बसवराज धरणे यांचा शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी समाजाचे ज्येष्ठ मार्गदर्शक एड.शिवराजप्पा सुगरे, शरणाप्पा कलेमले , बाबूआप्पा सोलापूरे , मन्मथ चिखले, राजाभाऊ उपासे, उमाकांत नागुरे,श्रीकांत बिडवे ,बंडाप्पा बिडवे , महालिंग घाळे ,सूर्यकांतहत्ते , लक्ष्मण विभुते आदी समाज बांधव उपस्थित होते. येथील कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर मिरवणुकीने सर्वाधिक महात्मा बसवेश्र्वर पुतळा बसवेश्र्वर कॉलेज समोर जाऊन सर्व समाज बांधवांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले व प्रसाद वाटप करून कार्यक्रम संपन्न झाला.याप्रसंगी समाजाच्या अत्यंत गरजेच्या महात्मा बसवेश्र्वर सभागृहाची व लातूर शहराच्या चारीही बाजूस नवीन स्मशानभूमीची मागणी या नगरसेवकांच्या मार्फत महापालिका व राज्य सरकार यांच्याकडे करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. त्यास उत्तर देताना भीमाशंकर पिंपळकर यांनी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्र्वासन दिले व प्रसंगी निवेदन देण्यासाठी सर्व समाज बांधवांनी सोबत येण्याची अपेक्षा व्यक्त केली. बसवराज धरणे यांनी आमदार अमित देशमुख यांच्यामार्फत कन्हेरी स्मशानभूमीचा प्रश्न लवकरात लवकर सोडवण्याचा प्रयत्न करण्याचे व नवीन स्मशानभूमी आराखड्यामध्ये मंजूर करून घेण्यासाठी प्रयत्न करतो असे नमूद केले. याशिवाय महात्मा बसवेश्र्वरांच्या वचनाची अभ्यास करण्यासाठी व विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका व समाजासाठी सभागृह अशा पद्धतीचे नवीन वास्तूसाठी प्रयत्नशील राहू असे आश्वासन दिले.

## सर्व प्रकारच्या आपत्तींचा मुकाबला करण्यासाठी यंत्रणांनी सज्ज रहावे : जिल्हाधिकारी

तभा वृत्तसेवा
लातूर दि. २२ एप्रिल : मॉन्सून काळात उद्भवणाऱ्या प्रत्येक आपत्कालीन परिस्थितीमध्ये जिल्हा आणि तालुकास्तरावरील सर्व शासकीय विभागांनी समन्वयाने काम करावे. तसेच सर्व विभागांनी आपली आपत्कालीन प्रतिसाद कार्यपद्धती (एसओपी) अद्ययावत करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज येथे दिल्या. मॉन्सूनपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते.
यावेळी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ए.जे. तडवी, लातूर शहर महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, निवासी उप जिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जलसंपदा विभागाच्या अधीक्षक अभियंता रुपाली ठोंबरे, कार्यकारी अभियंता अमरसिंग पाटील, रोहित जगताप, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकेब उस्मानी नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त अजितकुमार डोके, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रोहन जाधव यांच्यासह विविध शासकीय विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच सर्व तहसीलदार, गट विकास अधिकारी, नगरपरिषद आणि नगरपंचायतचे मुख्याधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

## लातूरात २५ एप्रिल २०२६ रोजी कुणबी मराठा समाजाचा वधु-वर परिचय मेळावा

तभा वृत्तसेवा
लातूर दि. २२ एप्रिल : महाराष्ट्र राज्य कुणबी मराठा समाज प्रतिष्ठानद्वारा संचालित कुणबी मराठा समाजाचा वधुवर परिचय मेळावा २५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.३० वा.कार्यक्रमाचे उद्घाटक ॲड.उदय गवारे व कार्यक्रमाचे अध्यक्ष युवा सामाजिक कार्यकर्ते धनराज साठे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.
या कार्यक्रमात खरोसा जिल्हा परिषद गटाचे तानाजी जाधव, अंबुलगा (बु) जि.प.सदस्य चंद्रकांत कोरे, लातूर महानगरपालिकेतील नगरसेवक पप्पु देशमुख, कमल सोमोसे, सतीश साळुंके, निलंगा नगरपालिकेचे नगसेवक अजित नाईकवाडे आदी मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून रेणापूर पंचायत समितीचे माजी सभापती शिवराज सपकाळ, महिला व बालकल्याण विभागाचे माजी उपायुक्त वैभव सूर्यवंशी, महिला आघाडी शिंदे गटाच्या जिल्हा प्रमुख सौ.उर्मिलाताई भगत, माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव जाधव, स्थानिक गुन्हे शाखा विभागाचे पोलीस उपनिरिक्षक सुधाकर बावकर, राष्ट्रपती पोलीस पदक प्राप्त ॲड.चिमाजी बाबर, लातूरचे सामाजिक कार्यकर्ते अंबादास जाधव, भाजपाचे चाकूर तालुकाध्यक्ष सिध्देश्वर पवार, भाजपाचे निलंग्यातील कार्यकर्ते किशार लंगोटे, सकल मराठा समाजाचे औसा शहराध्यक्ष प्रदीप मोरे, श्री श्री विद्याशंकर विद्यामंदिरचे संस्थाचालक राजेंद्र कोळगे, गातेगाव विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन चंद्रसिंह भोसले, कुणबी मराठा समाजाचे बीड जिल्हाध्यक्ष भास्कर भिसे, लातूर येथील ज्येष्ठ विधी तज्ज्ञ ॲड.शिवाजी शिंदे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.
त्यामुळे कुणबी समाजातील सर्व समाजबांधवांनी २५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.३० वा लातूर येथील भक्ती शक्ती मंगल कार्यालय लातूर येथे वेळेवर उपस्थित राहून या मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र कुणबी मराठा समाज प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आलेले आहे.

## भारतीय संविधानाचे वाचन, चिंतन आणि कृतिशील आचरण महत्त्वाचे : डॉ. गवई



तभा वृत्तसेवा
लातूर दि. २२ एप्रिल : भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताला भारतीय संविधान हा मौलिक आणि पवित्र ग्रंथ दिला. त्यामुळे आज प्रत्येक घराघरांमध्ये भारतीय संविधानाचे वाचन, चिंतन आणि कृतिशील आचरण महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील प्रोफेसर डॉ.संजय गवई यांनी केले.
दारिद्र्य विरोधी अभियान, महाराष्ट्र, ग्रामपंचायत कार्यालय आणि शिवाजी माध्यमिक विद्यालय, कवठाळ यांच्या संयुक्त विद्यमाने कवठाळ येथील ग्रामपंचायत सभागृहामध्ये भारतीय संविधान ७५ वर्ष पूर्ती व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंती निमित्त घरघर संविधान मोहिमेच्या पहिला टप्प्याचे उद्घाटन प्रोफेसर डॉ.संजय गवई यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते उद्घाटक म्हणून बोलत होते.
या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी उपसरपंच मल्लिकार्जुन हुडे हे होते तर विचारमंचावर प्रमुख अतिथी पोलीस उपनिरीक्षक भीमराव गायकवाड, माजी नगरसेवक प्रकाश गायकवाड, संयोजक अभंगराव सूर्यवंशी, मुख्याध्यापक हरिषचंद्र चामले, संजय धनुरे, राजकुमार धनुरे, प्रा.विठ्ठलराव सुरे, बीट जमादार राजेश लामतुरे आणि ममता गवई यांची प्रमुख उपस्थिती होती.
कार्यक्रमाच्या प्रारंभी जगत ज्योती महात्मा बसवेश्र्वर आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.
पुढे बोलताना डॉ.संजय गवई म्हणाले की, भारतीय संविधान हे प्रत्येक घरामधील प्रत्येक व्यक्तीने वाचणे अत्यंत आवश्यक आहे. अभंगराव सूर्यवंशी यांनी या अभियानाच्या माध्यमातून भारतीय संविधान हे घरातील प्रत्येक व्यक्तीच्या हातामध्ये देण्याचे राष्ट्रीय कार्य सुरू केले आहे असे सांगून त्यांनी त्यांचे अभिनंदन केले.
यावेळी पोलीस उपनिरीक्षक भीमराव गायकवाड बोलताना म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधानाच्या निर्मितीमध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यामुळेच त्यांना भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून संबोधले जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण देशासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यांनी शिका हा महत्वाचा संदेश समाजाला दिल.
या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना अभंगराव सूर्यवंशी करताना म्हणाले की, भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने महाराष्ट्र शासनाच्या अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत घर घर संविधान या मोहिमेचा पहिला टप्प्याचे उद्घाटन आज कवठाळ येथे संपन्न होत आहे. या अभियानाची व्याप्ती संपूर्ण जिल्ह्यामध्ये केली जाईल आणि त्यानंतर मराठवाडा व संपूर्ण महाराष्ट्रामध्ये घरघर संविधान या मोहिमेअंतर्गत राष्ट्रीय कार्य केले जाईल यासाठी आपण सर्वांनी सहकार्य करण्याचे विनंती त्यांनी यावेळी केली.
या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय धनुरे यांनी केले तर आभार वरूनराज सूर्यवंशी यांनी मानले.
कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुमित भडके, संदीपान हणमंते, सार्थक गवई, पृथ्वीराज सूर्यवंशी, दयानंद कारभारी, वामन हणमंते, संगम पताळे, सायबू सय्यद, लायक शेख, खादर शेख, सरू ताई स्वामी यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाला गावातील ग्रामस्थ, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात ९८९ रुग्णांना सुमारे ७.७२ कोटींची मदत

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती

तभा वृत्तसेवा
लातूर दि. २२ एप्रिल : शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. लातूर जिल्ह्यात आर्थिक वर्षात ९८९ रुग्णांना सुमारे ७ कोटी ७२ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे.
मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरित्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.
कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी/ रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.
१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत लातूर जिल्ह्यातील ९८९ रुग्णांना सुमारे ७ कोटी ७२ लाख ९५ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वातून आणि दूरदृष्टीतून लातूर जिल्ह्यातील शेकडो गरजू रुग्णांना वेळेवर वैद्यकीय मदत मिळत आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या पारदर्शक आणि गतिमान कार्यपद्धतीमुळे मदत वितरणाचा वेग वाढला असून अनेक कुटुंबांना दिलासा मिळाला आहे. कोणताही रुग्ण उपचाराअभावी वंचित राहू नये, हा निर्धार आहे. अधिक माहितीसाठी व सहाय्यासाठी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्र्वर नाईक यांनी केले आहे.